
अल्पावधीत लोकप्रिय ठरलेले ग्रंथप्रसाराला वाहिलेले
दर्जेदार मासिक

# मेहता मराठी ग्रंथजगत

सप्टेंबर २००८

किंमत
रुपये १५
















**‘फेडरेशन ऑफ इंडियन पब्लिशर्स’** या अखिल भारतीय प्रकाशक संघटनेतर्फे उत्कृष्ट ग्रंथनिर्मिती पुरस्कारासाठी यावर्षी **मेहता पब्लिशिंग हाऊस**च्या दोन पुस्तकांची निवड झाली.

MEMOIRS OF A GEISHA

‘मी सायूरी’

**‘मी सायूरी’**
आर्थर गोल्डन
अनु.: सुनंदा अमरापूरकर
(जनरल बुक्स)







## ‘सूर्याची चोरी आणि गोष्टी देशोदेशीच्या’

**चारुता पुराणिक**
(बालवाङ्‌मय)

या पुस्तकांच्या निर्मितीप्रक्रियेत सहभागी असणाऱ्या सर्व संबंधितांचे मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे **हार्दिक अभिनंदन!**

# मेहता मराठी ग्रंथजगत

◆ सप्टेंबर २००८

◆ वर्ष आठवे

◆ अंक नववा

## — अनुक्रमणिका —


| | |
|---|---|
| **संपादकीय** | ४ |
| **साहित्यवार्ता** | ९ |
| **पुस्तक परिचय** | |
| **आलो आंधारि :** अनु. मृणालिनी गडकरी | ४४ |
| **ऑपरेशन मोर्लेसिस :** अरुण हेबळेकर | ४८ |
| **विज्ञान नवलाई** | |
| **पशू-पक्षी :** डॉ. बाळ फोंडके | ५४ |
| **स्वरगंगेच्या काठावरती :** सदानंद गोखले | ५८ |
| **जळात सोडलेले दिवे :** अर्चना वर्टीकर | ६४ |
| **मुलाखत :** टॉमस अब्राहम | ७० |
| **साधंसुधं :** प्रमोदिनी वडके-कवळे | ७६ |
| **पुरस्कार** | ८२ |
| **वाचकांचा प्रतिसाद** | ९२ |
| **श्रद्धांजली** | ९८ |
| **बालनगरी** | १०० |



संपादक :
सुनील मेहता

कार्यकारी संपादक :
शंकर सारडा

अंकाची किंमत १५ रु.

वार्षिक वर्गणी
मनीऑर्डरने पाठवावी.

प्रसिद्धी
दरमहा १५ तारखेस


मांडणी-अक्षरजुळणी
*मेहता पब्लिशिंग हाऊस*

संपादक-मुद्रक-प्रकाशक : सुनील मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी,
बाजीराव रोड, टेलिफोनभवनसमोर, पुणे-४११ ०३०.
फोन : ०२०-२४४७६९२४/२४४७५४६२
Email - info@mehtapublishinghouse.com
mehtapublishing@gmail.com
Website - www.mehtapublishinghouse.com

**वार्षिक वर्गणी १५० रु. तीन वर्षांची ३५०रु. पाच वर्षांची ५००रु.**
**३ किंवा ५ वर्षासाठी वर्गणीदार झाल्यास पुस्तक भेट !**



*या अंकातील लेखांतील मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादकसहमत असतीलच असे नाही.*




## लंडन बुक फेअर - एप्रिल २००९

ग्रंथव्यवहाराबाबत भारताची प्रचंड बाजारपेठ परदेशांना सध्या मोठ्या प्रमाणावर भुरळ घालते आहे हे पदोपदी जाणवत आहे.

दोन वर्षांपूर्वी फ्रँकफर्ट बुक फेअरने भारताला गेस्ट ऑफ ऑनर म्हणून सन्मानाने पाचारण केले होते. भारतीय लेखक-कवींना आमंत्रण देऊन त्यांच्या चर्चांचे कार्यक्रम ठेवलेले होते. भारतीय पुस्तकांचे जर्मन व इतर परदेशी भाषांतले कॅटलॉग्ज तयार करून ते जागतिक प्रकाशन संस्थांना उपलब्ध करून दिले होते. अनंतमूर्ती, अमिताव घोष, अरुंधती रॉय, किरण देसाई, शशी थरूर, विक्रम सेठ यांच्यासारख्या नामवंत लेखकांच्या जोडीने बेबी हालदारसारख्या सामान्य स्तरातून वर आलेल्या लेखिकेलाही या बुक फेअरमध्ये सन्मानाने सामावून घेण्यात आले होते. एका परीने भारतीय भाषांमधील साहित्याला देण्यात आलेले ते मानाचे पान होते; आणि भारतीय पुस्तकांचे अनुवादाचे तसेच वितरणाचे हक्क मिळवण्यात आपल्याला स्वारस्य आहे असे अभिमानाने जाणवून देण्याचा तो प्रयत्न होता. भारताला गेस्ट ऑफ ऑनरचा सन्मान देऊन, भारतानेही जगातील अग्रगण्य प्रकाशन संस्थांशी अनुवादाच्या हक्कांबाबत बोलणी व देवाणघेवाण करावी यासाठी ते प्रकट निमंत्रणच होते. त्याचा फायदा आपल्या देशातील काही प्रमुख प्रकाशन संस्थांनी निश्चितच घेतला. भारतात इंग्रजी पुस्तकांचा खप मोठ्या प्रमाणावर होतो, तेव्हा चिकन सूप वगैरे इंग्रजीतील गाजलेल्या मालिकांच्या वितरणाचे हक्कही भारतीय प्रकाशकांना देण्याची तयारी परदेशी प्रकाशकांनी दाखवली. येथे पायरेटेड कॉपीज् विकल्या जाऊ नयेत; अधिकृत प्रतीच विकल्या जाव्यात, मग फायदा कमी झाला तरी चालेल असा व्यवहारिक दृष्टिकोन या प्रकाशकांनी आता स्वीकारला आहे. अमेरिकेत किंवा इंग्लंडमध्ये जेवढे इंग्लिश बोलणारे व समजणारे लोक आहेत, त्यापेक्षा जास्त इंग्लिश बोलणारे व वाचणारे वाचक भारतात आज आहेत, हे वास्तव परदेशी प्रकाशन संस्थांना चकित करीत आहे. त्याचा प्रभाव सर्वत्र दिसतो आहे.

पुढच्या वर्षी (एप्रिल २००९ मध्ये) ३८वी लंडन बुक फेअर भरणार आहे, या लंडन ग्रंथजत्रेतही भारताला केंद्रस्थानी स्थानापन्न केले जाणार आहे.

लंडन बुक फेअर ही अनुवाद व मुद्रण हक्क, डिजिटल हक्क आणि टेलिव्हिजन तसेच चित्रपट हक्क यांची उलाढाल करणारी फ्रँकफर्टच्या खालोखाल महत्त्व असणारी ग्रंथजत्रा आहे. ब्रिटिश कौन्सिल, फेडरेशन ऑफ इंडियन पब्लिशर्स, कॅपेक्सिल या संस्थांच्या पुढाकाराने आणि सहकार्याने लंडन बुक फेअर या वेळी आयोजित केली जाणार आहे. एप्रिल २००९मध्ये प्रत्यक्ष जत्रा होणार असली तरी सहा महिने आधीपासूनच तिची तयारी सुरू झाली आहे. या जत्रेला इंग्लिश भाषेत पुस्तके काढणारे छोटे मोठे प्रकाशक उपस्थित असतात; तसेच १२० देशांतील वेगवेगळ्या भाषांमध्ये पुस्तके प्रकाशित करणारे २५ हजारावर प्रकाशकही तिच्यात सहभागी होतात.


पूर्व युरोप, स्पेन, अरब देश, या देशांतील प्रकाशन संस्थांना गेल्या ६ वर्षांपासून आवर्जून लंडन बुक फेअरमध्ये समाविष्ट करून घेतले जात आहे. अरब देशांमध्ये अजून ग्रंथांना पोषक वातावरण नाही, परंतु भावी काळात अरब देशांमध्येही ज्ञानाची दारे सताड उघडली जातील आणि अनुवादाची प्रक्रिया मूळ धरील असा आशावाद पाश्चात्य देशांना वाटतो. केवळ उर्दू वा अरबी भाषांतील धार्मिक पुस्तकांच्या पुरती अरबांची ज्ञानसाधना सीमित न राहता पाश्चात्य विज्ञान, तंत्रज्ञान आणि उपयोजित ज्ञान यांनाही तेथे वाव मिळेल, त्यासाठी शालेय व इतर पुस्तकांची मोठ्या प्रमाणावर गरज भासेल असे अंदाज प्रकट केले जात आहेत. त्या दृष्टीने पाश्चात्य प्रकाशन संस्था अरब देशांमध्ये आपल्या शाखा उघडून संपर्क माध्यमांचा वापर करण्यावर भर देत आहेत. अरब देशांशी भारताचे संबंध तर शेकडो वर्षांपासून आहेत. त्यामुळे सांस्कृतिक, वाणिज्य व्यवहाराच्या दृष्टीने भारतीय प्रकाशन संस्थांनाही चांगला अवसर आहे असे नॅशनल बुक ट्रस्टच्या अधिकाऱ्यांना वाटते.

भारतीय लेखक-कवींना आणि प्रकाशक-वितरकांना लंडन बुक फेअरमध्ये उपस्थित राहून अनुवादाचे हक्क, डिजिटल हक्क याबाबत वाटाघाटी करता येतील.

परदेशी कंपन्यांना संपादन, मुद्रणपूर्व कामे यांचे आउट सोर्सिंग करण्याचीही सुविधा भारतात विकसित करावीशी वाटते आहे. कारण येथे संपादन, प्रूफ रीडिंग, चित्रांकन, डीटीपी वगैरे प्रक्रिया परदेशातील खर्चाच्या तुलनेत कमी खर्चात होऊ शकतात. लंडन बुक फेअरमध्ये प्रत्यक्ष पुस्तकांची विक्री होत नाही; तर अशा सुविधांची आणि हक्कांची बोलणी होतात. त्याबाबत करारमदार होतात. इंग्लंडमध्ये भारतीय पुस्तके वितरित करताना येणाऱ्या अडचणी आणि त्याबाबत घ्यावयाची दक्षता याबद्दल काही चर्चासत्रे या बुक फेअरमध्ये घेण्यात येणार आहेत. भारतात आउट सोर्सिंगच्या दृष्टीने असणाऱ्या सुविधांची माहिती देणारीही काही सत्रे असणार आहेत. भारतीय प्रादेशिक भाषांतील प्रकाशकांना लंडन- फ्रँकफर्ट येथील ग्रंथजत्रांमध्ये

भाग घेणे परवडत नाही. केवळ बड्या प्रकाशन संस्थांनाच बुक फेअरमध्ये भाग घेणे परवडते असे मानण्याचे कारण नाही एवढेच!

पुस्तक प्रकाशन क्षेत्राचा व्याप आणि विस्तार आता वाढत आहे. पुस्तके, कॉम्पॅक्ट डिस्कस्, ई-बुक्स, ग्राफिक नॉव्हेल्स, पिक्चर बुक्स, बालसाहित्य, व्यक्तिमत्त्व विकासाची पुस्तके, मॅनेजमेंट बुक्स, टॉकिंग बुक्स, कॉमिक्स, खेळणी वगैरे स्वरूपातही पुस्तके व संबंधित वस्तू यांना मोठी बाजारपेठ उपलब्ध होत आहे. लंडन बुक फेअर, फ्रँकफर्ट बुक फेअर, दिल्ली बुक फेअर यांमधील आंतरराष्ट्रीय वर्दळ त्यामुळे यापुढे वाढत राहणार आहे.




**मेहता पब्लिशिंग हाऊसची दर्जेदार ग्रंथसंपदा 'ऐका' आता थेट आकाशवाणीवर...**

**वाचकमित्रहो...**

महाराष्ट्रातील तसेच महाराष्ट्राच्या बाहेर जगभरातील कोट्यवधी मराठी वाचकांपर्यंत पोहोचण्यासाठी 'मेहता पब्लिशिंग हाऊस' विविध माध्यमांद्वारे सतत प्रयत्नशील असते. www. mehtapublishinghouse.com या आमच्या वेबसाईटची जगभरातील मराठी वाचकांनी आवर्जून दखल घेतली आहे. 'मेहता मराठी ग्रंथजगत' सोबतच विविध वृत्तपत्रे, प्रसारमाध्यमांद्वारे आमच्या साहित्यसंपदेची ओळख मराठी वाचकाला आहेच...

आता पुणे आकाशवाणीच्या सहकार्याने दर सोमवारी, सकाळी ठीक आठ वाजून पंचावन्न मिनिटांनी आपण मेहता पब्लिशिंग हाऊसच्या पुस्तकांची ओळख 'ऐकू' शकाल. 'इथे पुस्तके भेटतात' मध्ये.

**चला तर मग... भेटूया दर सोमवारी सकाळी ठीक ८:५५ वाजता 'पुणे आकाशवाणीवर'.**

# नम्र आवाहन

'मेहता पब्लिशिंग हाऊस'च्या परिवारात आपले स्वागत आहे.

पुस्तकविश्वातील नवीन, ताज्या, ज्ञान-मनोरंजनपूर्ण, बालसाहित्य, अनुवादित साहित्य, विज्ञान साहित्य अशा असंख्य पुस्तकांची ओळख करून देण्यासाठी, रसिक वाचकांना आमच्या आकर्षक योजना कळविण्यासाठी, आम्ही उत्सुक आहोत.

आपण फक्त आपला ई–मेल कळवावा.

पत्र पाठवा, फोन करा किंवा इंटरनेटवर कळवा.

आम्ही वाट पाहत आहोत

आमचा Email

**info@mehtapublishinghouse.com**

**mehtapublishinghouse@gmail.com**

## 'सुमेरु' द्वारा प्रकाशित डॉ. जयसिंगराव पवार यांची पुस्तके

- **राजर्षी शाहू छत्रपती : जाहिरनामे हुकूमनामे**
  पृष्ठे : १४४ किंमत : रु. १२०/-
- **राजर्षी शाहू महाराज : एक मागोवा**
  पृष्ठे : १०८ किंमत : रु. १००/-
- **आमच्या इतिहासाचा शोध आणि बोध** पृष्ठे : ८० किंमत : रु. ८०/-
- **शिवचरित्रापासून आम्ही काय शिकावे?**
  पृष्ठे : ८० किंमत : रु. ९०/-
- **शिवछत्रपती : एक मागोवा** पृष्ठे : १५२ किंमत : रु. १४०/-
- **छत्रपती संभाजी महाराज : एक चिकित्सा**
  पृष्ठे : १६० किंमत : रु. १४०/-
- **मराठेशाहीचे अंतरंग**
  पृष्ठे : १४४ किंमत : रु. १४०/-
- **मराठ्यांचे स्वातंत्र्ययुद्ध**
  पृष्ठे : २३२ किंमत : रु. २००/-
- **राजर्षी शाहू छत्रपती : पत्रव्यवहार आणि कायदे**
  पृष्ठे : १२८ किंमत : रु. १००/-
- **राजर्षी, कर्मवीर आणि प्रबोधनकार ठाकरे** पृष्ठे : ६४ किंमत : रु. ५०/-
- **राजर्षी शाहू महाराज : एक अभ्यास**
  (सौ. वसुधा पवार) पृष्ठे : ११२ किंमत : रु. १२०/-

### आगामी

- **सेनापती संताजी घोरपडे** पृष्ठे : १९२ किंमत : रु. २००/-
- **राजर्षी शाहू छत्रपतींची भाषणे** पृष्ठे : १०४ किंमत : रु. ८०/-

सुमेरु

# सुमेरु प्रकाशन

डी-६, राजहंस, टिळकनगर, डोंबिवली (पू.) ४२१२०१
✆ : ०२५१ - २४०४१४९/२४३५९६८/०२४०-२३५१८७८

# साहित्यवार्ता



*** 'जेएनयू'मध्ये मराठीचे अध्यासन**

दिल्ली येथील जवाहरलाल नेहरू विद्यापीठात (जेएनयू) मराठी साहित्य आणि संस्कृतीच्या अभ्यासासाठी दोन कोटी रुपयांची तरतूद करून अध्यासन सुरू होत आहे.

राज्य सरकार यासाठी दीड कोटी रुपये देणार आहे. उर्वरित पन्नास लाख रुपये विद्यापीठ देणार आहे. 'जेएनयू'मधील जैविक विज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. आर. के. काळे यांच्या पुढाकाराने हे अध्यासन आकारास येत आहे. स्वत: डॉ. काळे हे बीड जिल्ह्यातील माजलगाव तालुक्यातील उमरी पारगावचे असून औरंगाबाद विद्यापीठातून पदव्युत्तर शिक्षण पूर्ण करून पीएचडी करण्यासाठी 'जेएनयू'मध्ये गेले; ते ३२ वर्षांपासून तेथेच आहेत.

या संदर्भात बोलताना डॉ. काळे म्हणाले, "'जेएनयू'मध्ये परकीय भाषांच्या अभ्यासासाठी स्वतंत्र विभाग आहे. या विभागातच भारतीय भाषांचा अभ्यास करणारी केंद्रे आहेत. संबंधित राज्य सरकारांनी तामीळ, बंगाली केंद्रांसाठी निधी दिला आहे. दिल्लीत सुमारे पाच लाख मराठी लोक आहेत. या संदर्भात मराठी भाषेचेही केंद्र असावे, अशी कल्पना पुढे आली. विद्यापीठाच्या संबंधित अधिकार मंडळापुढे हा प्रस्ताव ठेवून त्यास मान्यता मिळविण्यात यश आले आहे. राज्याचे मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांनीही अध्यासनासाठी मदत म्हणून दीड कोटी रुपये देण्याचे पत्र काही दिवसांपूर्वी विद्यापीठाला पाठवले आहे.

सुमारे दीड हजार एकराच्या परिसरात विस्तारलेल्या 'जेएनयू'मध्ये एकूण सोळा वसतिगृहांमधून पाच हजार विद्यार्थी राहतात. त्यामधील सर्वांत मोठ्या ५४० विद्यार्थ्यांची सोय असलेल्या वसतिगृहाला 'कोयना' हे नाव देण्यात आले आहे. देशभरातील विविध महत्त्वाच्या

नद्यांची नावे विद्यापीठातील वसतिगृहांना देण्यात आली आहेत.

## * प्रज्ञाशोध परीक्षा शिष्यवृत्ती

खरी क्रांती शैक्षणिक क्षेत्रात आहे. बाकीच्या क्रांती आपोआपच होतील; त्यामुळे क्रांतीची मूळ गंगोत्री शिक्षणक्षेत्रातच आहे, असे प्रतिपादन प्रसिद्ध साहित्यिक प्रा. रा. ग. जाधव यांनी केले.

नौरोसजी वाडिया महाविद्यालयात महाराष्ट्र प्रज्ञा शोध परीक्षेत शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती आणि सन्मानपत्रे देण्यात आली. या वेळी प्रसिद्ध वनस्पती शास्त्रज्ञ डॉ. आनंद कर्वे, प्राचार्य डॉ. भगवान ठाकूर, प्रा. जी. सी. कुलकर्णी, डॉ. एम. एम. अंडार, डॉ. पी. एम. सुळे उपस्थित होते.

एप्रिल २००८ मध्ये घेण्यात आलेल्या इयत्ता आठवीच्या महाराष्ट्र प्रज्ञा शोध परीक्षेत संपूर्ण महाराष्ट्र, तसेच गोवा, कर्नाटक, गुजरात या चार राज्यांतील शिष्यवृत्ती परीक्षेत अंबाजोगाई येथील अशोक कदम प्रथम आला.

जाधव म्हणाले, ''नवीन शैक्षणिक, सामाजिक समांतर चळवळ निर्माण करण्याची गरज आहे. मानवविद्या आणि ज्ञानतंत्रज्ञानाचा योग्य समन्वय साधायला हवा. सध्या समाजात शहाणी माणसे खूप आहेत. पण चळवळीसाठी थोड्या वेड्या माणसांची गरज आहे. विज्ञान आणि कविता मनुष्यनिर्मित असल्यामुळे त्या राष्ट्रनिर्मितीसाठी आवश्यक आहेत. ज्ञात, रूढ, सांकेतिक, पारंपरिक पद्धतीपेक्षा वेगळे केले जाते ती 'प्रज्ञा' असते.''

डॉ. कर्वे म्हणाले, ''भारतात गोबर गॅस (बायोगॅस)चे तंत्र १९५० पासून प्रचलित आहे. खादीग्रामोद्योग महामंडळाने याचा प्रचार आणि प्रसार केला. मात्र त्याला यश आले नाही. देशातील एक अब्ज लोकसंख्येपैकी फक्त २५ जणांचे बायोगॅस प्रकल्प चालू आहेत. किण्वन प्रक्रियेत (फर्मेन्टायझेशन) खाद्य म्हणून साखर वापरतात. स्फटिक शर्करामधील ग्लुकोज, फ्रुक्टोज जंतूंना खाद्य म्हणून दिले जाते. एक कि. ग्रॅ. साखरेतून जो गॅस मिळतो, तो गॅस ४० कि. ग्रॅ. शेणापासून मिळतो. शेणापासून गॅस मिळण्यासाठी ४० दिवस, तर साखरेपासून केवळ २४ तासांत गॅस मिळतो. रासायनिक खते न वापरता अधिक उत्पन्न घेता येते. शेतात अधिक पोषणमूल्ये असणारे पदार्थ टाकल्यास एकरी उत्पन्नात वाढ होते. रासायनिक खतनिर्मितीलासुद्धा जास्त ऊर्जा लागते.''

''पिकांसाठी 'प्रकाश' महत्त्वाचा असतो. रात्र पडण्यापूर्वी पाच मिनिटे पिकांवर कोणता प्रकाश पडतो, हे पिकांना प्रकाश लहरीमुळे समजते. भुईमूग, चवळी, हरभरा रुंदपर्णी वनस्पती असूनही एकरी ४० कि. ग्रॅ. पेक्षा अधिक 'बी' पेरले जाते. भुईमुगासारख्या पिकाच्या पानांमुळे दिवसभर जमिनीवर प्रकाश पडत नाही. मात्र संध्याकाळी कडधान्य गटातील पिके पाने मिटून घेतात. कारण ही पिके एकमेकांशी स्पर्धा करीत नाहीत. त्यामुळे शेतात १०० कि. ग्रॅ. 'बी' पेरले, तरी उत्पन्न मिळते,'' असे ते म्हणाले.

## * डॉ. गंगाधर पानतावणे यांची निवड

अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळ आणि सॅनफ्रान्सिको यथील बे-एरिया महाराष्ट्र मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने २००९ मध्ये फेब्रुवारीत, सॅन होजे येथे होणाऱ्या पहिल्या विश्व मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ साहित्यिक, समीक्षक आणि परिवर्तनवादी साहित्य चळवळीचे अध्वर्यू डॉ. गंगाधर पानतावणे यांची निवड करण्यात आली आहे.

अखिल भारतीय साहित्य मंडळाच्या घटक संस्था आणि संलग्न संस्थांची बैठक १९ ऑगस्ट रोजी मुंबई मराठी साहित्य संघात आयोजित करण्यात आली होती. त्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. तसेच २००९ च्या मार्च किंवा एप्रिल महिन्यात अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळातर्फे ८२ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनही महाराष्ट्रात किंवा बृहन्महाराष्ट्रात घेण्याचा निर्णयही घेण्यात आला.

## * मराठी गझल

मराठी भाषेचा पोत लक्षात घेऊन गझलमध्ये नवे विषय आले पाहिजेत, अशी अपेक्षा प्रसिद्ध कवी-गझलकार म. भा. चव्हाण यांनी व्यक्त केली. 'प्रथमपुरुषी एकवचनी' यातून गझल बाहेर पडली पाहिजे, असेही ते म्हणाले.

साहित्यकला वर्तुळ जागतिक अकादमीतर्फे 'गझल उलगडताना' अंतर्गत श्रीकांत वाघ यांनी चव्हाण यांच्याशी संवाद साधला.

चव्हाण म्हणाले, ''गझल ही मराठी काव्यपरंपरेची अंगभूत कविता आहे. हा काही स्वतंत्र काव्यप्रकार नाही. मराठी गझलेचे जनकत्व सुरेश भट यांच्याकडेच जाते. दुसऱ्या भाषेतील शब्द आल्यानेच आपल्या भाषेचा विकास होतो. त्यामुळे गझलमध्ये दुसऱ्या भाषेतील शब्द येण्यास हरकत नाही.

ज्या भाषेत गझल गेली, ती त्या भाषेची सम्राज्ञी झाली आहे. कोणत्याही विषयाचे गझलला बंधन नाही. बोलीभाषेला मर्यादा असल्यामुळे प्रमाणभाषेतच गझल लिहिणे योग्य ठरते.''

वाक्प्रचारांवर आणि म्हणींवर आधारित गझल लिहिता येते. 'आपलेच दात आपलेच ओठ' या म्हणीचे 'माझेच ओठ होते माझेच दात होते अन् घाव घालणारे माझेच हात होते' असे रूपांतर झाले की त्याची गझल होते, असे त्यांनी उदाहरणासह स्पष्ट केले.

## * आरती अंकलीकर यांचे विवेचन

मैफलीत गाणारा प्रत्येकजण सर्जनशील कलाकार असतो का? वर्षानुवर्षे एकाच पद्धतीने घोटलेले लीलया मांडणे, याला सर्जनशीलता म्हणता येईल का? सादरीकरणात स्वत:चा विचार महत्त्वाचा आहे का? असे मूलगामी प्रश्न उपस्थित करत प्रसिद्ध गायिका आरती अंकलीकर यांनी नवोदित कलाकारांना 'मैफलीचे तंत्र'

प्रात्यक्षिकासह समजावून सांगितले.

'गानवर्धन', 'भीमसेन जोशी अध्यासन, ललित कला केंद्र, पुणे विद्यापीठ' आणि 'अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडळ' यांच्या सहकार्याने मुक्त संगीत संवाद चर्चासत्र घेण्यात आले. डॉ. विकास कशाळकर यांनी संवाद साधला. 'स्वरानंद प्रतिष्ठान'चे प्रकाश भोंडे यांचा षष्ट्यब्दीपूर्तिनिमित्त अंकलीकर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तसेच अश्विनी मोडक, रमाकांत गायकवाड आणि विक्रम सरदेशपांडे यांना संगीत शिष्यवृत्ती देण्यात आली.

''मैफल ही गाणाऱ्या कलाकाराप्रमाणेच श्रोत्यांनाही वेगळ्या भावावस्थेत घेऊन जात असते'', हे प्रारंभीच स्पष्ट करून त्या म्हणाल्या, ''गुरूकडून मिळणारे संस्कार, स्वत:ची साधना आणि उपजत प्रतिभा यातून गायन कला साध्य होऊ शकते. पण मैफलीसाठी तांत्रिक बाबी, संगीताचे व्याकरण, सकारात्मक दृष्टिकोन, तसेच मांडणीच्या चौकटीवर हुकूमत मिळविणे कलाकाराला अपरिहार्य असते. तरच समाधी अवस्थेप्रत नेणारे, प्रज्ञा जागृत करणारे गायन शक्य होते.''

त्या म्हणाल्या, ''सिद्ध गायकाचा 'आवाज' नव्हे तर 'मन' गात असते. सुरेल तानपुरे हा रागमांडणीचा कॅनव्हास असतो. त्यावर रागचित्र उलगडत असते. तसेच वाद्यावर प्रेम करणारे साथीदार असावे लागतात. संगीत हे आत्मरंजनासाठी असावे लागते. 'राग' ही सगुण उपासना आहे. मात्र अलीकडे चमत्कृती, गुंतागुंतीच्या स्वराकृती, आवाजाची तयारी आणि तांत्रिक कौशल्याचा देखावा याकडेच अधिक कल दिसत आहे.'' मिलिंद कुलकर्णी (हार्मोनियम) आणि प्रशांत पांडव (तबला) यांनी साथ केली.

*** 'रेन रागा' अनोखी मैफल**

सूर, लय, ताल आणि गायकी यांच्या प्रत्ययकारी आविष्कारातून निसर्ग आणि वर्षा  ऋतू यांचा मिलाफ उलगडला.

'पंचम निषाद' आणि 'ईशान्य' मॉल यांच्यातर्फे 'रेना रागा' हा कार्यक्रम आयोजित केला गेला. जुगलबंदीचा आनंद देणाऱ्या वाद्यमेळाच्या साथीने कार्यक्रमाची रंगत वाढत गेली. शशी व्यास यांच्या संकल्पनेवर आधारित 'रेन रागा'च्या रचना ल्युईस बँक्स आणि कौशल इनामदार यांनी स्वरबद्ध केल्या होत्या. व्यास यांच्या निवेदनाने कार्यक्रमात रंग भरला. संजीव चिमलगी, हमसिका आणि इनामदार यांच्या गायनाला रवींद्र चारी (सतार), रूपक कुलकर्णी (बासरी), जॉर्ज ब्रुक्स (सॅक्सोफोन), गिनो बँक्स (ड्रम), ल्युईस बँक्स (की-बोर्ड) यांनी साथ केली.

'बदरवा बरसन आये' या रचनेनंतर 'वासाचा पयला पाऊस अयलो' हे मराठी मातीचा गंध घेऊन आलेले गीत सादर झाले. प्रियकराला भेटण्यास उत्सुक असलेल्या पावसात भिजणाऱ्या प्रेमिकेची भावावस्था हमसिका यांच्या आलापीतून उत्कटपणे रसिकांसमोर आली. भुरभुर, रिमझिम, संततधार आणि मुसळधार अशी पावसाची विविध रूपे 'तांडव' या रचनेतून सादर झाली. विविध प्रादेशिक संगीतातील

पावसाचा आविष्कार ‘चेंजिंग द मान्सून’ या रचनेतून प्रकट आला. ‘हर्षोन्माद’ या रचनेने कार्यक्रमाची सांगता झाली.

*** संगीत चर्चासत्र**

‘मात्रे’च्या पलीकडे संगीत गेले, तरच ‘अनुभूती’ शक्य आहे, असे मत तालयोगी पं. सुरेश तळवलकर यांनी व्यक्त केले.

‘गानवर्धन’, ‘भीमसेन जोशी अध्यासन, ललित कला केंद्र, पुणे विद्यापीठ’ आणि ‘अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडळ’ यांच्यातर्फे आयोजित ‘मुक्त संगीत संवाद चर्चासत्रा’च्या समारोपप्रसंगी ते बोलत होते. ‘भारतीय संगीतातील लय-तालाचे स्वरूप’ असा त्यांच्या विवेचनाचा विषय होता. डॉ. विकास कशाळकर यांनी त्यांच्याशी संवाद साधला. या वेळी बाबूराव खळदकर यांचा नव्वदीनिमित्त पं. तळवलकर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला; तसेच आसावरी करंबळेकर यांना ‘मंगला रत्नपारखी पुरस्कार’ देण्यात आला.

‘‘ताल ही संगीतातील सर्व लोकांची सामाईक मालमत्ता आहे, पण तिच्याकडे डोळस नजरेने पाहिले पाहिजे,’’ असे सांगून पं. तळवलकर म्हणाले, ‘‘सर्व वाद्यांत ‘बेस’ आणि ‘ट्रीबल नोट’ या समान गोष्टी असतात. बेस नोटमुळे आवर्तन पूर्ण होते, तर ट्रीबल नोटमुळे लयीची सलगता स्पष्ट होते. तबला लयीची सलगता सांगतो. शिवाय शब्द, वाक्य, तालाची पूर्णताही सांगतो. सिद्ध वादकाच्या तबलावादनातून ‘भावना’ व्यक्त होतात. ‘ठेका’ ही तबल्यातील पहिली बंदिश असते. तालाला कालमर्यादेचे बंधन असते. संगीतात स्वर स्थिरता, तर लय गतिमानता सांगते. सम हा भारतीय संगीतातील सर्वोच्च भावनात्मक बिंदू असतो. समेपाशी सांगीतिक विधान पूर्ण होते. सम, विषम, अनाघात आणि अतीत असे ‘समे’चे प्रकार असतात. वादनात, नृत्यात वा गायनात संस्कार महत्त्वाचे असतात. तेच कलाकाराला अनुभूतीपर्यंत नेत असतात.’’

*** ‘माझी माय’ : ॲड. श्रीधर कसबेकर यांचे आत्मचरित्र**

‘‘गेल्या पन्नास वर्षांत दलित साहित्यातील आत्मचरित्रांमुळे वेशीबाहेरच्या जीवनाची वेदना समोर येऊ शकली. मात्र, या जीवनाचे सर्वंकष रूप समोर येण्यासाठी दलित स्त्रियांनीही आपले जीवन शब्दबद्ध करणे आवश्यक आहे,’’ असे विचार शिक्षणतज्ज्ञ डॉ. मा. प. मंगुडकर यांनी व्यक्त केले.

ॲड. श्रीधर कसबेकर यांच्या ‘माझी माय’ या आत्मचरित्राचे प्रकाशन ज्येष्ठ लेखिका डॉ. विजया वाड यांच्या हस्ते झाले.

कार्यक्रमाला विधान परिषदेचे माजी सभापती ना. स. फरांदे, ज्येष्ठ पत्रकार अनंत दीक्षित उपस्थित होते. क्रांतिवीर लहुजी साळवे प्रतिष्ठान आणि राष्ट्रीय कृषी विविध विकास संशोधन फेडरेशन यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. डॉ.

मंगुडकर म्हणाले, ''प्रत्येक आत्मचरित्राचे दु:ख वेगळे असते. मात्र, या लिखाणातून स्त्रियांचे अनुभव समोर न आल्याची खंत वाटते. त्यांचे जीवन शब्दबद्ध झाले, तर या जीवनाचे सर्वंकष रूप समोर येऊ शकेल.''

''आपण समाजाचे ऋण फेडले असे ज्याला वाटते, तोच खऱ्या अर्थाने जीवन जगला असे म्हणता येईल. ॲड. कसबेकरांच्या आत्मचरित्रातून याचा प्रत्यय येतो.'' असे डॉ. वाड म्हणाल्या. ॲड. कसबेकर म्हणाले, ''आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर मदत करणारी माणसे भेटत गेली, त्यातून जीवन घडत गेले. यामध्ये माझ्या आईचा सर्वाधिक वाटा आहे. त्या सर्वांचा ऋणनिर्देश व्यक्त करण्यासाठी हे आत्मचरित्र लिहिण्याचा निर्णय घेतला.''

### * 'समर्थ पुणे २०२०'चे प्रकाशन

राजकीय इच्छाशक्ती, जागृत जनता, लोकप्रतिनिधींचा सहभाग यांच्या माध्यमातून शहराचा विकास होईल, असे मत खासदार प्रकाश जावडेकर यांनी व्यक्त केले.

समर्थ भारत व्यासपीठातर्फे 'समर्थ पुणे २०२०: वेध पुण्याच्या भविष्याचा' या ग्रंथाचे प्रकाशन जावडेकर यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी व्यासपीठाचे अध्यक्ष डॉ. भा. र. साबडे होते. व्यासपीठाचे राष्ट्रीय निमंत्रक लेफ्टनंट जनरल (निवृत्त) डी. बी. शेकटकर, खंडाचे संपादक विवेक वेलणकर, प्रभाकर पाटणकर उपस्थित होते.

जावडेकर म्हणाले, ''लोकप्रतिनिधींना शहराच्या विकासाची दृष्टी असली पाहिजे. त्यांनी विकासात राजकारण न आणता रस्ते, पार्किंग, पाणी, शिक्षण आदींसाठी नियोजन व त्यांची अंमलबजावणी केली पाहिजे. पुण्यातील वाहतुकीचा प्रश्न सोडविण्यासाठी मेट्रो रेल्वे पाहिजे. त्यासाठी महापालिकेने नियम बदलले पाहिजेत. प्रसारमाध्यमांनी शहरातील विविध नागरी समस्या मांडल्या, त्या सोडविण्याची योग्य दिशा दर्शविली. मात्र सध्या पुण्यातील राजकीय व विजेचा 'पुणे पॅटर्न' कोसळला आहे. त्यामुळे शहराच्या विकासासाठी 'विशाखापट्टणम पॅटर्न' पुण्यात राबविला पाहिजे.''

शेकटकर म्हणाले, ''जोपर्यंत व्यक्ती, शहर समर्थ होत नाही, तोपर्यंत भारत समर्थ होणार नाही. युवकांनी शिक्षणाकडे जास्त लक्ष देऊन आपली सक्षमता वाढविली पाहिजे.''

### * पॅरिसमध्ये युरोपियन मराठी संमेलन

पॅरिसमध्ये १८ ते २० जुलै असे ३ दिवस भरवण्यात आलेल्या संमेलनास भरघोस प्रतिसाद लाभला. फ्रान्समध्ये प्रथमच भरलेल्या या मराठी संमेलनात रंजक कार्यक्रमांची रेलचेल होती. या निमित्ताने जगभरातून जमलेल्या उपस्थितांना वेगवेगळ्या देशांतील माहिती तसेच महाराष्ट्राचे संस्कृतिदर्शन झाले. १९ जुलै रोजी रीमा लागू यांच्या 'तुला मी मला मी' या एकपात्री नाटकाचा प्रयोग झाला.

अनिल नेने, अभिनेते डॉ. मोहन आगाशे, उद्योजक डी. एस. के. डेव्हलपर्सचे अध्यक्ष डी. एस. कुलकर्णी व प्राज इंडस्ट्रीजचे अध्यक्ष प्रमोद चौधरी इ. मान्यवर उपस्थित होते. 'तुला मी मला मी'च्या प्रयोगाला श्रोत्यांनी उत्स्फूर्तपणे दाद दिली. गिरीश कर्नाड हे त्याचे मूळ लेखक असून, विवेक लागू यांनी मराठी अनुवाद केला आहे. या नाटकाच्या सादरीकरणातील दृक्‌श्राव्य परिणाम समीर लिमये यांनी कौशल्याने हाताळले.

रीमा लागू म्हणाल्या, ''दीडशेहून अधिक वर्षांपासून शुद्ध सोन्यासाठी प्रसिद्ध असलेल्या राजमल लखीचंद ज्वेलर्स यांचीच उपकंपनी असलेला आर. एल. १८५४ हा ब्रँड म्हणजे विश्वास व गुणवत्तेचे प्रतीक आहे. पारंपरिक तसेच नव्या काळाच्या ग्राहकांच्या आवडनिवडी त्यांच्या दागिन्यांमध्ये प्रतिबिंबित होत असते. जगभरातील ग्राहकांना हे दागिने भुरळ घालतात.''

आर. एल. १८५४ ने युरोपियन संमेलन गाजवले आणि फॅशनची राजधानी समजल्या जाणाऱ्या पॅरिसमध्ये आपला ठसा उमटवला.

### * रत्नागिरीत 'मराठी साहित्य शारदा संमेलन'

अखिल भारतीय साहित्य महामंडळाने विश्व साहित्य संमेलन जाहीर केल्याने रत्नागिरी (जिल्हा) नगर वाचनालयातर्फे २६ ते २८ डिसेंबर दरम्यान अखिल भारतीय मराठी साहित्य शारदा संमेलनाची घोषणा अध्यक्ष ॲड. दीपक पटवर्धन यांनी केली.

पाडगावकर यांना सन्मानपूर्वक अध्यक्षपद देण्याची सूचना प्राचार्य राम शेवाळकर यांनी केली. त्यानुसार श्री. पाडगावकर यांच्याशी संपर्क साधून त्यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आला.

चांगल्या आर्थिक तरतुदीमुळे यंदा वाचनालयाने साहित्य संमेलनाचा प्रस्ताव पाठविला होता. त्यानुसार साहित्य महामंडळाच्या शिष्टमंडळाने पाहणी केली. मात्र सॅन फ्रान्सिस्को येथे संमेलनाची घोषणा झाली. त्यामुळे साहित्यक्षेत्रात वादळ उठले तेव्हा जिल्हा वाचनालयाने साहित्य शारदा संमेलन घेण्याचे ठरवले आहे. साहित्य शारदा संमेलनात सर्व साहित्यिक आणि सांस्कृतिक संस्थांना सहभागी करून घेतले जाणार आहे, असे पटवर्धन म्हणाले.

सॅन फ्रान्सिस्को येथे विश्व मराठी साहित्य संमेलन होत असल्यामुळे त्या संमेलनासाठी शासनाकडून अनुदान मिळेल की नाही, याबाबत तर्कवितर्क सुरू आहेत. हा निधी अखिल भारतीय संमेलनासाठी असतो. त्यामुळे विश्व संमेलनाला तो दिला जाण्याची शक्यता कमी आहे.

### * इंदिरा गांधी यांच्यावरील चित्रपट

भारतीय आणि आंतरराष्ट्रीय राजकारणावरही दीर्घकाळ प्रभाव पाडणाऱ्या भारताच्या

पहिल्या महिला पंतप्रधान इंदिरा गांधी यांचा जीवनप्रवास रुपेरी पडद्यावर साकारण्यात येणार आहे. करिश्मा कपूर, मनीषा कोईराला आणि विद्या बालन या तीन अभिनेत्रींमध्ये या भूमिकेसाठी चुरस आहे.

मोरारजी देसाई, लालबहादूर शास्त्री, संजय; तसेच राजीव गांधी यांच्या भूमिकांसाठी कलाकारांची शोधमोहीम सुरू झाली आहे. हिंदी, इंग्रजी आणि मराठी अशा तीन भाषांमध्ये हा चित्रपट बनणार आहे.

सन २००३-०४ मध्ये इंदिरा गांधी यांच्या जीवनावर चित्रपट; तसेच मालिका बनणार होती. नितीन केणी आणि काँग्रेसचे माजी खासदार उत्तमसिंग पवार मिळून त्यासाठी प्रयत्नशील होते.

पहिल्यांदा चित्रपट आणि त्यानंतर 'दूरदर्शन'साठी मालिका असे त्याचे स्वरूप होते. मनीषा कोईराला त्या चित्रपटात इंदिरा गांधींची; तर अमरीश पुरी मोरारजी देसाईंची भूमिका साकारणार होते. एन. चंद्रा या चित्रपटाचे दिग्दर्शन करणार होते. जवळपास दहा टक्के चित्रीकरणही झाले होते. मात्र अमरीश पुरी, लेखक कमलेश्वर तसेच कॅमरामन राजन किनागी यांचे निधन झाल्यामुळे प्रकल्प अर्धवट राहिला. आता तो नव्या स्वरूपात पुढे येणार आहे.

'आयएनएक्स मीडिया' आणि काँग्रेसचे माजी खासदार उत्तमसिंग पवार यांच्यातर्फे इंदिरा गांधी यांच्या जीवनावर हिंदी-इंग्रजीमध्ये मालिका '९ एक्स' या वाहिनीवर नोव्हेंबर महिन्यात येणार आहे. तसेच त्यानंतर तीन भाषांत चित्रपट बनविला जाणार आहे.

हा चित्रपट एकाच वेळी हिंदी आणि इंग्रजी या भाषांत चित्रित केला जाणार आहे. मराठीमध्ये तो डब होणार आहे. मनोज रस्तोगी आणि सुनील पांडे या चित्रपटाचे लेखन करणार आहेत.

इंदिरा गांधींच्या जन्मापासून ते ३१ ऑक्टोबर १९८४ रोजी झालेल्या त्यांच्या निधनापर्यंतचा प्रवास या चित्रपटात मांडला जाणार आहे.

*** दुर्मीळ हस्तलिखितांचे सर्वेक्षण व जतन यासाठी निधी**

जुन्या पोथ्यांचे आणि दुर्मीळ हस्तलिखितांचे सर्वेक्षण व जतन करण्यासाठी भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्थेला राष्ट्रीय पांडुलिपी अभियानातर्फे (नॅशनल मॅन्यूस्क्रिप्ट्स मिशन) साडेचार लाख रुपयांचे, तर ऋग्वेदाच्या हस्तलिखितांचे जतन करण्यासाठी 'विज्ञाननिधी' अंतर्गत पाच लाख रुपयांचे अनुदान मिळाले आहे.

संस्थेमध्ये हस्तलिखित स्रोत केंद्र आणि हस्तलिखित जतन केंद्र यापूर्वी सुरू केले होते. यामध्ये स्रोत केंद्रासाठी तीन लाख रुपयांचे, तर जतन केंद्रासाठी दीड लाख रुपयांचे अनुदान दिले असल्याची माहिती संस्थेच्या मानद सचिव डॉ. सरोजा भाटे यांनी दिली.

केंद्रीय अर्थमंत्री पी. चिदंबरम यांनी भांडारकर संस्थेला भेट दिल्यानंतर ग्रंथालयाच्या

'डिजिटलायझेशन' प्रकल्पासाठी दोन कोटी रुपयांची तरतूद केली होती. त्यासाठी आवश्यक माहिती विहित नमुन्यात पाठविणे गरजेचे होते. संस्थेने अनुदानासाठी अर्ज केला; पण त्यासोबत दिलेल्या माहितीमुळे समाधान न झाल्याने ही रक्कम संस्थेला उपलब्ध होऊ शकली नाही.

भाटे म्हणाल्या, ''दुर्मीळ हस्तलिखितांचे सर्वेक्षण करून विहित नमुन्यात ती माहिती संकलित करावयाची व ही संगणकीकृत माहिती दिल्ली येथील अभियानाकडे पाठवावयाची, असे सर्वेक्षणाच्या कामाचे स्वरूप आहे. हस्तलिखितांचे सर्वेक्षण आणि जतन याचे प्रशिक्षण संस्थेमार्फत दिले जाते. ज्या संस्थांना आवश्यकता आहे, अशांना ही सेवा देण्याचेही काम केले जाते. हस्तलिखितांचे जतन करण्यासाठी संस्थेने प्रयोगशाळा तयार केली आहे. राज्यातील ३२ केंद्रांमार्फत हस्तलिखित जतनाचे काम करण्यात येत असून आतापर्यंत ५२ हजार हस्तलिखितांवर प्रक्रिया झाली आहे.''

संस्थेकडे असलेल्या ऋग्वेदाच्या हस्तलिखितांचा 'युनेस्को'ने 'विश्व संस्कृती निधी'मध्ये समावेश केला आहे. या हस्तलिखितांचे जतन करण्यासाठी युनेस्कोने पाच लाख रुपयांचे अनुदान दिले आहे. त्यासाठी राष्ट्रीय पांडुलिपी अभियानाने युनेस्कोकडे अर्ज केला होता, अशी माहितीही भाटे यांनी दिली.

*** बौद्धिक संपदा हक्क**

भारतात बौद्धिक संपदा हक्कांबद्दल (आयपीआर) जागरूकता कमी असून, चीन आणि कोरिया हे देश या बाबतीत पुढे आहेत. पुण्यात लघुउद्योग क्षेत्रातील केवळ आठ टक्केच कंपन्यांना पेटंट मिळाल्याचे 'मराठा चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज अँड ॲग्रिकल्चर' (एमसीसीआय)संस्थेने केलेल्या सर्वेक्षणात आढळून आले आहे. हे सर्वेक्षण फेब्रुवारी ते जून दरम्यान करण्यात आले.

या बद्दल बोलताना 'एमसीसीआय'च्या आर्थिक सल्लागार आणि अर्थतज्ज्ञ मानसी फडके म्हणाल्या, 'आयपीआर' अंतर्गत 'एमसीसीआय'ने १३०हून अधिक लघुक्षेत्रातील कंपन्यांचा अभ्यास केला. त्यातील १३० कंपन्यांनी सर्वेक्षणात विचारण्यात आलेल्या प्रश्नांची उत्तरे दिली. पैशाचा तुटवडा आणि 'आयपीआर'बद्दल फारशी माहिती नसल्याने केवळ आठ टक्के कंपन्यांना 'आयपीआर' मिळाला आहे. मोठ्या कंपन्यांमध्ये 'आयपीआर'बद्दल जागरूकता असल्याने सत्तर टक्के कंपन्यांना पेटंट मिळाले आहेत. लघुक्षेत्रातील कंपन्या तयार करीत असलेल्या उत्पादनांपैकी काही उत्पादने पेटंटयोग्य असू शकतात. मात्र, या कंपन्यांमध्ये पेटंटबद्दल चुकीच्या संकल्पना आहेत. त्यामुळे त्या आपल्या उत्पादनाचे पेटंट घेण्याचा विचारदेखील करीत नाहीत.

''लघुउद्योग क्षेत्रातील कंपन्यांमध्ये पेटंटबद्दल जागरूकता निर्माण व्हावी, यासाठी 'एमसीसीआय'तर्फे चर्चासत्रांचे आयोजन करण्यात येणार आहे. 'एमसीसीआय'ने

‘आयपीआर’साठी ‘हेल्प डेस्क’ सुरू केला असून, दर बुधवारी तज्ज्ञ व्यक्तीमार्फत मोफत मार्गदर्शनाची सोय करण्यात आली आहे. आतापर्यंत लघुउद्योग क्षेत्रातील दहा कंपन्यांनी याचा लाभ घेतला आहे,’’ असे त्यांनी नमूद केले. पेटंटच्या बाबतीत चीन आणि कोरिया हे देश पहिल्या दहांमध्ये असून भारत विसाव्या स्थानावर आहे.

‘‘पेटंट को-ऑपरेशन ट्रीटी’च्या (पीसीटी) अंतर्गत कंपन्यांनी पेटंटचे अर्ज दाखल करायला हवेत. यामुळे आंतरराष्ट्रीय पातळीवर पेटंट मिळविणे शक्य होते. ‘होंडा मोटार’ने २५० उत्पादनांसाठी भारतासाठीचे पेटंट घेतले,’’ असे ‘आयपीआर’ विषयीच्या तज्ज्ञ भारती ढोले यांनी सांगितले.

‘एमसीसीआय’चे अध्यक्ष मधुर बजाज म्हणाले, की मोठ्या कंपन्या ‘आयपीआर’बद्दल जागरूक आहेत. परंतु लघुक्षेत्रातील कंपन्यांनी देखील याविषयी माहिती करून घेतल्यास त्यांना फायदा होणार आहे. भारतात सर्वाधिक पेटंट औषधनिर्मिती क्षेत्रातील कंपन्यांना मिळालेले असून त्याखालोखाल वाहनक्षेत्राचा क्रमांक लागतो.

*** निहलानी यांचा चित्रप्रवास**

‘‘मी कायम ‘अर्धसत्य’च्या मानसिकतेत राहून चित्रपट करू शकत नाही. काळ बदलला आहे. चित्रपट या माध्यमाचे अनेक प्रभावी आयाम पुढे येत आहेत. नवे तंत्र, नवी चित्रभाषा, नवे कलाकार आणि नवा आशय स्वीकारण्याची माझी मानसिकता आहे’’, त्यामुळे सध्या लोकप्रिय झालेल्या ॲनिमेशन माध्यमातील चित्रपटात मी गुंतलो आहे, असे ज्येष्ठ छायाचित्रणकार आणि दिग्दर्शक गोविंद निहलानी यांनी सांगितले.

‘फिल्म अँड टेलिव्हिजन इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया’मध्ये पत्रकारांशी बोलताना त्यांनी ‘शांतता! कोर्ट चालू आहे’ पासून सुरू झालेला आपला चित्रप्रवास स्पष्ट केला. आपल्या कलाकारकिर्दीचे विविध टप्पे आणि सहकारी कलाकार यांच्याविषयी तसेच नवे चित्रपट आणि ‘कॉर्पोरेट कल्चर’ विषयीही त्यांनी आपले विचार मांडले.

‘‘माझा चित्रप्रवास छायाचित्रणकलेपासून सुरू झाला. सुरुवातीलाच श्याम बेनेगल, पं. सत्यदेव दुबे, विजय तेंडुलकर, गिरीश कर्नाड यांच्यासारख्या मान्यवरांसह काम करण्याची संधी मला मिळाली,’’ असे सांगून निहलानी म्हणाले, ‘‘बेनेगल यांच्यासह मी अनेक लघुपटही केले. ‘आक्रोश’पासून मला माझी वाट सापडली. ‘गांधी’ चित्रपटाच्या निमित्ताने मला ॲटनबरोंसारख्या आंतरराष्ट्रीय स्तरावरील कलाकारासह ‘सेकंड युनिट डायरेक्टर’ म्हणून कामाची संधी मिळाली. ‘अर्धसत्य’, ‘विजेता’, ‘पार्टी’, ‘आघात’, ‘तमस’, ‘द्रोहकाल’, ‘हजार चौरासी की माँ’, ‘तक्षक’, ‘देव’ असा माझा प्रवास होत आला आहे. मात्र गेल्या दहा-बारा वर्षांत हिंदी चित्रपटसृष्टीत ‘कॉर्पोरेट कंपन्या’ आर्थिक पुरवठादार या नात्याने उतरल्या आहेत. मला हे बदल स्वागतार्ह वाटतात. या नव्या ट्रेंडमध्ये कामाचा माझा अनुभव चांगला आहे. ते दिग्दर्शकाच्या कामात ढवळाढवळ करत नाहीत. त्यामुळे मी समाधानी आहे.’’

‘‘मी छायाचित्रण करणारा असल्याने कॅमेरा, त्याची तांत्रिक अंगे, लायटिंग, दृश्यरचना, अवकाशमांडणी यांना महत्त्व देतो. साहित्यकृतींवर आधारित चित्रपटही मला समाधान देतात. ‘ॲनिमेशन’मधील ‘व्हिज्युअल डिझायनिंग’ हा मला सर्वांत आव्हानात्मक भाग वाटतो.’’

‘कॅमिलू’ या ॲनिमेशनपटाविषयी ते म्हणाले, ‘‘ग्राफिक्समध्ये मला प्रथमपासून रस आहे. नव्या माध्यमातही काम करण्याची इच्छा होती. या प्रकारचे चित्रपट आता आर्थिक स्तरावरही यशस्वी ठरू लागले आहेत. समाज, तंत्र, कल्पना बदलत आहेत. पूर्वी वेगवेगळ्या चित्रपटांसाठी आम्हाला पैशांसह अनेक गोष्टींची वानवा जाणवत असे. आता परिस्थिती बदलली आहे. कलात्मक आणि व्यावसायिक यांचे मिश्रण असलेल्या चित्रपटांना प्रेक्षक स्वीकारत आहेत. मात्र अजून हा प्रवास रूळला आहे, असे म्हणणे धाडसाचे ठरेल. प्रवास होण्याची संभावना त्यात आहे. चित्रपट ‘मल्टिस्टार’ वा ‘लो बजेट’ हे महत्त्वाचे उरले नसून तो चांगला असणे आवश्यक आहे,’’ असेही ते म्हणाले.

### * ‘लेन्साईट’ : चित्रपटविषयक नियतकालिक

‘फिल्म अँड टेलिव्हिजन इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया’तर्फे प्रकाशित होणाऱ्या ‘लेन्साईट’ या नियतकालिकाचे पुन:प्रकाशन निहलानी यांच्या हस्ते झाले. इन्स्टिट्यूटचे संचालक पंकज राग, टेलिव्हिजन विभागचे अधिष्ठाता आर. एन. पाठक, फिल्म विभागाचे अधिष्ठाता केदार आवटी आणि राष्ट्रीय चित्रपट संग्रहालयाचे संचालक विजय जाधव या वेळी उपस्थित होते.

‘‘मोठ्या प्रमाणावर चित्रपटांची निर्मिती होणाऱ्या आपल्या देशात चित्रपटविषयक नियतकालिकांची संख्या मात्र अत्यल्प आहे. त्यामुळे नव्या रूपातील ‘लेन्साईट’च्या माध्यमातून चित्रपटविषयक जाणिवा समृद्ध होतील’’, असे मत ज्येष्ठ दिग्दर्शक गोविंद निहलानी यांनी व्यक्त केले.

निहलानी म्हणाले, ‘‘मी चित्रपट माध्यमाचा अभ्यासक्रम पुण्यातूनच पूर्ण केला. त्या वेळी ‘अमेरिकन सिनेमॅटोग्राफी’ आणि ‘साईट अँड साऊंड’ ही दोनच नियतकालिके होती. भारतात अशी नियतकालिके का नाहीत, हा प्रश्न असतानाच ‘लेन्साईट’ सुरू झाले. छायाचित्रणकलेचा अभ्यास करणाऱ्या माझ्यासारख्या विद्यार्थ्याला त्याचा आनंद झाला. हे नियतकालिक बंद पडले याचे आश्चर्य वाटते. ‘कोडॅक’, ‘फुजी’ फिल्मतर्फे नियतकालिके प्रकाशित होतात. त्यामध्ये भारतातील चित्रपटविषयक लेखांचा समावेश असतो. नव्या रूपातील ‘लेन्साईट’चा संपादकीय दृष्टिकोन बदलला आहे. यात संगीत विषयाचाही समावेश आहे ही स्वागतार्ह बाब आहे. नव्या पिढीच्या अभ्यासकांसाठी चित्रपटाच्या विविध तांत्रिक अंगांवरील लेखांचा समावेश व्हावा. तसेच, यामध्ये आशियाई आणि युरोपियन चित्रपटांचाही वेध घ्यावा. चित्रपटाचा अभ्यास करणारे विद्यार्थी, शिक्षक आणि या माध्यमांचे तज्ज्ञ यांच्यासाठी हे उत्तम

व्यासपीठ आहे.''

*** ज्ञानोत्सव २००८ प्रदर्शनाचे उद्‌घाटन**

पुस्तक वाचनाने झालेले संस्कार आपली विचारशक्ती आणि निर्णयक्षमता प्रगल्भ करतात. सध्या वाचनसंस्कृती कमी होत नाहीये, तर उलट अनेक पर्याय उपलब्ध झाल्यामुळे लेखनातील विविधता वाढून नवे लेखक आणि वाचक निर्माण होत आहेत, असे मत ज्येष्ठ बॅडमिंटनपटू आणि 'क्रीडागाथा' पुस्तकाचे लेखक नंदू नाटेकर यांनी व्यक्त केले.

पाटील एन्टरप्रायझेसतर्फे आचार्य अत्रे सभागृहात भरविण्यात आलेल्या 'ज्ञानोत्सव २००८' या पुस्तक प्रदर्शनाचे उद्‌घाटन नाटेकर यांच्या हस्ते झाले. 'सकाळ'चे संपादक (साहित्य-कला-संस्कृती) सुरेशचंद्र पाध्ये प्रमुख पाहुणे होते.

उमेश पाटील, जयदीप पाठक, उदय पाटील या वेळी उपस्थित होते. या प्रसंगी विनिता आपटे यांनी नाटेकर यांची मुलाखत घेतली. आरोग्य, शिक्षण, विज्ञान, पाककला, धार्मिक ज्योतिष, प्रवासवर्णन अशा विविध विषयांवरील एक लाखांहून अधिक पुस्तकांचा समावेश असलेले हे प्रदर्शन ३१ ऑगस्टपर्यंत चालू होते.

नाटेकर म्हणाले, ''बालपणी झालेले साहित्य-संगीताचे संस्कार, खेळावरील प्रेम आणि श्रद्धा यामुळे मी उत्तम खेळाडू आणि जाणकार रसिक झालो. पालकांनी मुलांबाबत खेळाचा आग्रह धरताना त्यांच्या मनाचा आणि वयाचा विचार करणे आवश्यक आहे. यश मिळविताना कठोर परिश्रम घ्यावे लागतात.''

*** प्रमोद महाजन यांच्या जीवनपटावर प्रकल्प**

भारतीय जनता पक्षाचे दिवंगत नेते प्रमोद महाजन यांच्या जयंतीनिमित्ताने त्यांच्या जीवनपटावर आधारित एक प्रकल्प राबविण्यात येणार आहे. त्यासाठी महाजन यांच्याविषयीच्या आठवणी, फोटो, भाषणांच्या ध्वनिचित्रफिती पाठविण्याचे आवाहन त्यांची कन्या आणि प्रमोद महाजन प्रतिष्ठानच्या संचालिका पूनम महाजन-राव यांनी केले आहे. प्रमोद महाजन प्रतिष्ठान, ३ शिवकृपा, चंदावरकर क्रॉसलेन, माटुंगा (मध्य) मुंबई, ४०० ०१९ येथे संपर्क साधावा.

*** दत्ता हलसगीकर अमृतमहोत्सवी वाढदिवस**

कवी दत्ता हलसगीकर आयुष्यभर एक विचार घेऊन चालले आहेत. आजही तो विचार, मूल्ये कायम या कवीच्या सोबत असल्याचे मत निरूपणकार विवेक घळसासी यांनी सोलापूर येथे व्यक्त केले.

कवी हलसगीकर यांच्या अमृतमहोत्सवी वाढदिवसानिमित्त 'कोशातून बाहेर' हा काव्यसंग्रह, 'रंग झेलू गंध झेलू' हा कुमारांसाठीचा काव्यसंग्रह व 'स्वस्तिकाची पावले' या लेखसंग्रहाचे प्रकाशन घळसासी यांच्या हस्ते झाले. हिराचंद नेमचंद वाचनालयाच्या ॲम्फी थिएटरातील कार्यक्रमाचे आयोजन जवळीक संस्था व सुविद्या

प्रकाशनने केले होते. या वेळी वसुधा हलसगीकर, प्रकाशक बाबूराव मैंदर्गीकर, कलावंत शशिकांत लावणीस उपस्थित होते.

घळसासी यांनी पुस्तकाच्या आशयाविषयी विचार मांडले. जुने काही तरी सुटते आहे, याचे दु:ख हलसगीकर व्यक्त करतात. मात्र खूपसे अनावश्यक आहे ते नवी पिढी सोडते, त्यामुळे वाईट वाटण्याचे कारण नसावे. नव्या पिढीचे वाचन कमी असल्याच्या तक्रारीतही तथ्य नाही, नव्या पिढीचे लोक इंटरनेटवर मोठ्या प्रमाणावर माहिती वाचतात याकडे त्यांनी लक्ष वेधले.

ठरावीक कोशातून बाहेर येऊन जीवनाचा आस्वाद घेतला पाहिजे, अशी माझी भूमिका असून तीच पुस्तकात मांडली आहे असे हलसगीकरांनी सांगितले. 'अजूनही हात थकलेले नाहीत', या वाक्याला उपस्थितांनी प्रतिसाद दिला.

*** डॉ. द. भि. कुलकर्णी यांचा अमृतमहोत्सवी सत्कार**

''साहित्य, सृजन, प्रतिभा, आस्वाद यांना मूल्यात्मक स्थान नसेल, तो समाज केवळ साहित्य संमेलन भरविण्यातच रस मानतो. संमेलनाचे स्थळ कोणते असावे, हा प्रश्न अणुकरारापेक्षाही महत्त्वाचा ठरतो,'' असे भाष्य ज्येष्ठ समीक्षक डॉ. द. भि. कुलकर्णी यांनी केले.

द. भि. कुलकर्णी मित्रपरिवार आणि डी. एस. के. फाउंडेशनतर्फे ज्येष्ठ साहित्यिक प्रा. द. मा. मिरासदार यांच्या हस्ते डॉ. कुलकर्णी यांचा त्यांच्या अमृतमहोत्सवानिमित्त सत्कार करण्यात आला. शिवरंजनी कुलकर्णी, प्रा. रेखा इनामदार-साने, 'अंतर्नाद'चे संपादक भानू काळे, पत्रकार विवेक सबनीस आणि फाउंडेशनचे विश्वस्त प्रा. मोहन देशपांडे या वेळी उपस्थित होते.

कुलकर्णी म्हणाले, ''निर्मितीप्रक्रियेत वाचकाला सहभागी करून घेते ती उत्तम साहित्यकृती. कोणत्याही कलाकृतीचे रहस्य हे त्या कलाकृतीतच दडलेले असते. समीक्षकाला त्याची प्रचिती येते आणि हा प्रचितीचा क्षण तो लेखनातून रसिकांना वाटत असतो. समीक्षक आणि समीक्षा यांनी वाचनाभिमुख व्हावे, ही मागणी रास्तच आहे; पण समाजाने आणि वाचकाने साहित्याभिमुख होणे गरजेचे आहे. क्रिकेट आणि संगीताची भाषा आपण जाणून घेतो. भाषेमध्ये वाच्यार्थ, व्यंग्यार्थ आणि लक्ष्यार्थ चालत नसेल, तर हा समाज साहित्याभिमुख नाही, असेच म्हणावे लागेल. साहित्य आणि जीवनाच्या क्षेत्रात 'राइट टाइम' दाखविणारे घड्याळ अजूनही मी शोधतोच आहे.''

''आपली अनुभूती स्थूल झाली आहे. आपण भाषा आंधळेपणाने वापरणार असू तर आपली संवेदनशीलता आणि सर्जनशीलता क्षीण होऊन जाईल,'' याकडे त्यांनी लक्ष वेधले. ते म्हणाले, ''एकेका गावाचे कालपर्यंत जाणवणारे वैशिष्ट्य लुप्त झाले आहे. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमध्ये नगरी, महानगरी, ग्रामीण जाणिवा एकरूप झाल्या आहेत. प्रतिभावंत हा माणसाच्या अनुभवाची अनन्यता शोधण्याचा प्रयत्न करीत असतो.''

मिरासदार म्हणाले, ''अभ्यासू समीक्षक हे शास्त्रज्ञांसारखे असतात. जीवनाच्या प्रयोगशाळेत ते किती कष्ट घेतात याची कल्पना जगाला नसते. आपल्याविषयी चांगले लिहिणारे समीक्षक लेखकांना आवडतात.'' अंजली कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन केले. रमेश राठिवडेकर यांनी आभार मानले.

### * 'फास्ट फॉरवर्ड' : शरद पवार यांची भाषणे व मुलाखती

''देशातील शेतकऱ्यांच्या कल्याणाप्रमाणेच आर्थिक सुधारणा, खुले आर्थिक धोरण आणि जागतिकीकरणाबाबत तळमळ व निष्ठा असलेले शरद पवार हे 'भारत' व 'इंडिया' यांना जोडणाऱ्या पुलाचे प्रमुख प्रतिनिधी आहेत. जमिनीवर भक्कमपणे पाय रोवून भविष्याचा वेध घेण्यासाठी, नव्या कल्पना, नवी आव्हाने व नव्या संधी स्वीकारण्यासाठी मन खुले असणाऱ्या शरद पवारांसारख्या राजकीय नेत्याची देशाला गरज आहे,'' अशा शब्दांत पंतप्रधान डॉ. मनमोहनसिंग यांनी केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार यांचा गौरव केला.

श्री. पवार यांची भाषणे व मुलाखती यांचे संकलन असलेल्या 'फास्ट फॉरवर्ड' या पुस्तकाचे ७ ऑगस्टला पंतप्रधानांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. या पुस्तकाला पंतप्रधानांनीच प्रस्तावना लिहिली आहे. शरद पवार यांच्या विकासात्मक आणि आधुनिक दृष्टिकोनाचे व बारामती या त्यांच्या मतदारसंघाच्या विकासाबाबत पंतप्रधानांनी श्री. पवार यांचे भरभरून कौतुक केले. 'अशा प्रकारचा कार्यक्रम देशभरात अमलात आणून तो यशस्वी केल्यास गरिबी हटविता येईल, शेतकऱ्यांची स्थिती सुधारता येईल, तरुणांना रोजगार देता येईल व परिणामी देशाचा प्रचंड विकास करता येईल,' असा विश्वासही व्यक्त केला. कृषी क्षेत्रात गेल्या तीन वर्षांत झालेल्या ४.७ टक्के विकासदराच्या कामगिरीचे श्रेय पंतप्रधानांनी शरद पवार यांच्या नेतृत्वाला दिले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी खासदार सुप्रिया सुळे यांनी पंतप्रधानांचे, तर पवार कुटुंबीयांतर्फे शर्मिला पवार यांनी गुलशरण कौर यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. नागरी विमान वाहतूक मंत्री प्रफुल्ल पटेल यांनी प्रास्ताविक केले. डॉ. अरुण टिकेकर यांनी 'फास्ट फॉरवर्ड' पुस्तकामागची प्रेरणा सांगितली.

पंतप्रधानांच्या निवासस्थानी झालेल्या या समारंभास शिवराज पाटील, पी. चिदंबरम, लालूप्रसाद यादव, ए. आर. अंतुले, कमलनाथ, मुरली देवरा, प्रतिभा पवार, पृथ्वीराज चव्हाण, रेणुका चौधरी, डॉ. फारुक अब्दुल्ला, विजय मल्ल्या, राहुल बजाज, अमेरिकेतील उद्योजक संतसिंग अतवाल, राजीवप्रताप रूडी, महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री आर. आर. पाटील, विजयसिंह मोहिते-पाटील, अजित पवार, जयंत पाटील, पतंगराव कदम, नारायण राणे, सदानंद सुळे, रितू नंदा आदी उपस्थित होते.

## * तस्लिमा नसरीन भारतात परतल्या

स्वीडनमध्ये चार महिन्यांहून अधिक काळ व्यतीत केल्यानंतर वादग्रस्त बांगलादेशी लेखिका तस्लिमा नसरीन ८ ऑगस्टला भारतात परतल्या. इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळावर आगमन होताच सुरक्षा दलांकडून त्यांना अज्ञातस्थळी नेण्यात आले.

तस्लिमांनी १८ मार्चला भारत सोडला, त्याआधी पश्चिम बंगाल सरकारने त्यांची राज्यातून नाट्यमयरित्या पाठवणी केली होती. त्यानंतर काही दिवस जयपूर आणि सुमारे चार महिने दिल्लीत अज्ञातस्थळी राहिल्यानंतर तस्लिमांनी देश सोडला होता. इस्लामी मूलतत्त्ववाद्यांच्या 'हिट लिस्ट'वर असलेल्या तस्लिमांच्या व्हिसाची मुदत १२ ऑगस्टपर्यंत होती. भारतात कायम रहिवासासाठी त्यांनी सरकारला विनंती केली होती; मात्र सरकारने त्यावर अद्याप निर्णय घेतलेला नाही. तस्लिमांच्या पुढील योजनेबाबतही माहिती उपलब्ध झाली नाही. भारतातील वास्तव्याच्या काळात त्यांना भेटण्याची परवानगी कोणालाही देण्यात येणार नाही.

१९९४ मध्ये बांगलादेशातून परागंदा झाल्यानंतर तस्लिमांनी फ्रान्स, स्वीडन आणि भारतासह अनेक देशांत वास्तव्य केले. भारतातील सुरवातीच्या पाच वर्षांच्या वास्तव्यात त्यांनी अनेक देशांना भेटी दिल्या. 'द्विखंडितो' या त्यांच्या पुस्तकावरून इस्लामी मूलतत्त्ववाद्यांनी कोलकत्यात हिंसक आंदोलन केल्यानंतर पश्चिम बंगाल सरकारने त्यांना जयपूरला पाठविले. राजस्थान सरकारने त्यांना दिल्लीला पाठविण्याचा निर्णय घेतला. कोलकत्याला परतण्याची त्यांची इच्छा पश्चिम बंगाल सरकारने दुर्लक्षित केली. आपल्याला कोलकता सोडण्यास भाग पाडल्याची तक्रार तस्लिमांनी केली होती.

## * अमेरिकन तरुणाईत गांधीविचारांचे आकर्षण वाढतंय

''बहुतांश अमेरिकनांना गांधीजींचा परिचय मार्टिन ल्यूथर किंग आणि रिचर्ड ॲटेनबरोचा 'गांधी' हा चित्रपट या दोन गोष्टींतून झाला. त्यापूर्वी, गांधीविचार केवळ अभ्यासकांपुरताच मर्यादित होता. अमेरिकन समाजात वाढणाऱ्या हिंसेला उत्तर म्हणून आम्ही या महान महात्म्याच्या शिकवणुकीकडे पाहतो,'' असे मत प्रा. हॅझलग्रोव्ह यांनी व्यक्त केले.

अमेरिकेच्या इलिनॉईस राज्यातील 'मॅकहेन्री कौंटी कॉलेज'मध्ये इंग्रजीचे प्राध्यापक हॅझलग्रोव्ह यांच्यासह चौदा अमेरिकन शिक्षक-प्राध्यापक 'फुलब्राईट स्कॉलरशिप' अंतर्गत भारतामध्ये गांधीविचारांचा अभ्यास करण्यासाठी आले होते. पाच आठवड्यांच्या दौऱ्यात त्यांनी दिल्ली, डेहराडून, साबरमती आश्रम, वर्ध्याचा पवनार आश्रम आदी ठिकाणांना भेटी दिल्या. असगर अली इंजिनिअर, दिलीप चित्रे, शोभना रानडे आदी गांधीवादी विचारवंतांशी संवाद साधला.

हॅझलग्रोव्ह म्हणाले, ''वाढत्या चंगळवादाने तरुण अमेरिकन पिढी भरकटलेली आहे. महासत्तेचा उन्माद त्यांच्या वागण्यातून डोकावताना दिसतो. शांततेच्या मार्गाने

नैतिक मूल्यांची जपणूक कशी करावी, याचा धडा गांधीजींनी जगाला घालून दिला. मानवी सदसद्विवेकबुद्धीला आवाहन करणारा गांधीविचार हळूहळू का होईना अमेरिकन समाज आत्मसात करीत आहे.''

शिकागोच्या 'लॉयला कॉलेज'च्या लिंडा इटाह म्हणाल्या, ''अमेरिकन संघराज्यातल्या बऱ्याचशा विद्यापीठांनी आपल्या मानसशास्त्र, तत्त्वज्ञान, अध्यापन आदी अभ्यासक्रमांमध्ये गांधीजींच्या वाङ्मयाचा अंतर्भाव केला आहे. शेती, ऊर्जा आदी क्षेत्रांमध्ये गांधीजींनी सुचविलेल्या उपायांवर संशोधन सुरू आहे. कारण एकविसाव्या शतकात 'ग्लोबल वॉर्मिंग'च्या धोक्यापासून पृथ्वीला वाचवायचे असेल, तर गांधीविचारच आपला तारणहार आहे.''

भारतात ब्रिटिशकालीन कायदे अजूनही आंधळेपणाने वापरले जात आहेत. वकिलांचा 'ड्रेसकोड' बदलण्याची गरज आहे. गांधीजींना अभिप्रेत असलेली न्यायव्यवस्था अमलात आणण्यासाठी वेगवेगळ्या पातळ्यांवर प्रयत्न होण्याची गरज आहे असे ॲड. सरादे यांनी सांगितले.

मूळच्या औरंगाबादच्या माधुरी देशमुख बत्तीस वर्षांपूर्वी अमेरिकेला आपल्या पालकांबरोबर गेल्या. अमेरिकन संस्कृतीत लहानाच्या मोठ्या झाल्या. तिथेच शिक्षण घेऊन शिकागोतील 'ऑक्टॉन कम्युनिटी कॉलेज'मध्ये इंग्रजी वाङ्मयाच्या प्राध्यापिका म्हणून कार्यरत झाल्या. संतसाहित्याचा अभ्यास करण्यासाठी चार वर्षांपासून त्या भारतात येत आहेत. जनाबाई हा त्यांच्या अभ्यासाचा विषय आहे. त्याबद्दल सांगताना देशमुख म्हणाल्या, ''गांधीजींच्या साहित्याचा अभ्यास करताना त्यांच्यावर महाराष्ट्रातील संतांच्या विचारांचा प्रभाव पडलेला मला जाणवला. त्यामुळे मी संतसाहित्याचा अभ्यास करण्याचे ठरविले. जवळजवळ सर्व संतांचे वाङ्मय मी अभ्यासले असून, सध्या जनाबाईंच्या साहित्यावर संशोधन करीत आहे.''

*** मराठी साम्राज्याचा सुवर्णमयी इतिहास**

मराठी साम्राज्याकरिता संत एकनाथांनी केलेल्या 'दार उघड बये दार' या आवाहनापासून ते 'मराठी पाऊल पडते पुढे' अशा शिवगीतांच्या सादरीकरणातून आणि अभिनेते राहुल सोलापूरकर यांच्या भारदस्त निवेदनातून 'द इंटरनॅशनल क्रिएटिव्ह क्लब'च्या वतीने छत्रपती श्री शिवाजी महाराज यांच्या जीवनावरील 'निश्चयाचा महामेरू' या कार्यक्रमाचा शुभारंभाचा प्रयोग बालगंधर्व रंगमंदिरात पार पडला. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जन्मापूर्वी महाराष्ट्रात मोगलांची जुलमी राजवट होती तिची माहिती देत राहुल सोलापूरकर यांनी कार्यक्रमाला सुरुवात केली. संत एकनाथांनी जगदंबेला केलेले 'दार उघड बये दार उघड' हे आवाहन गायक राहुल जोशी यांनी सादर केले. छत्रपती शिवाजी महाराज यांचा जन्म, बाजीप्रभू देशपांडे, प्रतापराव गुजर अशा सरदारांचे पराक्रम, शिवराज्याभिषेक, समर्थ रामदास अशा इतिहासाला उजाळा देत सोलापूरकर यांनी निवेदनातून दिला. प्रसिद्ध गायक

रवींद्र साठे, सुवर्णा माटेगावकर यांनी कुसुमाग्रज, गोविंदाग्रज, स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनावर रचलेली गीते सादर केली. 'जय देव जय देव जय शिवराया', 'सरणार कधी रण', 'वेडात मराठी वीर दौडले सात', 'हे हिंदू नृसिंहा', 'शूर आम्ही सरदार' अशा विविध गीतांचा यात समावेश होता.

या कार्यक्रमास कृष्णकान्त कुदळे, नगरसेवक दत्ता धनकवडे हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सहकलाकार राजू जवळेकर, केदार मोरे, अजय अत्रे, नीलेश देशपांडे, दर्शना जोग, सचिन इंगळे, सविता आपटे, सुनीता आपटे, संगीत नियोजक पराग माटेगावकर यांचा कार्यक्रमाच्या निर्मात्या मीनल खोत यांच्या हस्ते स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.

### * महिलांना संसदेत ५० टक्के आरक्षण मिळावे

लोकप्रतिनिधींनी चारपेक्षा अधिक वेळ निवडणूक लढवू नये, महिलांसाठी संसदेत ५० टक्के आरक्षण असावे, अशा मागण्या सामाजिक कार्यकर्ते मॅथ्यू मॅटम यांनी केल्या.

मेरीन्यूज व सिम्बायोसिस इन्स्टिट्यूट ऑफ डिस्टंट लर्निंग यांनी 'सिटिझन्स मॅनिफेस्टो : इंडिया २०६७' या विषयावर परिसंवाद आयोजित केला होता.

सिम्बायोसिस इन्स्टिट्यूट ऑफ मीडिया ॲण्ड कम्युनिकेशनचे संचालक प्रा. उज्ज्वल चौधरी, मेरीन्यूजचे विपुलकान्त उपाध्याय, 'लोकमत'चे महाव्यवस्थापक विनीत तिवारी, इंदिरा गांधी मुक्तविद्यापीठातील प्रा. सुभाष धुलिया, बायोटेक्नॉलॉजी विषयातील तज्ज्ञ डॉ. मनजितसिंग आदी या वेळी उपस्थित होते.

मॅटम म्हणाले, 'भारतात २०६७ पर्यंत समानता प्रस्थापित व्हावी. काहीच लोक श्रीमंताच्या यादीत झळकण्यापेक्षा सर्वच लोकांना मूलभूत सुविधा मिळाव्यात. कोणीही उपाशी राहणार नाही, अशी परिस्थिती निर्माण व्हावी. सामान्य लोकांच्या सहभागाशिवाय देशाची परिस्थिती बदलणार नाही. कारभारात पारदर्शकता, जबाबदारी व चांगले प्रशासन येण्यासाठी या मूल्यांचा प्रथम आपल्या घरात स्वीकार केला पाहिजे. शास्त्रीय दृष्टिकोनामुळेच खरा विकास होईल. शेतीचा विकास झाल्याशिवाय देशाचा विकास होणार नाही. विकासाची स्वप्ने पाहण्याबरोबरच निश्चित ध्येय ठरविले पाहिजे. ते ध्येय गाठण्यासाठी नियोजनपूर्वक प्रयत्न केले पाहिजेत.

डॉ. धुलिया म्हणाले, ''सध्या बातमी ही माहिती, शिक्षण व मनोरंजनासाठी राहिली नाही तर, केवळ फायदा मिळवून देणारे एक उत्पादन झाले आहे. त्यामुळे सनसनाटीला महत्त्व दिले जात आहे. मुंबई, दिल्लीत वाहिन्यांचे दर्शक जास्त असल्यामुळे तिथल्याच बातम्यांना महत्त्व दिले जाते. आपण कोणत्या प्रकारची माहिती जनतेला देत आहोत, याचा माध्यमांनी विचार केला पाहिजे. जनतेच्या विकासाला अग्रक्रम दिला पाहिजे.''

*** आतापर्यंत इतरांसाठी जगले, यापुढेही जगेन.**

८१ व्या वर्षात पदार्पण करत असले तरी आतापर्यंत इतरांसाठी जगले तशीच यापुढेही जगेन, असे प्रतिपादन ज्येष्ठ समाजवादी नेत्या मृणाल गोरे यांनी गोरेगाव येथे केले.

मृणाल गोरे यांनी ८१ व्या वर्षात पदार्पण केल्याबद्दल २ ऑगस्ट रोजी गोरेगाव नागरिक समितीतर्फे जवाहरनगर सभागृहात त्यांचा जाहीर सत्कार करण्यात आला. ''एवढा मोठा समारंभ पाहून थोडे ओशाळल्यासारखे वाटते, पण ज्यांना आपण न्यायालयात उभे केले होते त्या ए. आर. अंतुले यांनी स्वहस्ताक्षरात पत्र पाठवून आपल्याला शुभेच्छा दिल्या हे पाहून भारावल्यासारखे झाले'', असे यावेळी मृणालताई म्हणाल्या. गोरेगावकरांच्या वतीने मृणालताईंना शाल, श्रीफळ आणि स्मृतिचिन्ह प्रदान करण्यात आले. उपस्थित मान्यवरांनी आपल्या भाषणात मृणालताईंच्या नि:स्वार्थ कार्याचा आढावा घेतला. भाजपचे नेते राम नाईक, शिवसेना नेते आमदार सुभाष देसाई, आमदार पाशा पटेल, अभिनेते सदाशिव अमरापूरकर आदी मान्यवर उपस्थित होते.

*** निवडक किशोर : खंड ४-५**

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाने (बालभारती) 'निवडक किशोर दीर्घ कथा खंड ५' व 'निवडक किशोर एकांकिका खंड ४' नुकतेच प्रसिद्ध केले आहेत. या दोन्ही खंडांमध्ये १९७१ ते २००८ या कालावधीत 'किशोर'मध्ये प्रसिद्ध झालेल्या निवडक दीर्घकथा व एकांकिका यांचा समावेश आहे.

'निवडक किशोर दीर्घ कथा खंड ५' यात सतरा कथांचा समावेश आहे. यातील 'एका डोंगराची गोष्ट' व 'बनारसी मोहरत आहे' या दीर्घकथा पर्यावणाची काळजी कशी घ्यावी, याची जाणीव करून देतात. 'कथा गजराजांच्या' आणि 'बजरंगू' आपल्याला अलगद प्राणिजगतात घेऊन जातात. तर 'साक्ष इतिहासाची' ही कथा इतिहास जिवंत करतात. 'अरळम तरळम' ही गंमतगोष्ट मुलांच्या फार पसंतीची आहे. भा. रा. भागवत, धनश्री हळबे, वसंत शिरवाडकर, डॉ. बाळ फोंडके, भारत सासणे, वसुधा पाटील, लीला पाटील आदींच्या कथांचा समावेश यात आहे.

'निवडक किशोर एकांकिका खंड ४'मध्ये वेगवेगळ्या शैलीतील २३ एकांकिकांचा समावेश आहे. कल्पनारम्य, संगीतिका वगनाट्य, विनोदी प्रहसन, नाट्यछटा यात आहेत. छोट्या दोस्तांना शाळेच्या स्नेहसंमेलनात किंवा लहान-मोठ्या कार्यक्रमात सादर करता येतील, अशा या एकांकिका आहेत. वेशभूषा, रंगभूषा व नेपथ्य, एकांकिका कशी सादर करायची याची सविस्तर माहिती दिली आहे. रत्नाकरी मतकरी, शांता शेळके, सरिता पदकी, दासू वैद्य आदींच्या एकांकिकांचा समावेश करण्यात आला आहे.

'किशोर'च्या संपादिका ज्ञानदा नाईक म्हणाल्या, ''आतापर्यंत 'किशोर'मध्ये विविध साहित्य प्रकारांतील लेखन प्रसिद्ध झाले आहे. त्यातील कथा, कविता, ललित लेख, दीर्घकथा, एकांकिका गंमतगाणी आदी साहित्य 'निवडक किशोर'च्या माध्यमातून प्रसिद्ध करण्यात येत आहे.''

*** 'पुस्तके आणि चित्रपटांतून जनजागृती शक्य'**

वाचन संस्कृतीचा क्षय होत चालला आहे. नव्या संस्था-संघटनांची उभारणी करायची असेल तर पुन्हा पुस्तके आणि चित्रपट यातून जगजागृती करणे आवश्यक आहे, असे मत नाट्यअभिनेत्री ज्योती सुभाष यांनी व्यक्त केले.

एस. एम. जोशी सोशलिस्ट फाउंडेशन आणि प्रा. मधू दंडवते ग्रंथालय यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या 'क्रिएटिव्ह बुक ॲण्ड फिल्म क्लब'चे उद्घाटन ज्योती सुभाष यांच्या हस्ते करण्यात आले. ज्योती सुभाष म्हणाल्या की, मी राष्ट्रसेवादलात होते त्या वेळी नाटक, सिनेमा, संगीत या कलांना भरपूर वाव मिळत होता. त्या कलेच्या माध्यमातून जनतेचे प्रश्न हाताळले जात होते. लोकांची बौद्धिक भूक भागवली जात होती. चळवळी, आंदोलने यांना पाठबळ मिळत होते. एकांगीपणा कमी होण्यास मदत होत होती.

एस. एम. जोशी, राम मनोहर लोहिया आणि इतर समाजवादी नेत्यांचा सहवास मला लाभला, असे सांगून नरेंद्र चपळगावकर म्हणाले, ''ही माणसे चोखंदळ रसिक होती. अतिशय धकाधकीच्या राजकीय जीवनात साहित्य, संगीत व इतर कलांचा त्यांनी आस्वाद घेतला. समाजामध्ये जाणीव जागृती निर्माण व्हावी यासाठी सिनेमा आणि वाचन यांना मोठे महत्त्व आहे.''

*** अंधश्रद्धेला माझ्या जीवनात थारा नाही - रामगोपाल वर्मा**

माझे चित्रपट रहस्यमय असले तरी वैयक्तिक जीवनात मी अंधश्रद्धेला थारा देत नाही, असे मत प्रसिद्ध चित्रपट निर्माते व दिग्दर्शक रामगोपाल वर्मा यांनी व्यक्त केले.

वर्मा यांनी 'फूँक' हा चित्रपटाच्या निमित्ताने आकुर्डीतील जयगणेश फेम चित्रपटगृहात पत्रकार परिषद घेतली. वर्मा म्हणाले, ''शेकडो वर्षांपासून लोक अंधश्रद्धांवर विश्वास ठेवतात. सर्वसामान्य माणसाच्या अवतीभवती घडणाऱ्या अंधश्रद्धेवर आधारित घटनांचे अनेकांना नवल वाटते. त्यामुळे सर्वसामान्यांचा ज्यावर विश्वास बसतो तेच चित्रपटातून प्रभावीपणे मांडण्याचा माझा प्रयत्न असतो. चित्रपट निर्मिती क्षेत्रात स्पर्धा मोठी आहे. या क्षेत्राबद्दल जाणून घेण्यास उत्साही असणाऱ्या पिढीला त्यातील आव्हानांची कल्पना नसते. चित्रपटाचे नाव आणि त्याचे कथानक दोहोंनाही अनन्यसाधारण महत्त्व आहे. मात्र चित्रपटाने अधिक गल्ला जमा करावा या आशेने अंधश्रद्धेचा आसरा घेणे उचित नाही. चित्रपटाच्या नावात विशिष्ट अक्षर अथवा शब्दसंख्या असण्याचा अट्टाहास हल्ली काही निर्माते धरतात. मात्र माझ्या दृष्टीने हा

अंधश्रद्धेचा भाग आहे. चित्रपटाचे कथानक दमदार असेल व विषयाची मांडणी प्रभावी असेल तर प्रेक्षकही त्यास भरभरून प्रतिसाद देतात. हिंदीतील रहस्यमय चित्रपटांपैकी दो गज जमीन के निचे हा चित्रपट अधिक भावल्याचे वर्मा यांनी सांगितले.''

'फूँक' या चित्रपटाविषयी बोलताना ते म्हणाले, ''चित्रपटाचा विषय जादूटोण्यावर आधारित आहे. बालपणापासून आजतागायत आलेल्या अनुभवांचा विषय हाताळताना उपयोग केला आहे. हा चित्रपट प्रेक्षकांपुढे संभ्रम निर्माण करतो. अंधश्रद्धेला प्रोत्साहन देणे हा चित्रपटाचा उद्देश नाही.''

*** 'गुरू व ज्ञान हेच खरे सत्य आहे'**

''प्रत्येकाच्या आयुष्यात गुरूचे महत्त्व असते. गुरू हेच ज्ञानाचे दर्शन घडवितात. गुरू व ज्ञान हेच खरे सत्य आहे'', असे प्रतिपादन ह. भ. प. बाबामहाराज सातारकर यांनी पुणे येथे केले.

श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती ट्रस्टतर्फे चातुर्मासानिमित्त आयोजित 'ज्ञानेश्वरांचे अमृतानभव' या प्रवचनमालेत त्यांनी गुरूचे महत्त्व विशद केले.

ते म्हणाले, ''सध्या सामान्य वस्तूचे ज्ञान कोणी देत नाही. मग अध्यात्माचे ज्ञान कोण देणार? समाजात सगळीकडे धर्माच्या भिंती उभारल्या आहेत. त्यामुळे खरे ज्ञान मिळत नाही. ते कोणी द्यायचे व कोणी घ्यायचे, हीच खरी समस्या आहे. आपल्याकडे संतांच्या अध्यात्माचा सागर आहे. पण त्याचा आस्वाद कोणी घेत नाही हीच आपली शोकान्तिका आहे. सुधारक खूप असतात. बोलणारे खूप असतात. पण खरा सुधारक तोच जो कृती करतो. उपदेश देणारे भरपूर असतात. परंतु खरं ज्ञान देणारे अपवादात्मक आहेत. ज्ञानेश्वरांचे अध्यात्म हे खऱ्या निरश्या दुधासारखे आहे. त्यामध्ये कशाचीही भेसळ नाही. त्या निरश्या दुधाचा आस्वाद आज कोणी घेत नाही. ज्ञानेश्वरांचं अध्यात्म हे स्वानुभवातून प्रकट झालेलं आहे. त्यामुळे ते अमृतासारखे आहे.''

''गुरूला वंदन करून आशीर्वाद घेणे हा संस्कार आहे. गुरूला वंदन केल्यास त्याचा आशीर्वाद आपोआप आपल्याला मिळतो. गुरूचे ज्ञान मिळाल्यास जीवनातून मुक्ती होते. जीवनमुक्ती म्हणजे जीवन जगत असताना मनाला मिळणारा आनंद. अन्यथा मुक्ती ही मेल्यानंतरही मिळते. पण ज्याला जीवनमुक्ती मिळते तो खरा जीवनमुक्त असतो. आज वारकरी संप्रदायाची महती अमराठी लोकांनाही कळत आहे. अमराठी लोक ज्ञानेश्वरांचे प्रवचन मराठीत करण्यासाठी बोलवतात. कारण ज्ञानेश्वरांच्या ज्ञानेश्वरीतून अप्रतिम आनंद मिळतो. निवृत्तीनाथ हे ज्ञानेश्वरांचे थोरले बंधू असले तरी ज्ञानेश्वर हे त्यांना आपले गुरू मानत. कारण त्यांना ज्ञान देणारे हे निवृत्तीनाथ होते आणि ज्ञान हेच गुरू, असे ज्ञानेश्वरांनी म्हटले आहे.''

*** 'लोकसंग्रह हेच माझं टॉनिक'**

''वयाने मी ऐंशीच्या घरात पोहोचले असले तरी त्यातील सर्वाधिक म्हणजे साठ

वर्षांचा काळ चित्रपटसृष्टीत घालवला. त्यामुळे आज मागे वळून पाहताना मला फक्त तो सुवर्णकाळ दिसतो. नशिबाने मला सगळ्या चांगल्याच भूमिका मिळाल्या आणि त्या भूमिकांनीच मला मोठे केले. 'वहिनीच्या बांगड्या'मधील भूमिकेची लोक आजही आठवण काढतात. मला भेटायला येतात. लोकांच्यात राहायला मला आवडत असल्याने मी कधी एकटी पडले नाही किंवा या क्षेत्रापासून दुरावले नाही. मी वेगवेगळ्या कार्यक्रमांना जाते. जुन्या-नव्या मित्र-मैत्रिणींना भेटते आणि मला त्यात आनंद मिळतो. लोकसंग्रह हेच माझं टॉनिक आहे.'' ज्येष्ठ अभिनेत्री पद्मश्री सुलोचनादीदी आठवणींच्या दुनियेत रममाण झाल्या.

दीदी म्हणाल्या, ''पूर्वीपेक्षा कलाकार, टेक्नॉलॉजी कित्येकपट पुढारली आहे. इतर बाबतीत आपले सिनेमे इंग्रजीच्या तोडीस तोड झाले आहेत, पण त्यातील कथानक हरवतं आहे. आम्ही ज्या भूमिका केल्या ती कथानकं आम्हाला डोळ्यासमोर ठेवून लिहिलेली, स्त्रीप्रधान असायची. पण आजकाल सिनेमे हिरोप्रधान असतात आणि स्त्रीभूमिकेला दुय्यम स्थान असतं. त्यामुळे हिरॉईन शोभेच्या बाहुल्या झाल्यात. त्यांना चांगल्या भूमिका मिळत नाहीत.''

*** विलासराव म्हणतात, हीच पत्नी मिळू दे!**

तुळस हे सुखसमृद्धीचे प्रतीक. मांगल्याचे प्रतीक आणि वटवृक्षाला वटपौर्णिमेला प्रत्येक सुवासिनी प्रदक्षिणा घालून जन्मोजन्मी हाच पती मिळू दे असे साकडे घालते. पण वटवृक्षाला जर पतिराजांनी प्रदक्षिणा घातल्या तर ते काय म्हणतील?

राज्याचे मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांच्या सुविद्य पत्नी वैशाली देशमुख, उपमुख्यमंत्री आर. आर. पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत 'आकाश पेलताना' हा गीत व संगीतावर आधारित नृत्य कार्यक्रम यशवंतराव चव्हाण केंद्राच्या सभागृहात झाला. या वेळी नीला सत्यनारायण यांनी वैशालीताईंना तुळस भेट दिली तर मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांना वटवृक्षाचं रोप दिलं. इतकंच नव्हे तर, नीलाताईंनी त्यांना 'आपण काय म्हणाल?' असं विचारलं. हजरजबाबी व मिश्कील विलासराव तत्काळ वैशालीताईंकडे पाहत उद्गारले, 'जन्मोजन्मी याच पत्नी मला लाभू देत म्हणून पुढच्या वर्षी मी वटवृक्षाला फेऱ्या मारीन' आणि एकदम हास्याचा धबधबा सभागृहात उसळला.

*** भांडारकर संस्थेचे आधुनिकीकरण**

केंद्र सरकारने यंदाच्या अर्थसंकल्पात भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्थेच्या आधुनिकीकरणासाठी दिलेल्या पाच कोटी रुपयांच्या निधीतून आता संस्थेचा चेहरामोहरा बदलणार आहे. या आधुनिकीकरणाला यंदा प्रारंभ करण्यात येणार आहे. त्यात आंतरराष्ट्रीय स्तरावरील संशोधकांसाठी सुसज्ज वसतिगृह बांधण्यात येणार आहे.

केंद्र सरकारने मंजूर केलेला निधी संस्थेला या वर्षी मिळाला. त्यातून संस्थेच्या

आधुनिकीकरणासह अन्य विकासाची कामे हाती घेण्यात आली आहेत. याबाबत भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्थेच्या मानद सचिव सरोजा भाटे म्हणाल्या, की केंद्राकडून मिळालेल्या निधीतून आधुनिकीकरणाच्या आवश्यक बाबींना प्राधान्य देऊन त्या पूर्ण केल्या जातील. संशोधनाच्या निमित्ताने संस्थेत येणाऱ्या आंतरराष्ट्रीय स्तरावरील संशोधकांच्या निवासासाठी सुसज्ज असे मोठे वसतिगृह संस्थेच्या आवारात बांधले जाईल.

याबाबत काही इंजिनिअर्सशी चर्चा झाली असून त्याबाबतचा आराखडा तयार करण्यात येत आहे.

आधुनिकीकरणाच्या योजनेत चांगल्या सुविधांनी सज्ज असलेले मोठे सभागृह तसेच संस्थेच्या प्राचीन इमारतीचे नूतनीकरणासह सीमाभिंतीच्या कामांनाही प्राधान्य दिले जाईल, असे भाटे म्हणाल्या. संस्थेतील कर्मचाऱ्यांचे वेतन, त्यांच्या निवासस्थानाचे नूतनीकरण यासाठी काही उपसमित्या स्थापन केल्या आहेत. संस्थेत असलेल्या दुर्मीळ हस्तलिखितांचा संग्रह करण्यात येणार असून त्यांचे जतन करण्यासाठी आवश्यक ते काम केले जाईल. महाभारतासंदर्भातील सांस्कृतिक संदर्भांचा संशोधकांना फायदा होणार आहे. त्याचे कामही हाती घेण्यात आले आहे.

युरोपियन आयोगाच्या सात लाख रुपयांच्या निधीतून हाती घेण्यात आलेल्या प्रकल्पांतर्गत 'क्रिटिकल एडिशन ऑफ कासिका वृत्ती'चाही संस्कृतच्या अभ्यासकांना फायदा होईल. त्याबाबतचे सॉफ्टवेअर विकसित करण्यता आले आहे, अशीही माहिती देण्यात आली.

### * सॅन होजे विश्व मराठी साहित्य संमेलन

अमेरिकेत सॅन होजे येथे अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळातर्फे आयोजित करण्यात येणाऱ्या पहिल्या विश्व मराठी साहित्य संमेलनाला महामंडळाचे सदस्य स्वखर्चाने जातील, असे २४ जुलैला झालेल्या बैठकीत जाहीर करण्यात आले. या संमेलनाची संपूर्ण जबाबदारी बे एरिया महाराष्ट्र मंडळ घेत आहे आणि ते महामंडळाच्या घटनेनुसार होत आहे.

या बैठकीत महामंडळाच्या पदाधिकाऱ्यांसह बे एरिया महाराष्ट्र मंडळाचे संदीप देवकुळे, अजय पटवर्धन, वसुधा पटवर्धन, येवलेकर आणि श्रोत्री हेही उपस्थित होते.

बे एरिया भागातील मराठीजनांचे भारतातील नातेवाईक तसेच संमेलनास उत्सुक असणाऱ्या मराठी रसिकांसह सुमारे दोन हजार जणांना सॅन होजे येथील संमेलनास जाता येईल, याची काळजी बे एरिया महाराष्ट्र मंडळाच्या सदस्यांनी घेतली आहे. त्यात व्हिसा प्रक्रियेसाठी मराठी रसिकांना मदत करणे, सॅन फ्रान्सिस्को, जगप्रसिद्ध गोल्डन गेट पाहण्यासाठी टूर, यासाठी भारतातून येणाऱ्या मराठीजनांसाठी प्रत्येकी ७५ हजारांचे पॅकेज देण्याचे घाटत आहे.

भारतातून येणाऱ्या रसिकांची उतरण्याची व्यवस्था सॅन होजे येथील हॉटेलांत

करण्यात येणार आहे. अडीच हजार क्षमतेचा हॉल आणि त्याला जोडून दोन हॉल असणाऱ्या कम्युनिटी हॉलमध्ये हे संमेलन भरेल. या दोन हॉलमध्ये पुस्तक प्रदर्शन आणि भोजनाची व्यवस्था असेल. मराठी पुस्तक विक्रेत्यांना आग्रहाचे निमंत्रण करण्यात येईल. संपूर्ण संमेलनाचे प्रक्षेपण उपग्रहाद्वारे काही मराठी चॅनेल्सवर करण्याची योजनाही बे एरिया महाराष्ट्र मंडळाने आखली आहे.

*** प्रियदर्शनी अकादमीचे पुरस्कार**

जागतिक पातळीवर विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्ती आणि संस्था यांचा मुंबईतील प्रियदर्शनी अकादमी दरवर्षी पुरस्कार देऊन सन्मान करते. यंदा या पुरस्कारांचे रौप्यमहोत्सवी वर्ष असून वैद्यकीय सेवेसाठी मुंबईतील ऑर्थोपेडिक सर्जन डॉ. आर. एफ. बेरामजी, आंतरराष्ट्रीय डिप्लोमसी पुरस्कार डॉ. शशी थरूर यांना तर उत्कृष्ट अभिनेत्रीचा स्मिता पाटील स्मृतिपुरस्कार प्रीती झिंटा यांना जाहीर झाला आहे.

याशिवाय जागतिक स्तरावरील दोन पुरस्कार जाहीर झाले असून बिझनेस लीडरशिप पुरस्कार कॅनडाचे जीम बॅलसी यांना तर सामाजिक कार्याचा पुरस्कार ऑस्ट्रेलियातील स्टिव्ह किलेलिआ यांना दिला जाणार आहे.

अकादमीचे अध्यक्ष नानिक रुपानी, व्यवस्थापकीय मंडळावरील सदस्य डॉ. रघुनाथ माशेलकर, अभिनेत्री पूनम धिल्लन यांनी या पुरस्कारांची घोषणा केली. वितरणसोहळा १९ सप्टेंबरला मुंबईतील ट्रॉयडेंट हॉटेलमध्ये होणार असून नागरी उड्डाणमंत्री प्रफुल पटेल आणि नोबेल चेरिटेबल ट्रस्टचे डॉ. मायकेल नोबल उपस्थित राहणार आहेत.

*** रघुवीर खेडेकर यांचा सत्कार**

तमाशाच्या माध्यमातून खेड्यापाड्यातल्या जनतेच्या मनोरंजनाबरोबरच समाजप्रबोधनाचे काम तमाशासम्राट रघुवीर खेडेकर यांनी केले. ही एक प्रकारची देशसेवा आहे, असे मत लोकशाहीर विठ्ठल उमप यांनी संगमनेर येथे तमाशासम्राट रघुवीर खेडेकर यांच्या अभीष्टचिंतन सोहळ्यात व्यक्त केले. अध्यक्षस्थानी डॉ. रावसाहेब कसबे होते.

श्री. उमप म्हणाले, ''साठ-सत्तर माणसांचा फड हसतखेळत सांभाळणारे रघुवीरसारखे कलावंत दुर्मीळ होत चालले आहेत.''

डॉ. तांबे म्हणाले, ''संगमनेरचे नाव सर्वदूर पोहोचविण्यात खेडेकरांचा मोठा वाटा आहे.''

*** अकोला येथे माईंड जिम कार्यशाळा**

भारत शिक्षण प्रसारक मंडळ, अकोला येथील शिक्षकांनी 'माईंड जिम अर्थात मनाची शाळा' हे पुस्तक वाचले. त्यामुळे प्रभावित होऊन संस्थेने ९५ शिक्षक,

प्राध्यापकांसाठी एक दिवसाची माईंड जिम कार्यशाळा अकोला येथे दि. १२ जुलै २००८ रोजी आयोजित केली. पुस्तकाचे अनुवादक व सुप्रसिद्ध साहित्यिक श्याम भुर्के यांनी मार्गदर्शन केले.

तणावमुक्ती, वादावादीला पूर्णविराम, निर्मितीक्षमता हे विषय प्रशिक्षणार्थींना फारच आवडले.

अकोला येथे पुन्हा एकदा कार्यशाळेचे आयोजन करण्याचा मनोदय त्यांनी व्यक्त केला.

पुण्यातील अभ्यासूंसाठी दि. २० सप्टेंबर २००८ रोजी माईंड जिम कार्यशाळा मेहता पब्लिशिंग हाऊस येथे दुपारी ४ ते ६ या वेळात होणार आहे.

### * नगराध्यक्षाच्या अनुभवांचा लेखाजोखा

सातारा शहरात छत्रपतींचे राजघराण्यातील मनोमिलनानंतर नगराध्यक्ष म्हणून डॉ. अच्युत गोडबोले यांची एक वर्षाकरिता निवड झाली. या कारकीर्दीतील कार्यवृत्तांताचे प्रकाशन मा. आ. शिवछत्रपती शिवेंद्रराजे भोसले यांचे हस्ते दि. ५ जुलै रोजी झाले. सार्वजनिक काम करताना राजकारणात आलेले अनुभव यात विशद केले आहेत. नगरपालिकेचा कारभार कसा चालतो ते यातून दिसून येते. (डॉ. अच्युत रामकृष्ण गोडबोले, ७७७ शनिवार पेठ, चिंतामणी नर्सिंग होम, सातारा. फोन: ९४२२०३८२११)

### * 'कन्नड अभ्यास वर्ग' उद्‌घाटन

मराठी - कन्नड स्नेहवर्धन केंद्रातर्फे शनिवार दि. २ ऑगस्ट २००८ रोजी 'कन्नड अभ्यास वर्ग' उद्‌घाटन व गतवर्षीच्या यशस्वी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र प्रदान करण्याचा समारंभ संत साहित्याचे अभ्यासक डॉ. अशोक कामत यांच्या हस्ते झाला. महाराष्ट्राच्या सीमेवरील राज्यातील भाषेची मराठी माणसाला ओळख असणे अत्यंत गरजेचे आहे. भाषेमुळे साहित्य व संस्कृतीचे संवर्धन होते. पूर्वीपासून मराठी व कन्नड भाषेला 'मायमावशी' म्हटले जाते. मराठीमध्ये एक म्हण आहे, कानडीने केला मराठी भ्रतार ! कन्नड भाषेतील साहित्य समृद्ध आहे. या भाषेतील साहित्याचा दर्जा उच्च आहे. राष्ट्रीय पातळीवर या भाषेतील साहित्याची जाण आहे. या भाषेतील साहित्यिकांना अधिक 'ज्ञानपीठ ॲवॉर्ड्' मिळाली आहेत. आंतरभारतीने सरू केलेले कार्य मराठी-कन्नड स्नेहवर्धन संस्था करीत आहे. मराठी भाषेव्यतिरिक्त इतर एखादी भाषा शिकणे आवश्यक आहे.

या समारंभास संस्थेचे अध्यक्ष डॉ. भा. र. साबडे तसेच गुलबर्गा येथील प्रा. डॉ. महागावकर उपस्थित होते. श्री. कृष्ण हेगडे, सेक्रेटरी, मराठी - कन्नड स्नेहवर्धन केंद्र यांनी सर्वांचे कन्नड भाषेत स्वागत केले. प्रमुख पाहुणे डॉ. कामत यांच्या हस्ते 'मराठी - कन्नड वर्ग व प्रगत कन्नड अभ्यास' वर्गाचा शुभारंभ झाला. गेल्या वर्षीच्या

यशस्वी विद्यार्थ्यांना प्रशस्तिपत्रे देण्यात आली.

*** 'लोकगीतकार दादा कोंडके' ग्रंथासाठी पुरस्कार**

'लोकगीतकार दादा कोंडके' ह्या डॉ. श्रीकांत नरूले यांनी लिहिलेल्या प्रबंधास चार वाङमयीन पुरस्कार प्राप्त झालेले आहेत. १) चंद्रकुमार नलगे सार्वजनिक ग्रंथालय पुरस्कार, २) प्रयाग साहित्य संमेलन पुरस्कार, ३) राधानगरी साहित्य संस्कृतीमंच ग्रंथ पुरस्कार, ४) अंकुर साहित्य संघ पुरस्कार

लोकगीतकार दादा कोंडके यांच्या समग्र चित्रपट गीतांचा आढावा डॉ. श्रीकांत नरूले यांनी घेतलेला आहे. डॉ. श्रीकांत नरूले हे चित्रपटगीतकार आहेत. त्यांनी दादांच्या गीतांचा सांगोपांग अभ्यास मांडलेला आहे.

*** 'शब्द - शोध' साहित्य पुरस्कार**

साप्ताहिक 'शब्द-शोध' वृत्तपत्राद्वारे साहित्य पुरस्कार प्रदान करण्यात येतात. १) काव्यसंग्रह - ७५१रु. २) कादंबरी - १३५१रु. ३) नाटक - १२०१रु. ४) एकांकिका - ५०१रु.

लेखक, कवींनी आपली पुस्तके पाठवावीत. साप्ताहिक शब्द-शोध कार्यालय, धनराज सिनेमा रोड, किनवट, जि. नांदेड ४३१ ८०१.

*** कंटकांजलि - ४० वर्षांनी दुसरी आवृत्ती**

आचार्य अत्रे यांचा 'झेंडूची फुले' हा विडंबन-काव्यसंग्रह मराठी वाङ्मयात प्रसिद्ध आहे. या धर्तीची रचना संस्कृत वाङ्मयात विरळा आहे. कंटकांजली (काट्यांची ओंजळ) हा मूळ संस्कृतात लिहिलेला विडंबन शैलीतला, प्राय: शार्दूलविक्रीडित वृत्तातला, समकालीन जीवनावर भाष्य, टीका-टिप्पणी अशा स्वरूपाचा काव्यसंग्रह आहे. विडंबन शैलीतली रचना उंट जातीच्या प्राण्यांना अर्पण केली आहे; कारण संस्कृत परंपरेत उंट हा प्राणी काटेखाऊ म्हणून प्रसिद्ध आहे. चित्रकार फडणीस यांच्या कुंचल्यातून अवतरलेले विनोदी चित्र मुखपृष्ठावर आहे. प्राचार्य न. गो. सुरु (इंग्रजी); प्रा. अरविंद मंगरूळकर (मराठी); कंटकार्जुन (संस्कृत) यांचा हा संग्रह ४० वर्षांपूर्वी प्रसिद्ध झाला. त्याची ही दुसरी आवृत्ती समकालीन वाचकांनाही हृदयस्पर्शी वाटेल. (कृ. श्री. अर्जुनवाडकर, ११९२ शुक्रवार पेठ, पुणे २. दीडशे रुपये)

*** 'संत गाडगेबाबा वाचनालय' साहित्य पुरस्कार !**

संत गाडगेबाबा सार्वजनिक वाचनालय, हाथरूण (जि.अकोले) तर्फे साहित्य पुरस्कार प्रदान करण्यात येतात. कादंबरी २००१ रु., नाटक १५०१ रु., कथासंग्रह १००१ रु., कवितासंग्रहास ५०१रु. असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

पुस्तके पाठविण्याचा पत्ता : कार्यवाह, संत गाडगेबाबा सार्वजनिक वाचनालय, 'योगायोग बिल्डिंग' मेन रोड, हाथरूण, जि. अकोला ४४४ १०९. फोन- (०७२५७) २२५५१८

*** व.पु. काळे स्मृतिप्रतिष्ठानतर्फे कथाकथन स्पर्धा**

व.पु. काळे स्मृतिप्रतिष्ठान तर्फे वपुंच्या सातव्या पुण्यस्मरणानिमित्त कथाकथन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धा शुक्रवार दि. १९ व शनिवार दि. २० सप्टेंबर २००८ रोजी टिळक स्मारक मंदिर, पुणे येथे घेण्यात येतील. वयोगट १५ ते ५० आहे. स्पर्धकाने शक्यतो वपुंची कथा सांगायची आहे.

स्पर्धेचा अंतिम निर्णय वपुंच्या स्मृतिनिमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमात प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक विजेत्या स्पर्धकांना पारितोषिक दिले जाईल. विजेत्या प्रथम तीन स्पर्धकांना कथाकथन करण्याची संधी दिली जाईल.

स्पर्धेचे नियम व अटींसहचे छापील फॉर्म, कार्यकारी विश्वस्त दि महाराष्ट्र एक्सिक्युटर अँड ट्रस्टी कं. प्रा. लि. पुणे – स. प. कॉलेज आवार, महाराष्ट्र बँक - टिळक रोड शाखेचे वर, टिळक रोड, पुणे ४११ ०३०. येथे रु.१००/- भरुन उपलब्ध होतील. बाहेर गावच्या स्पर्धकांनी वरील पत्त्यावर रु.११०/-ची मनिऑर्डर करुन फॉर्म मागवून घ्यावेत.

❒


## टी बुक क्लब १७ मधून प्रकाशित होणारी पुस्तके

### या योजनेतील सहाही पुस्तके घेणे आवश्यक !

| | | |
|---|---|---|
| द रनअवे ज्यूरी | जॉन ग्रिशॅम | अनु. अनिल काळे |
| एंजल्स डेमन्स | डॅन ब्राऊन | अनु. बाळ भागवत |
| फॉल्स इंप्रेशन्स | जेफ्री आर्चर | अनु. सुधाकर लवाटे |
| मार्कर | रॉबिन कुक | अनु. अनिल काळे |
| द सिमीऑन चेंबर | स्टिव्ह मार्टीनी | अनु. जयवंत चुनेकर |
| स्टेट ऑफ फिअर | मायकल क्रायटन | डॉ. प्रमोद जोगळेकर |

**सभासद फी ५०रु. सभासद व्हा व ५०% सवलत मिळवा!**

## नवे कोरे

# संतसूर्य तुकाराम

### आनंद यादव




**किंमत २२० रु. पोस्टेज २५ रु.**

संत तुकोबाराय सर्वसामान्य माणसाला फार जवळचे वाटतात. तुकोबांनी सात-आठ माणसांचं कुटुंब सांभाळलं होतं. बारा-पंधरा बिघे जमीन ते कसत होते. दुकान चालवीत होते, सावकारी करीत होते. त्यामुळे सामान्य माणसाला तुकोबा आपल्यातीलच एक वाटत होते... शिवाय तुकोबांचे अभंग सामान्य जीवनातील मथितार्थ अतिशय प्रभावीपणे सांगत होते. तुकोबाराय प्रापंचिक जीवन यशस्वीपणे जगले; पण त्यांच्या ध्यानीमनी 'पांडुरंग' तुडुंब भरून राहिला होता. त्यांच्या विचारांनी आकाशाची उंची गाठली होती. प्रत्यक्षात भौतिक जीवनातील युद्धसदृश कडव्या संसार-संघर्षाला तुकोबा तोंड देत असले; तरी मनोमन त्यांनी भौतिक आणि आध्यात्मिक जीवनाचा सुर्वणमध्य साधला होता. प्रपंच आणि परमार्थ ही दोन्ही पावलं समबल असल्याशिवाय आणि ती समान प्रेरणेनेच पुढे पडत गेल्याशिवाय मानवी जीवनाला पूर्णता प्राप्त होत नाही, याचे सजग आणि समर्थ भान तुकोबांना होते. महाराष्ट्रच्या भूमीत आपल्या विचारांनी वर्षांनुवर्ष तळपत राहिलेला हा संतमालिकेतील सूर्य!


मेहता पब्लिशिंग हाऊस,

# दखल

## ● सोल्झनित्सिनचा अंत - एका पर्वाची अखेर

साहित्यातील नोबेल पुरस्कार मिळूनही तो स्वीकारण्यासाठी प्रत्यक्ष उपस्थित राहण्याचे भाग्य न लाभलेल्या थोडक्या पुरस्कार विजेत्यांमध्ये रशियन लेखक अलेक्सांद्र सोल्झनित्सिन यांचा समावेश होतो. दि. ४ ऑगस्ट रोजी त्यांचे निधन झाले आणि रशियाच्या साम्यवादी इतिहासाचा एक साक्षीदार अनंतात विलीन झाला. दुसऱ्या महायुद्धात रशियन सैन्यात दाखल होऊन कमांडर म्हणून उत्तम कामगिरी करणाऱ्या सोल्झनित्सिनला स्टॅलिनला टीका केली म्हणून कारावासात डांबवण्यात आले आणि रशियाविरोधी कारवाया केल्याचा आरोप ठेवून आठ वर्षांची सजा सुनावण्यात आली. या तुरुंगवासातल्या अमानुष छळाची हकीकत सांगणारी त्यांची 'ए डे इन दि लाइफ ऑफ इव्हान डेनिसोविच' ही कादंबरी १९६२ मध्ये रशियातील नोव्ही मीर या मासिकात प्रसिद्ध झाली. या कादंबरीने रशियाच्या जनकल्याणवादी प्रचारातली हवाच काढून घेतली. हिटलरच्या नाझी राजवटीशी तुलना होऊ शकेल अशीच स्टॅलिनच्या कम्युनिझमची छळयंत्रणा रशियात कार्यरत होती याची खात्री पटवणारी ही कादंबरी पाश्चात्य देशातील डाव्या विचारसरणीच्या विचारवंतांना आणि हितचिंतकांना हादरा देणारी ठरली. स्टॅलिनच्या घोषणा आणि रशियातील दडपशाही यांची लक्तरे या कादंबरीमुळे जगापुढे आली. या कादंबरीची पेपरबॅक आवृत्ती लगेच निघाली. ती मला त्या वेळी वाचायला मिळाली. कम्युनिझमबद्दल त्या वेळच्या तरुणवर्गात असणाऱ्या आकर्षणाला ओहोटी लागली. दि डार्कनेस ॲट नून (आर्थर कोसलर), दि गॉड दॅट फेल्ड (कम्युनिस्ट विचारवंतांचे लेख), १९८४ (जॉर्ज ऑरवेल) या पुस्तकांनीही कम्युनिझमबाबत

भ्रमनिरास केला...



सोल्झनित्सिनची 'दि गुलाग आर्किपलॅगो' ही कादंबरी १९७०च्या आगेमागे रशियाबाहेर प्रकाशित झाली. तिच्यात रशियन तुरुंगातील थोडथोडक्या नव्हे तर २२७ बंदिवानांच्या जबान्यांचा अंतर्भाव केला गेला आहे. या पुस्तकाने पाश्चात्य जगात एकच हलकल्लोळ माजला. १९७० चा वाङ्मयविषयक नोबेल पुरस्कार सोल्झनित्सिनला जाहीर झाला. तो स्वीकारण्यासाठी त्याला स्वीडनला जाण्याची परवानगी देण्यात आली नाही.

नंतर १९७४ साली त्याला रशियातून हद्दपार करण्यात आले. अमेरिकेतील व्हेरमाँट राज्यात त्याला पुढची वीस वर्षे काढावी लागली. सोव्हिएट रशियाचे विघटन सुरू झाल्यावर १९८९ मध्ये मिखाईल गोर्बाचेव्हने ही बंदी उठवली आणि सोल्झनित्सिनला रशियात परत येता आले. रशियाचे त्या वेळचे अध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांच्याशीही त्यांचा खटका उडाला, परंतु पुढे त्यांचे मैत्र जुळले. बोरिस येलत्सिन यांनी देऊ केलेला ऑर्डर ऑफ सेंट अँड्र्यू हा पुरस्कार नाकारणाऱ्या सोल्झनित्सिनने गेल्यावर्षी पुतीनकडून हा पुरस्कार स्वीकारला.

सोल्झनित्सिनच्या निधनाने रशियाच्या विसाव्या शतकाचा साक्षीदार आणि रशियाचा विवेकशील प्रवक्ता हरपला आहे.

## ● जेफ्री आर्चर

काही लेखक बेस्ट सेलर म्हणून गाजतात. त्यांची पुस्तके लाखांनी खपतात. भरपूर पैसा मिळवतात. अशा लेखकांपैकी एक जेफ्री आर्चर नुकतेच भारतात येऊन गेले. त्यांचा पुण्यातही एक कार्यक्रम 'लँडमार्क' ग्रंथदालनात झाला. त्या वेळी दोन तास त्यांनी वाचकांशी दिलखुलास गप्पा मारल्या. आपल्या आयुष्यातील अनेक घटना सांगितल्या. आपल्या लेखनाची वैशिष्ट्ये आणि लेखनाची प्रक्रिया यावर प्रकाश टाकला.

१९७४ साली जेफ्री आर्चर यांच्यावर शेअरमार्केटमधील नुकसानीमुळे दिवाळखोरीची पाळी आली. तेव्हा त्यांनी 'नॉट ए पेनी मोअर, नॉट ए पेनी लेस' ही थरारकथा लिहिली. या कादंबरीने बेस्टसेलर ठरावे आणि आपले कर्ज फिटावे अशी त्यांची



इच्छा होती. परंतु बऱ्याच प्रकाशकांनी ती कादंबरी छापायला नकार दिला. शेवटी एका प्रकाशकाने ती काढायचे ठरवले आणि मानधन म्हणून ३००० पौंड दिले. त्याच्या कर्जाच्या मानाने हे मानधन म्हणजे दर्यामें खसखस, परंतु आर्चरचे नशीब जोरदार होते. या कादंबरीला बेस्टसेलर्सच्या यादीत स्थान मिळाले आणि त्यातून दिवाळखोरीची नामुष्की टळेल इतकी प्राप्ती त्याला झाली!

एखाद्या परीकथेत घडावे तसे सगळे घडले. अलीबाबाच्या गुहेत शिरण्याचा परवलीचा शब्दच त्याला मिळाला. एका पुस्तकाने त्याला काही कोटी डॉलर्सची कमाई करून दिली. त्यानंतर त्याच्या मानधनात वाढ होत राहिली. केन अँड एबल, शॅल वुई टेल दि प्रेसिडेंट, वगैरे १४ कादंबऱ्या त्याच्या नावावर आहेत. दि प्रॉडिगल डॉटर या चौथ्या कादंबरीसाठी त्याला १६ लाख पौंड एवढा अॅडव्हान्स मिळाला.

त्याच्या कुठल्याही कादंबरीचे वैशिष्ट्य म्हणजे कादंबरीच्या पहिल्याच पानावर तो कादंबरीचा संपूर्ण प्लॉट देऊन टाकतो. दि प्रॉडिगल डॉटरमध्ये अमेरिकेच्या अध्यक्षाची मुलगी त्याला विचारते, ''मलाही अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष व्हायचे आहे... मी होणारच'' संपूर्ण कादंबरीचे कथानक ती प्रेसिडेंट होण्याच्या दिशेने काय काय प्रयत्न करते त्यावर आधारलेले आहे.

जेफ्री आर्चरला लेखनातून अफाट पैसा मिळाला हे खरेच. त्यानेच पुण्याच्या आपल्या कार्यक्रमात त्याबद्दल एक किस्सा सांगितला.

एका प्रकाशकाने त्याला एक प्रस्ताव दिला, 'चार कादंबऱ्यांचा एक संच मला प्रकाशित करायचा आहे. प्रत्येक कादंबरीमागे वीस लाख डॉलर्स- म्हणजे चार कादंबऱ्यांचे ऐंशी लाख डॉलर्स मानधन देईन.' ऐंशी लाख डॉलर्स म्हणजे ३२ कोटी रुपये, हा हिशोब आपल्याला कळला तर आपली काय प्रतिक्रिया होईल?... जॅफ्री आर्चरने हा प्रस्ताव धुडकावून लावला. दुसऱ्या कोणीतरी लिहिलेल्या कादंबऱ्या आपल्या नावावर प्रसिद्ध करायच्या एवढा सोपा प्रस्ताव होता. काहीही न करता आपले नाव देण्यासाठी एवढी प्रचंड प्राप्ती होणार होती, पण आपल्या वाचकांची दिशाभूल करायला जॅफ्री आर्चर तयार झाला नाही.

'आपल्याला नोबेल पुरस्काराची हाव नाही. एक उत्तम स्टोरी टेलर म्हणून वाचकांचे रंजन करणे हेच माझे सर्वोच्च ध्येय आहे' असे त्याने सांगितले.

## ● प्रकाशकाला ग्राहक न्यायालयाने दंड ठोठावला

एखाद्या प्रकाशकाने पुस्तक काढतो असे म्हणून लेखकाकडून पैसे घेतले आणि पुस्तक काढायची टाळाटाळ केली तर त्याच्यावर फसवणुकीच्या आरोपावरून खटला भरता येतो आणि दंड वसूल करता येतो - असे ग्राहक न्यायालयाने उदाहरण घालून दिले आहे.

मराठी प्रकाशन व्यवसायात एकीकडे मौज, मॅजेस्टिक, पॉप्युलर, मेहता, कॉंटिनेंटल, साकेत यांच्यासारखे दिग्गज आहेत; तर दुसरीकडे लेखकांकडून पैसे घेऊन पुस्तक काढणारे फुटकळ प्रकाशकही आहेत. नवोदित लेखक-कवींना मोठ्या प्रकाशकांकडे थारा मिळत नाही. त्यामुळे फुटकळ प्रकाशकांकडे जाण्यावाचून गत्यंतर नसते. आपले पुस्तक छापून व्हावे म्हणून लेखक-कवींना खूप हौस असते; एखादे पुस्तक तरी नावावर असल्याशिवाय लेखक किंवा कवी म्हणून आपल्याला मान्यता मिळणार नाही म्हणून स्वत: पदरमोड करून पुस्तक काढायचीही तयारी ते दाखवतात.

नवथर लेखक-कवींच्या कविता किंवा लेख रविवार पुरवण्यांमध्ये छापून येतात; त्यामुळे त्यांना कोणीतरी वाचक तुमचे नाव वाचले म्हणून कौतुकाने सांगतात; त्यामुळे आपले लेखन वाचणारे भरपूर वाचक आहेत असा भ्रम त्या लेखक-कवींना होतो. असे सदर वगैरे वृत्तपत्रात चालू असेल तर लेखक हमखास म्हणतो, ''काय प्रचंड प्रतिसाद मिळतो... खूप फोन येतात.'' हा प्रचंड प्रतिसाद म्हणजे दोनचार फोनचा मामला. ''पुस्तक काढा. हजार प्रती प्रकाशन समारंभातच संपतील. लगेच दुसरी आवृत्ती काढावी लागेल'', असा आशावादही ते प्रकाशकाजवळ प्रकट करतात• तो त्यांचा उत्साह बघून प्रकाशक सावधपणे म्हणतो, ''उत्तमच आहे तुमचा विचार... मग फायदाच फायदा.. तुम्ही निम्मा खर्च करीत असाल तर पुस्तक काढतो.'' आता प्रकाशकाचा 'निम्मा' खर्च हा कदाचित् प्रकाशनाला लागणाऱ्या खर्चाच्या दुप्पट-तिप्पटही असू शकतो ही गोष्ट वेगळी!

पुण्याच्या साहित्य कलायात्री या प्रकाशन संस्थेने चंद्रपूर जिल्ह्यातील अंजली देवराव कोसुरकर या नवोदित कवयित्रीचा चारोळ्यांचा संग्रह प्रकाशित करायचे मान्य केले आणि तिच्याकडून ५८४० रुपये 'निम्मा खर्च' म्हणून मागितले... हे पैसे डिमांड ड्राफ्टद्वारे प्रकाशकाला मिळाले. आता खरे तर चारोळी संग्रह काढायला एवढा खर्च येतोच असे नाही. परंतु प्रकाशकाने ते पुस्तक काढायची टाळाटाळ चालवली. तशातच 'जगातील सर्वांत मोठे पुस्तक' म्हणून एक पोएट्री माइलसोन हे ५५५५ कवींचे पुस्तक काढायची घोषणा या प्रकाशन संस्थेने केली आणि त्यात कविता छापण्यासाठी ५०० रुपयांची मागणी अंजली कोसुरकर यांजकडून केली.

पंतप्रधान मनमोहनसिंग यांच्या हस्ते या पुस्तकाचे प्रकाशन करायची घोषणाही केली... कवयित्रीला हा सर्व प्रकार संशयास्पद वाटला. तिने जिल्हा ग्राहक मंचाकडे तक्रार दाखल केली. साहित्य कलायात्रीचे संस्थापक लोणकर आणि सचिव सुनीता आचरेकर यांच्याविरुद्ध फसवणुकीचा दावा लावला. जिल्हा ग्राहक तक्रार न्यायमंचाच्या अध्यक्षांनी चौकशी करून तक्रारीत तथ्य असल्याचे पडताळून घेतले. ५८४० रुपये दहा टक्के व व्याजाने परत करावे आणि कवयित्रीला झालेल्या मानसिक त्रासापोटी १० हजार रुपये तसेच खर्चासाठी ५ हजार रुपये तीन दिवसात द्यावेत असा आदेश दिला.

पुस्तकाच्या प्रकाशनाच्या बाबतीत असे फसवाफसवीचे प्रकार अधूनमधून कानावर येतात. लेखक-कवी अशा वेळी अक्कलखाती खर्च म्हणून गप्प बसतात. आपले हसे होईल म्हणून कुठे बोलत नाहीत. चंद्रपूर ग्राहक मंचाच्या या निकालाने अशा फसवाफसवीच्या प्रकरणात लेखक-कवींना दाद मागता येईल असा दिलासा दिला आहे. ग्राहकमंचाला त्यासाठी धन्यवाद.

## ● अमेरिकेतील अध्यक्षीय निवडणुकीत 'कॉमिक्स'द्वारे प्रचार



अमेरिकेतील अध्यक्षीय निवडणुकांची रणधुमाळी सध्या जोरात चालू आहे. या रणधुमाळीत कॉमिक्सचाही वापर यंदा होत आहे हे विशेष!

कॉमिक्स म्हटले की सुपरमॅन, बॅटमॅन, स्पायडरमॅन आपल्यापुढे उभे राहतात. त्यांचे अफलातून पराक्रम चित्रमालिकाद्वारे बघताना लहान मुलेच काय पण प्रौढ व्यक्तीही रंगून जातात. कारण आता कॉमिक्स ही केवळ छापील चित्रकथांच्या मासिकातूनच नव्हे तर भव्य चित्रपटांच्या माध्यमातूनही आपल्याला बघायला मिळतात. या वर्षी बॅटमन, आयर्न मॅन आणि हल्क या कॉमिक व्यक्तिरेखांभोवती चित्रित केलेल्या चित्रपटांनी बॉक्स ऑफिसवरही आपले श्रेष्ठत्व निर्विवादपणे प्रस्थापित केले आहे. या तीन चित्रपटांनी यंदा जगभरच्या प्रदर्शनातून सुमारे तीन अब्ज डॉलर्स मिळवले आहेत. इतर गाजलेल्या चित्रपटांपेक्षाही यांची ही कमाई जास्त उच्चांकाची आहे. काल्पनिक व्यक्तिरेखाही लोकांना खऱ्या वाटतात आणि त्यांचे पराक्रम पडद्यावर बघताना किंवा कॉमिक्सच्या पुस्तकातून चित्रमालिकेच्या स्वरूपात पाहताना



त्यांना आनंद मिळतो असा याचा अर्थ आहे.

अशा अनेक चित्रकथा नियमितपणे प्रसिद्ध होत आहेत. त्यांचे प्रकाशन करणाऱ्या प्रकाशन संस्थाही भरपूर उत्पन्न मिळवत आहेत. अमेरिकेतील सॅन दिएगो येथील आयडीडब्ल्यू पब्लिशिंग हाऊसतर्फे रक्तपिपासू प्राण्यांविषयी ही मालिका नियमित प्रसिद्ध होत असते. याच कंपनीने अमेरिकन राष्ट्राध्यक्षाच्या निवडणुकीत कॉमिक्सद्वारे प्रचार करण्याची कल्पना लढवण्याचे ठरवणे आहे. रिपब्लिकन पक्षाचे उमेदवार जॉन मॅककेन आणि डेमोक्रॅटिक पक्षाचे उमेदवार बराक ओबामा या दोघांच्याही जीवनचरित्रावर आधारलेल्या चित्रकथा आयडीडब्ल्यू पब्लिशिंग तर्फे तयार करण्याचे काम चालू आहे आणि ऑक्टोबर २००८ रोजी त्यांचे अधिकृत प्रकाशन होणार आहे. त्यांची नोंदणीही इंटरनेटवरून आणि मोबाईलवरून चालू आहे. २० नोव्हेंबरला प्रत्यक्ष मतदान आहे. त्याआधी ही कॉमिक्स बाजारात येतील. मतदारांना ती प्रभावित करतील असा कयास आहे.

आता अमेरिकन राष्ट्राध्यक्षावरील कॉमिक्स म्हणजे त्यांना कोणीतरी दुष्ट सैतान किंवा सैतानाचा प्रतिनिधी येऊन परग्रहावर पळवून नेणार अशातला काही प्रकार आपल्याला अपेक्षित असेल तर आपल्या कल्पनाशक्तीला थोडा लगाम लावायला हवा. तसा काही प्रकार या कॉमिक्समध्ये घडणार नाही. इथे या दोघांच्या आयुष्यातील महत्त्वाच्या घटना चित्रकथेच्या रूपात पेश करण्यात येणार आहेत. त्यामुळे त्यांच्या जीवनाबद्दल मतदारांना माहिती मिळेल; त्यांच्याबद्दल आत्मीयता वाटेल असा प्रचार मोहिमेच्या सूत्रधारांचा अंदाज आहे. ही कॉमिक्स इंटरनेटवरून डाऊनलोड करता येतील. लोकांचा विश्वास वृत्तपत्रातील लेख-बातम्यांपेक्षा कॉमिक्सवर जास्त आहे- असे त्यांना वाटते. त्याचा फायदा निवडणुकीतील मतदान आपल्याकडे खेचण्यासाठी व्हावा अशी त्यांची धारणा आहे... 'कॉमिक्स'च्या लोकप्रियतेबद्दल कोणाला शंका असेल तर - तिचे आता निरसन व्हावे.

**शंकर सारडा**

- मराठी भाषेची आद्य कवयित्री महदाइसा
- मराठी भाषा समृद्ध करणारे काव्य तिने लिहिले
- कनिष्ठ महाविद्यालयापासून ते उच्चतम पदव्यांच्या एम.ए., एम.फिल., पीएच.डी. अभ्यासात... संशोधनात महदाइसा उर्फ महदंबा भेटतेच
- तिच्या 'ढवळयांचा' अभ्यास तर अपरिहार्यच !
- महदाइसेची नितांत कृष्ण भक्ती, चक्रधरावरील तिची निष्ठा, तिने प्रश्नोपनिषद उपस्थित करून सर्वांचेच साधलेले प्रबोधन
- आध्यात्मिक मार्गावरील एक निस्सिम परमेश्वर भक्त
- परम सत्याची एक उपासक... महदाइसा

■

*आठशे वर्षांपूर्वीच्या महाराष्ट्रातील सामाजिक, धार्मिक, राजकीय स्थिती चितारणारी आणि साहित्यिक जाण देणारी महदाइसेच्या जीवनावर आधारित...*

***मराठीतील अशी पहिलीच कादंबरी***




## पहाट प्रभा

महदाइसेचे भावजीवन उलगडणारी
मनाला झंकृत करणाऱ्या शैलीतील
साहित्यकृती

■

**लेखिका : सौ. पद्मावती जावळे**
**पृष्ठे : २००**
**किंमत : २०० रुपये**

# सुमेरु प्रकाशन

सुमेरु

डी-६, राजहंस, टिळकनगर, डोंबिवली (पू.) ४२१२०१
✆ : ०२५१ - २४०४१४९/२४३५९६८/०२४०-२३५१८७८

## नीलम माणगावे

- मॉरिशसला गेलेल्या साठ कवयित्रीमध्ये अखिल भारतीय पातळीवर निवड
- सांगली - कोल्हापूर भागातील नामवंत लेखिका, कवयित्री
- ग्रामीण आणि नागरी जीवन - संस्कार
- विपुल लेखन आणि काव्य - लेखनही
- त्यांचीच एक विलक्षण, कल्पनारम्य, ग्रामीण जीवनावरील कादंबरी : खास कुमारांसाठी




# डॉलीची धमाल...

## कोण ही डॉली ?

- मोकाट उधळलेल्या बैलाला या लहान पोरीनं बांधलं
- उंच उडी मारून झाडाचे आंबेही पाडले
- थोड्या वेळात घर साफ...
- घरातील सामानांची व्यवस्थित मांडणी
- म्हशीची धारही झटपट
- हे सारं डॉली झटकन करते

**आहे तरी कोण ही अफलातून डॉली... ही डॉली आहे यंत्र-कन्या**

ग्रामीण जीवनावरील एक भन्नाट किशोर कादंबरी

**डॉलीची धमाल**

**लेखिका : नीलम माणगावे पृष्ठे : ८० किंमत : ८० रुपये**

**सुमेरु प्रकाशन**

डी-६, राजहंस, टिळकनगर, डोंबिवली (पू.) ४२१२०१


✆ : ०२५१ - २४०४१४९/२४३५९६८/०२४०-२३५१८७८

## पुस्तक परिचय

### बेस्ट सेलर्सच्या यादीत
### एका मोलकरणीचे आत्मकथन

# आलो आंधारि

**बेबी हालदार**
**अनु. मृणालिनी गडकरी**



**बा**रबाला हे एका डान्सिग बारमध्ये उन्मादक नृत्ये करणाऱ्या तरुणीचे आत्मकथन, सेक्सवर्कर हे एका वारांगनेचे आत्मकथन यांना भारतीय वाचकांकडून चांगला प्रतिसाद मिळाला. आता त्याच धर्तीवरचे आणखी एक आत्मकथन गाजते आहे. ते आहे एका बंगाली भाषक मोलकरणीचे! धुणंभांडी करणाऱ्या कामवालीचे! त्या आत्मकथनाचे लेखन हा भाग्ययोगच म्हणायचा- त्या कामवालीचा! तिचे नाव बेबी हालदार. तिचे शिक्षण पाचसात इयत्तांपर्यंत झालेले. तेराव्या वर्षीच लग्न झाले. पुढे हालच हाल!

वृत्तपत्रातील बातम्यांचे मथळे अडतखडत वाचण्यापर्यंत तिची झेप! परंतु हिंदीतील अग्रगण्य लेखक प्रेमचंद यांच्या नातवाकडे, प्रबोधकुमार यांच्याकडे मोलकरीण म्हणून तिला काम मिळाले. त्यांना तिच्या पूर्वायुष्यातील घटना कळल्या. तेव्हा त्यांनी तिला लिहिण्यासाठी प्रोत्साहन दिले. तिला मोकळा वेळ मिळेल अशी काळजी घेतली. तिच्या मोडक्यातोडक्या लेखनाला व्यवस्थित संपादनाद्वारे ठीकठाक केले. मात्र तिच्या मूळच्या विचारांना वा वर्णनांना कुठेही धक्का लागू दिला नाही. अस्ताव्यस्तपणा होता तो काढून सलग घटनाक्रम मांडला. मूळ बंगाली लेखनाचे हिंदी भाषांतर केले आणि बंगालीच्या आधी हिंदीत ते पुस्तक काढले. त्याचे मूळ नाव आलो-आंधारि हे कायम ठेवले.

आलो आंधारि म्हणजे प्रकाश आणि काळोख. काही स्पष्ट, काही अस्पष्ट. छाया प्रकाश. मराठीतही हेच नाव कायम ठेवून या बेबी हालदारच्या या पुस्तकाचे नुकतेच प्रकाशन केले गेले आहे. मृणालिनी गडकरींनी अत्यंत मन:पूर्वक हे मराठीकरण केले आहे.

या पुस्तकाचा इंग्रजी अनुवाद उर्वशी बुटालिया यांनी केला. त्याचे नाव ए लाइफ लेस ऑर्डिनरी. (Baby's response to her life was extra ordinary) या पुस्तकाने एकदम बेस्टसेलरच्या यादीत स्थान पटकावले. फ्रँकफर्टला बुकफेअरमध्ये अमिताव घोष, अरुंधती रॉय, किरण देसाई वगैरे मान्यवर निमंत्रितांबरोबर बेबी हालदारलाही निमंत्रित म्हणून बोलावण्यात आले. इतर परदेशी भाषांतही हे आत्मकथन प्रसिद्ध होत आहे. बेबीचे नशीब एकूण जोरावर आहे यात शंका नाही.

तिच्या आयुष्याची वाटचाल मात्र खडतर आहे. इतर सर्वसामान्य गरीब स्त्रीप्रमाणेच! तिचे वडील सैन्यात काम करणारे जवान. बेबीचा जन्म ते काश्मीरमध्ये असताना झाला. नंतर बदली झाली. ते मुर्शिदाबादला आले. तेथे आपल्या भावाकडे बेबीला व तिच्या आईला ठेवून नोकरीच्या गावी एकटे गेले. कधी पैसे पाठवत. कधी नाही. पुढे रिटायर होऊन दुर्गापूरला स्थायिक झाले. बेबीच्या थोरल्या बहिणीचे लग्न ठरले. पण वडील गायब! तेव्हा बेबीची आई धाकट्या मुलाला घेऊन घर सोडून परागंदा झाली. जाताना बेबीला दहा पैशाचे एक नाणे दिले... दीदी, बेबी आणि भाऊ तेवढे राहिले. दीदीचे लग्न काकांनी लावून दिले. बेबीवर वयाच्या दहाव्या वर्षी घराची जबाबदारी पडली... शाळा कशीबशी चालू...

स्वयंपाकपाणी... तशातच वडिलांनी दुसरे लग्न केले. सावत्र आई बेबीला खूप छळत असे. नंतर वडिलांना ट्रक ड्रायव्हरची नोकरी मिळाली. ते सतत फिरतीवर! मुलांचे हाल... तशात त्यांनी आणखी एक बाई धनबादला ठेवली.. तिच्याकडे बेबीला व मुलाला घेऊन गेले... तेथेही छळ!...

तेराव्या वर्षीच बेबीचे लग्न लावून देण्यात आले. तिचा नवरा सव्वीस वर्षांचा! एका छोट्या झोपडीत तो राहत असे. नवऱ्याच्या घरी गेल्यावर शेजारी त्याला बिछान्यावर बघून तिची छाती धडधडते. त्यानं 'आता असं राहणं मला जमणार नाही' म्हणून बळजबरीनं तिला जवळ ओढले. ती डोळे आणि तोंड मिटून घेते. तो जे काय करत होता ते मुकाट्यानं सोसत राहते... सकाळी भाऊ आल्यावर बेबी त्याला म्हणते, ''मला इथं नाही राहायचं. मला घरी घेऊन चल.''

एकाच गावात सासर-माहेर जवळजवळ असल्याने मग येणे-जाणे चालू राहते. तशातच बेबीला दिवस जातात... सातव्या महिन्यात डोहाळजेवण होते... बाळंतपणात फार त्रास होतो. सिझेरियन करावे लागते... रात्री पाणी घेतल्याने सकाळी तोंड आणि डोळे सुजतात... डॉक्टर रागावतात... मात्र मुलगा झाल्याने सर्वांना आनंद वाटतो... सासरे मुलाचे नाव गौतम ठेवतात. सासू-सासरे आपल्या खेड्यात काही दिवसांसाठी तिला घेऊन जातात... कोडकौतुक करतात. धाकट्या दिराबरोबर बेबीचे दिवस चांगले जातात.

नवरा संशयी. तो अधूनमधून बेबीला मारहाण करत राहतो. घरी पैसे देत नाही...

पुन्हा बेबीला दिवस जातात... दुसरा मुलगा होतो.

तिसऱ्या खेपेला मुलगी होते.

तीन मुलांचा खर्च भागवण्यासाठी बेबीला मिळेल ती कामे करणे भाग पडते. हालदार यांच्या मुलीनं काम करणं म्हणजे बापाचं नाक कापणं ही भीती पण नवरा मुलांच्या शिक्षणासाठी पैसे देत नसल्याने ती कामाला तयार होते. एका ब्राह्मण कुटुंबात ती कामाला सुरुवात करते... इतरही घरची कामे मिळवते... नवऱ्याला ते आवडत नाही, पण तो काही बोलत नाही. ''कधी कधी मला त्याची दया यायची. वाटायचं, की घर चालवण्याएवढे पैसे त्याला मिळतही नसतील.''

पुढे एकदा बेबीला तिची खरी आई भेटते. पण ती ओळख देत नाही. नंतर मात्र नवऱ्याला म्हणते, ''धाकट्या मुलाजवळ मी सुखी आहे... तुम्ही काय मोठे दिवे लावले? मुलांना नीट वाढवलं नाही. धाकटीला चांगलं स्थळ बघितलं नाही... मी कलकत्त्यातच होते. तुम्ही शोधले असते तर सापडले असते.''

बेबीचा मोठा मुलगा कामाला लागतो. दुर्गापूजेच्या वेळी पूजेसाठी निघते

तेव्हा संशय घेऊन तिचा नवरा तिला शिव्या देत मारायला धावतो... तेव्हा बेबी ठरवते, 'याच्याबरोबर आता रहायचे नाही.' ती माहेरी जाते. तिचे बाबा म्हणतात, ''तू नवऱ्याकडे जा. नाहीतर माझ्यासमोरून चालती हो.'' बेबी म्हणते, ''मी पुन्हा त्याच्याकडे जाणार नाही... त्याऐवजी जीव देईन.''

...बेबी मग हॉस्पिटलमध्ये नर्सचे काम करू लागते. स्वतंत्र राहू लागते. नंतर मोठ्या भावाकडे फरीदाबादला ती जाण्याचे ठरवते. दिल्लीला येऊन फरीदाबादला दादाकडे पोहचते. एकदोन नोकऱ्या होतात.

...शेवटी प्रबोधकुमारांकडे तिला काम मिळते. तिच्या मुलांच्या शिक्षणाची सोय होते... त्यांच्याच घरी राहण्याची सोय होते. वाचनाची संधी मिळते. लिहिण्याचा आग्रह होतो...

बेबी हालदारचे नशीबच बदलते. ''तू इथं फक्त मोलकरीण आहेस किंवा परक्या ठिकाणी आहेस असे मानू नकोस. हे घर आपलंच समज. मला मुलगी नाही. मी तुला मुलीसारखंच मानतो.''

तिनं लिहिलेला मजकूर एका मासिकात छापून येतो. 'आलो आंधारि' - लेखिका बेबी हालदार.

तिची धाकटी मुलगी ते नाव वाचते. ''मा, तुझं नाव ह्या पुस्तकात आलंय बघ.''

बेबी धावत जाऊन तातुशचे, प्रबोधकुमारांचे पाय धरते...

...एक साधीसरळ आत्मकथा. पण बेबी हालदारच्या अस्सल अनुभवांनी जिवंत झालेली!

**किंमत : १२०रु. सभासदांना : ८४रु. पोस्टेज : २५रु.**


**www.mehtapublishinghouse.com**

**प्रत्येक पुस्तकाची सविस्तर माहिती असलेली संपूर्णपणे मराठी असलेली वैशिष्ट्यपूर्ण वेबसाईट.**

कॅलिफोर्निया, व्हर्जिनी, न्यूजर्सी, वॉशिंग्टन, न्यूयॉर्क, व्हिस्कोसिन, कॅनडा, ऑस्ट्रेलिया, युनायटेड किंग्डम, हाँगकाँग, सिंगापूर, तैवान, युनायटेड अरब अमिराती, जर्मनी , चीन, कोरिया, स्वीडन, फ्रान्स, कुवेत,नेदरलॅण्ड, जपान, इस्त्रायल, आयरलॅण्ड इत्यादी जगातील विविध भागांबरोबरच भारतात व महाराष्ट्रात ही साईट सर्वाधिक लोकप्रिय ठरली आहे.


**आजच भेट द्या. व आपली मागणी नोंदवा.**

## पुस्तक परिचय

### भारतात गुप्तपणे अण्वस्त्रे पाठवण्याचा घाट घातला जातो, आणि-

# ऑपरेशन मोलॅसिस

**अरुण हेबळेकर**



**अ**रुण हेबळेकर यांच्या थरारकथा मराठी वाचकांना पाणबुड्या, प्रवाळकीटक, आदिम जमाती, तंत्र साधना यांच्या वेगळ्या जगामध्ये घेऊन जात असतात. १९७६ पासून त्यांच्या कथा-कादंबऱ्या प्रसिद्ध होत आहेत, आणि वाचकांचे लक्ष वेधून घेत आहेत.

त्यांचा जन्म मुंबईतला. बी. एस्सीपर्यंतचे शिक्षण मुंबईतल्या विल्सन कॉलेजमध्ये झाले. १९६४ मध्ये ते मुंबई विद्यापीठातूनच एम. एस्सी झाले. त्यानंतर डॉक्टरेट मात्र पणजी विद्यापीठातून घेतली आणि तेथेच सागरी विद्याशाखेत विज्ञानाचे अध्यापन करीत ते निवृत्त झाले. 'रिंग ऑफ सॅटर्न' ही त्यांची पहिली विज्ञानकथा 'सत्यकथा'मध्ये छापून आली ती १९७६ साली.

पुढे 'पाय नसलेली माणसे' (१९८२) हा दुसरा कथासंग्रह निघाला.

त्यानंतर त्यांना आपला थरारकथांचा सूर गवसला. सलोमीचे दुःख, रुद्रमुख, ओ जॉनी, एका कोळीयाने, वृक्मोहिनी, आदित्य, भृगुसेतू, प्रवाळ पारधी, मृत्युंजय.. या त्यांच्या काहीशा अद्‌भुतरम्य वेगवेगळ्या पार्श्वभूमीवरच्या कादंबऱ्या... त्यातले विषय मराठी माणसाच्या परिचित अनुभवविश्वापेक्षा खूप वेगळे... त्यामुळे त्यांचा एक खास वाचकवर्ग तयार झाला; परंतु 'मौज'ने त्यांचे लेखन आत्मीयतेने प्रसिद्ध केले. सभा-समारंभात ते कधी दिसत नाहीत. त्यामुळे त्यांचा तसा गाजावाजा झालेला नाही. तथापि त्यांच्या विषयांचे विलक्षण वेगळेपण आणि त्यांच्या कथानकांची आकर्षक गुंफण यामुळे त्यांच्यावर प्रेम करणाऱ्या वाचकांचा वर्ग त्यांच्यावर खूष असतो. इंग्रजी बेस्टसेलर्सचे, थरारकथांचे अनुवाद आपल्याकडे तुफान खपतात. अरुण हेबळेकर यांच्या मराठी थरारकथा स्वतंत्र असल्याने त्यांचे इंग्रजी अनुवाद खरे तर व्हायला हवेत. इंग्रजीमुळे त्यांना मोठा वाचकवर्ग मिळू शकेल.

'ऑपरेशन मोलॅसिस' ही हेबळेकरांची ताजी थरारकथा मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे बाजारात आली आहे. या थरारकथेची कल्पना नावीन्यपूर्ण आहे.

स्वातंत्र्याचे हीरकमहोत्सवी वर्ष आपण साजरे करीत आहोत आणि त्याच वेळी अनेक संघर्षांशी झुंज देत आहोत.

भरीत भर म्हणजे आपल्या भारतात सध्या जागोजाग अतिरेक्यांच्या बॉंबस्फोट मालिका चालू आहेत. अशा मालिकांचे मूळ अमेरिकेत, आफ्रिकेत असू शकेल अशी कल्पना फुलवणारी 'ऑपरेशन मोलॅसिस' ही अरुण हेबळेकर यांची ताजी थरारकथा.

होवार्ड टर हासेन हा पाताळयंत्री उद्योगपती देशोदेशींच्या अतिरेक्यांना शस्त्रे पुरवण्यासाठी, अण्वस्त्रे देण्यासाठी शंभर कोटी डॉलर्सचे कॉंट्रॅक्ट देतो. कार्तिकन हा भारतीय शास्त्रज्ञ अमेरिकेत कॉलोसस २०२० च्या प्रयोगशाळेत अणू संशोधन

केंद्रात संशोधक म्हणून काम करतो. या प्रयोगशाळेचा प्रमुख ब्रिगेडियर जनरल जिमी केर्न्स हा दक्षिण आफ्रिकेतल्या हिऱ्यांचा प्रख्यात व्यापारी होवार्ड टर हासेनच्या सांगण्यावरून शंभर कोटी डॉलर्सचा एक प्रकल्प हाती घेतो. त्यांपैकी दहा कोटी डॉलर्स ॲडव्हान्सही घेतो. होवार्ड अमेरिकेत मोठमोठी ट्रॅन्स्पोर्ट कॉंट्रॅक्टस घेत असतो. होवार्डने सोपवलेला प्रोजेक्ट नेमका काय आहे हे ब्रिगेडियर जनरल केर्न्स व्यतिरिक्त कोणालाही ठाऊक नसते. तो एकांडा शिलेदार असतो. डावपेचात हुशार. त्याच्या मनात काय आहे ते जाणणे अवघड. तरीही केर्न्सने अनेक लोकांना या प्रोजेक्टमध्ये घेतलेले असते.

केर्न्सची या प्रोजेक्टबाबतची स्ट्रॅटेजी कोणाही सहकाऱ्याला उमगलेली नव्हती. खरे तर केर्न्स हा सॅटर्नियम ४८६ द्वारे प्रखर शक्तीच्या आण्विक स्फोटकांची निर्मिती करीत होता. हे काम सरकारी. असे असूनही होवार्ड या हिऱ्यांच्या व्यापाऱ्याचे, ट्रॅन्स्पोर्ट कॉंट्रॅक्टरचे आणि ब्रुअररचे खाजगी काम तो कशा प्रकारे स्वीकारू शकतो असा प्रश्न त्याला सॅटर्नियम प्रोजेक्टचे इनचार्ज डॉ. फिल मूर विचारतात, ''स्ट्रॉंगरूममधील सॅटर्नियमच्या चाळीस पॅलटस माझ्या गैरहजेरीत कुठे गेल्या? कुणी नेल्या?'' या डॉ. मूरच्या प्रश्नावर ब्रि. ज. केर्न्स उत्तर देतो, ''त्या पॅलेटस राष्ट्राध्यक्षांच्या परवानगीनेच गेलेल्या आहेत. भारत आणि पाकिस्तानच्या शास्त्रज्ञांना त्या संशोधनासाठी देण्यात येणार आहेत. भारतात लक्ष्मीकांत हा शास्त्रज्ञ आहे. त्याने काही सॅंपल्स मागितली आहेत. एक वर्षापूर्वी तो येथे अमेरिकेत होता. आता भारतात आहे.''

''तो लक्ष्मीकांत खूप आळशी आहे. तो काही करू शकणार नाही... अविश्वसनीय आहे.'' मूर आणि केर्न्स यांच्यातील या बेबनावाचा दोघांनाही मन:स्ताप होणे स्वाभाविक होते.

कॉलोसस २०२० प्रकल्पात कार्यरत असणारा डॉ. कार्तिकन आपल्या बहिणीला, कुशला हीला, गुप्त लिपीत पत्रे पाठवतो. ही गुप्त लिपी इंग्रजी आणि तेलगू अक्षरांमधील अदलाबदल करून तयार केलेली असते. कार्तिकनचे फोनवरचे वा इंटरनेटवरचे संभाषण किंवा पत्रव्यवहार यांचे मॉनिटरिंग करण्याचे काम सुरक्षा अधिकारी ग्लेन क्रॉफर्ड करीत असे. कार्तिकनचा दुसरा एक सहकारी जॅक्स कार्तिकनला सांगतो, ''आपल्या स्ट्रॉंगरूममधील सॅटर्नियम ४८६ ची चाळीस पॅलेट्स नाहीशी झाली आहेत... सध्या जगात कुठेही महायुद्ध चालू नाही. कुठल्याही देशावर अणुबॉंब टाकायचा नाहीये... मग ही पॅलेट्स कशासाठी नेण्यात आली? मी केर्न्सला विचारले, तर केर्न्स म्हणाला, तुझे तोंड बंद ठेव.''

कार्तिकन त्यावर प्रतिक्रिया देतो, ''याचा अर्थ पॅलेट्स त्याच्या मर्जीनुसारच

नाहीशी झाली आहेत... तेव्हा उगाच गाजावाजा करू नकोस. मी या गोष्टीत नाक खुपसू इच्छित नाही.''

''तुला नाक खुपसावे लागेल. कालच ब्रिगेडियर जिमी केर्न्स तुझ्या देशाचा नकाशा घेऊन पश्चिम किनाऱ्यावरच्या बंदरांची पहाणी करीत होते. तेथे पॅलेस उतरवण्यात येणार आहेत. तुझ्या देशात अण्वस्त्रे उतरवण्यामागे त्याचा काय हेतू असावा हे कळत नाही. त्यात नाक खुपसणार नाही हे तुझे मत कायम असेल तर? तर ती चिंतेची बात आहे. तुझ्या देशात अणवस्त्रे उतरवली जाणार आहेत, आणि तू स्वस्थ बसून राहणार? त्यातला धोका तुला कळत नाही का?''

...कार्तिकन हे गुपित कळल्याने अस्वस्थ होतो. तो आपल्या बहिणीला आपल्या नेहमीच्या सांकेतिक भाषेत पत्र पाठवतो. इंटरनेटने ''येत्या काही दिवसात भारताच्या पश्चिम किनाऱ्यावर एक अण्वस्त्र फोडले जाण्याची शक्यता आहे. तरी सावध राहावे.''

हा संदेश गुप्त भाषेत अशा प्रकारे लिहिला गेला होता.

*'वानवे केदो होयेमेन फ्लेदेनोवे जेमग्दोस कोतेल्वेयले आक तएयेमनदे बिहेरे पेत्वेग्दो म्देक्वेने एदा नेलो मेयेह्दे लेदेय.'*

एवढेच नव्हे तर कार्तिकन स्ट्राँगरूमच्या पासवर्डचे कोडही बदलतो.

या गुप्त संदेशाचा अर्थ उलगडून पाहण्याचा प्रयत्न केला जातो. पण तो लागत नाही. प्रख्यात गुप्तहेर संस्थेचे कोडिंग एक्सपर्ट कार्तिकनच्या त्या कोडचा अर्थ लावता लावता मेटाकुटीला येतात.

आणखी धोका नको म्हणून कार्तिकनला मोटार अपघातात मेल्याचे दाखवावे म्हणून ब्रि. ज. केर्न्सच सुपारी देतो. स्टीअरिंगचा रॉड अर्धाअधिक कापून ठेवला, की काही वेळ कार ठीक चालते पण शार्प वळणावर रॉड तुटतो आणि खेळ खलास.

इन्शुरन्स कंपन्यांच्या हे लक्षात येतेच असे नाही. कारण रॉड पूर्ण तुटत नाही, फक्त वाकतो. त्यामुळे रॉड तुटण्याचे खरे कारण अज्ञातच राहते.

कार्तिकनच्या मृत्यूची बातमी त्याच्या बहिणीला कळवण्यात येते.

इकडे त्याच्या सांकेतिक कोडचे गूढ कसे सोडवावे या समस्येने केर्न्स त्रस्त असतो. स्ट्राँगरूमचा पासवर्ड बदलल्याने ती उघडण्याचे प्रयत्नही व्यर्थ जातात.

हे कोड उलगडायचे तर कार्तिकनच्या बहिणीलाच अमेरिकेत बोलवावे असे केर्न्स ठरवतो. तिने जातीने येऊन कार्तिकनची डेड बॉडी ताब्यात घ्यावी असे तो कळवतो. लक्ष्मीकांत या शास्त्रज्ञालाही केर्न्स आमंत्रण देतो.

ज्या विमानातून कुशला येते ते रोमला थांबलेले असताना कुशलाचे अपहरण होते... तिच्याबरोबर तिचा भारतीय पोलिस अधिकारी मित्र असतो.

...या पुढे रोममध्ये जे नाट्य घडते तेही चमत्कृतिपूर्ण असते.

केन्र्सला कुशलाच्या अपहरणाची बातमी कळते. होवार्ड टर या उद्योगपतीला साकडे घालून तिचा पत्ता लावण्याची कामगिरी रोममधल्या त्याच्या एजंटला सांगण्यात येते... शेवटी कुशल अमेरिकेला पोचते.. ब्रि. केन्र्स तिच्याकडून कार्तिकनच्या डायऱ्यात संदेश यांचे डीकोडिंग करून घेतो. त्यावरून तिलाही खूप माहिती झालीये म्हणून तिला मारायचे ठरवतो.

कुशला निसटते आणि अमेरिकन राष्ट्राध्यक्षांपर्यंत ती पोहोचते. एक प्रचंड कट उधळला जातो.

कुशला परतीच्या विमानात बसते तेव्हा तिच्या हातात राष्ट्राध्यक्षांनी दिलेला गुच्छ आणि दहा लाख डॉलर्सचा ट्रेझरी चेक असतो.

बि. केन्र्स, होवार्ड टर होसेन.... यांचे काय होते? ते मूळ कथेतच वाचणे इष्ट नाही का?

**किंमत : १२०रु. सभासदांना : ८४रु. पोस्टेज : २५रु.**


## प्रिय वाचकमित्रहो...

आपल्या सोयीसाठी **'मेहता पब्लिशिंग हाऊस'**चे ग्रंथदालन आठवड्याचे सातही दिवस नियमित सुरू राहील.

वेळ - सोम. ते शनि. ९.३० ते ६.३०

रविवारी सकाळी १० ते दुपारी ४

**सभासदांनी पुस्तकखरेदीस येताना मेंबरकार्ड जरूर आणावे.**




# डायमंड्स आर फॉरएव्हर

**इयान फ्लेमिंग**

अनु. अशोक पाथरकर

**किंमत १५०रु.**
**पोस्टेज २५ रु.**

टिफानी म्हणाली, ''हे बघ बाँड, मला बेडमध्ये यायला राजी करण्यासाठी क्रॅबमीट रेविगोट पुरेसे नाही आणि काहीही झालं तरी बिल तू देणार असल्यामुळे मी कॅव्हियार घेणार आणि तिच्याबरोबर तुम्ही इंग्लिश लोक ज्याला कटलेट म्हणता ते आणि पिंक शँपेन.''

टिफानी केस - आकर्षक, सोनेरी केसांची, भेदक नजरेची, बेफिकीर वृत्तीची मुलगी, जिच्यामुळे कोणीही सहज संकटात सापडू शकेल! हिऱ्यांचे स्मगलिंग करणारी टोळी आणि जेम्स बाँड यांच्यामध्ये ती उभी राहिली. अफ्रिकेपासून अमेरिकेपर्यंत पसरलेल्या या टोळीत हेरगिरी करण्यासाठी बाँडने तिला वापरले. पण अमेरिकेत खुद्द तोच संकटात सापडला आणि त्याला अनपेक्षित मदत लाभली ती या टिफानीची.


**मेहता पब्लिशिंग हाऊस,**

# पुस्तक परिचय

**सर्वात मोठा पक्षी कुठला?**
**आणि सर्वात लहान?**

## विज्ञान नवलाई
## पशू-पक्षी

**डॉ. बाळ फोंडके**



**आ**जचे युग हे विज्ञानाचे आहे, माहिती तंत्रज्ञानाचे आहे, ज्ञानसाधनेचे आहे. एखादी नवी कल्पना किंवा एखादे नवे तंत्र जर हाती लागले तर दहा-वीस वर्षांत माणूस जगातला सर्वांत श्रीमंत माणूस होऊ शकतो. आपल्या त्या कल्पनेचा वा तंत्राचा सबंध जगभर चाललेला मुक्त संचार बघू शकतो. एका कल्पनेचे पेटंट मिळाले तर त्याद्वारे कोट्यवधीची कमाई होऊ शकते.

सारांश, ज्ञान, नवे ज्ञान, नवे संशोधन, नवी कल्पना यांना आज खरे महत्त्व आहे.

नवे ज्ञान होण्यासाठी, नवे काही शोधून काढण्यासाठी, नवे वर्गीकरण करण्यासाठी उपलब्ध ज्ञानाचीही व्यवस्थित कल्पना हवी.

म्हणजे सध्या आपल्या अध्ययन क्षेत्रातील एखाद्या विषयाबद्दल जे काही ज्ञान आहे, त्याची यथायोग्य कल्पना हवी. तरच नवीन काय करता येईल हे उमजू शकते.

त्यासाठी पुस्तकांची, सीडींची मदत होऊ शकते. सध्या त्यासाठी प्रकाशक, शिक्षणतज्ज्ञ, उत्तमोत्तम साधनेही निर्माण करीत आहेत.

ज्ञान मिळविणे हे आपले उद्दिष्ट हवे.

विज्ञानविषयक अशी प्राथमिक माहिती देणारा सहा पुस्तकांचा एक संच मेहता पब्लिशिंग हाऊसने प्रसिद्ध केला आहे.

डॉ. बाळ फोंडके यांनी या पुस्तकांचा मजकूर तयार केला आहे.

**१. आपले पूर्वज** (प्राचीन सजीव, डासनोसॉर, गोरिला)

**२. प्राणिजगत** (कृमी-कीटक, सर्पसृष्टी, देवमासे-शार्क)

**३. पशूपक्षी** (शिकारी पक्षी, रानटी पशू, समुद्रातील सस्तन प्राणी)

**४. अंतराळ** (विमाने, अंतराळ यान, अंतराळ वेध)

**५. खगोल** (आपली सौर मालिका, सौरमालिकेपलीकडे, रात्रीचे आकाश)

**६. भूगोल** (आपली पृथ्वी, अस्वस्थ पृथ्वी, जगाच्या पाठीवर)

अशी ही सहा विषयांवरची पुस्तके भरपूर चित्रे व छोटी छोटी टिपणे याद्वारे अजिबात कंटाळा येऊ नये अशा प्रकारे तयार केली गेली आहेत.

प्रत्येक पुस्तकात तीन पोटभाग असून ते प्रत्येकी १० पृष्ठांचे आहेत. या १० पृष्ठात ४०-५० बाबींची माहिती प्रश्नोत्तराच्या रूपात देण्यात आली आहे. त्याशिवाय खरं की खोटं, नवलच अशा चौकटीही दर पानाआड आहेत. त्यातून खूप माहिती सूत्ररूपाने मिळू शकते.

'पशूपक्षी' ही पुस्तिका नमुन्यादाखल घेऊ. तिच्यातील शिकारी पक्षी हा पहिला विषय २ ते ११ पृष्ठात आला आहे.

या अकरा पृष्ठात पुढील प्रश्नांची उत्तरे देण्यात आली आहेत.

१. पक्षी कोणाला म्हणतात?

२. सर्वांत लहान पक्षी कोणता आहे?

३. सर्वांत मोठे पक्षी कोणते?
४. शिकारी पक्षी कोणाला म्हणतात?
५. हे पक्षी उत्तम शिकारी कसे बनतात?
६. ऑस्प्रे पक्षी शिकार कशी करतात?
७. खरं की खोटं? डायनोसॉरच्या काळात पक्ष्यांचा उदय झाला.
८. खरं की खोटं? काही पक्षी अंडी खातात.
९. पक्ष्यांच्या अंगावर पिसे का असतात?
१०. पक्षी स्वत:ला स्वच्छ कसे ठेवतात?
११. काही पिसे रंगीबेरंगी तर काही साधी असतात. का?
१२. खरं की खोटं? सर्व हंसक पक्षी गुलाबी रंगाचे असतात.
१३. पक्षी कसे उडतात?
१४. एकाच जागी उडत राहणं कोणाला जमतं?
१५. उड्डाण करण्यापूर्वी कोणाला धावावं लागतं?
१६. खरं की खोटं? पक्षी फक्त पुढच्याच दिशेने उडू शकतात.
१७. पक्ष्यांना चोच कशासाठी असते?
१८. ज्याची चोच पोटापेक्षाही मोठी असते तो पक्षी कोणता?
१९. चोचीच्या मदतीने झाडावर चढणारा पक्षी.
२०. खरं की खोटं? पक्ष्यांना दात असतात.
२१. पायांना इजा झाली तर पक्षी एका पायावर उभा राहू शकतो का?
२२. बांबूसारखे पाय कोणाचे असतात?
२३. बदकाच्या पायाची बोटं जोडलेली असतात. का?
२४. झोपलेले पक्षी झाडावरून खाली पडत नाहीत. का?
२५. खरं की खोटं? रात्री पक्षी झोपण्यासाठी घरट्यात जातात.
२६. पक्षी घरटी का बांधतात?
२७. पक्ष्यांची अंडी वेगवेगळ्या आकाराची असतात का?
२८. पक्षी आपल्या अंड्यावर का बसतात?
२९. अंड्यातून नुकतीच बाहेर पडलेली पिलं कशी दिसतात?
३०. खरं की खोटं? बदकाचं पिल्लू माणसाला आई समजत.
३१. आईच्या पाठीवर कोण बसून राहतं?
३२. अंडी उबवत बसणारा पिता कोण?
३३. आवाजाची नक्कल करणारा पक्षी कोणता?
३४. मादीला साद घालणारा नर कुठला?
३५. पक्षी का गातात?
३६. अदृश्य पंख असणारा पक्षी कोणता?
३७. डोडो कोण होता?

३८. पाण्याखाली राहणारे पक्षी कोणते?

३९. पेंग्विन आपल्या पंखाचा वापर वादावादीच्या वेळी करतात. खरं की खोटं?

ह्या प्रश्नांची उत्तरे आपल्याला देता येतात का ते पहा.

ती देता येत असतील तर शिकारी पक्ष्यांबाबतचे आपले प्राथमिक ज्ञान चांगल्या दर्जाचे आहे म्हणून स्वत:ची पाठ थोपटायला हरकत नाही.

जर बहुतांश प्रश्नांची उत्तरे नेमकी देता येत नसतील या पुस्तिकेचे वाचन करून आपले ज्ञान ताजे तरतरीत करता येईल.

ही पुस्तके मुलांसाठी आहेत हे खरे आहे; परंतु पालकांनाही आपले विविध विषयांवरचे ज्ञान अजमावून बघता यईल. त्यासाठी आपल्या मुलांबरोबर बसून प्रश्नोत्तराच्या रूपात एकमेकांना या पुस्तकातील तपशील आत्मसात करता यईल. पाचवी पास पेक्षा आपण कमी नाही असा स्वत:लाच मग निर्वाळा देता येईल.

भरपूर चित्रे, आकृत्या पुस्तकात जागोजागी दिल्या आहेत. त्यामुळे शब्द आणि चित्र यांचीही आपल्या डोक्यात व्यवस्थित नोंद होईल. जनरल नॉलेजच्या दृष्टीने या पुस्तिकांची उपयुक्तता निर्विवाद पटल्याशिवाय राहणार नाही.

'पशूपक्षी' या पुस्तिकेतील शिकारी पक्षी या प्रकरणाच्या संदर्भातील ३९ प्रश्न वर दिले आहेत, ते आपण पाहिले. त्याशिवाय रानटी पशू आणि समुद्रातील सस्तन प्राणी ही आणखी दोन प्रकरणे या पुस्तकात आहेत. त्यातही असेच सुमारे ४०/४० प्रश्न विचारून त्यांची उत्तरे दिली आहेत.

'रानटी पशू'मध्ये मांसाहारी पशू, चित्ता, वाघ, सिंह, तरस, जंगली कुत्रा, रानडुक्कर, लांडगे, अस्वल, पोलर बेअर, कोआला यांच्याविषयी माहिती प्रश्नोत्तर रूपात देण्यात आली आहे. ध्रुव प्रदेशातलं पोलर अस्वल सर्वांत मोठं असतं. त्याचं वजन असतं सहाशे किलो. **जगातले सर्वांत मोठे मांसाहारी श्वापद म्हणून त्याचा उल्लेख होतो.** आर्क्टिक महासागर गोठलेला असेल तेव्हा ही अस्वले पाण्यावरून चालू शकतात. पोलर अस्वलाचे नवजात बालक आईचे मलईदार दूध पितात आणि अल्पावधीतच मोठी होतात.

वाघ हा सहसा पाठीमागून हल्ला करतो. वाघाचा पंजा माणसाच्या डोक्याएवढा असतो. वाघांच्या पाच जाती आहेत. (सायबेरियन, चिनी, सुमात्रा, इंडो चिनी आणि भारतीय) जगातील वाघांची संख्या ५ हजारापर्यंत असावी. व्याघ्र कुळातला सर्वांत मोठा प्राणी म्हणजे सायबेरियन वाघ. लांबी ३.३ मीटर.

सर्वांत महाकाय सागरी सस्तन प्राणी म्हणजे निळा व्हेल. त्याची लांबी ३० मीटर आणि वजन १३० टन असू शकते. **किलर व्हेल हा ताशी १५५ किमी वेगाने पोहू शकतो.** सर्वांत जलद पोहणारा सस्तन प्राणी म्हणून त्याचे महत्त्व आहे. वॉलरस दातांचा उपयोग करून चालतो. सर्वांत खादाड असणारा सागरी सस्तन प्राणी निळा व्हेल हा होय. तो रोज ४ टन क्रिल्सचा फडशा पाडतो.


**किंमत : ३०रु. सभासदांना : २१रु. पोस्टेज : २५रु.**

# पुस्तक परिचय

**सैगल, मुकेश, रफी, तलत महमूद, हेमंतकुमार, मन्ना डे, नूरजहाँ, लता वगैरे गायकांच्या मंत्रमुग्ध करणाऱ्या स्मृती**

## स्वरगंगेच्या काठावरती

**सदानंद गोखले**



**सै**गल, मुकेश, महंमद रफी, तलत मेहमूद, हेमंतकुमार, किशोरकुमार, मन्ना डे, नूरजहाँ, शमशाद बेगम, सुरैया, लता मंगेशकर, गीता दत्त, आशा भोसले, सुमन कल्याणपूर... या संगीतकारांची नावे उच्चारली तरी त्यांच्या गाजलेल्या चित्रपटगीतांच्या ओळी ओठावर येतात आणि आपल्या आयुष्यातले त्या त्या गीतांनी भावचिंब करून ठेवलेले क्षण पुन्हा साद घालू लागतात. चित्रपटगीतांची ही जादू स्मरण रंजनाच्या महालाची एकाहून एक खोल, आतली दालने उघडते; आणि आपल्या जीवनातील आर्त- आल्हादकारक तारा छेडल्या जातात. आपला आंतरिक ठेवा त्या तारांच्या झंकाराने अभिमंत्रित होऊन उठतो.

अशा या गायकांच्या अद्‌भुत स्वरांच्या दुनियेत रमताना रसिकांना भूतकाळ पुन्हा जिवंत झाल्याची अनुभूती येते.

स्वरगंगेच्या काठावरती या पुस्तकात सदानंद गोखले यांनी या गायक-गायिकांच्या काल-कर्तृत्वावर, त्यांनी रसिकांच्या भावजीवनात उठवलेल्या स्वरांच्या मायावी गारुडावर हुरहुर लावणारे स्मृतींचे मोरपीस अलगद फिरवून, त्या जुन्या क्षणांना जाग आणली आहे. त्या त्या कलावंताच्या आयुष्यातल्या यशापशयाचे, हर्षखेदांचे जमेल तसे आलेख काढले आहेत. खरे तर 'दिया जलाव दिया जलाव । जगभर जगमग दिया जलाव' (सैगल) 'तू कहे अगर जीवनभर मैं गीत सुनाता जाऊँ', 'छोड गये बालम मेरा प्यार भरा दिल तोड गये' (मुकेश), 'तुमसे मुहब्बत हो गई है मुझे पलकों की छाँव में रहने दो' (महमंद रफी), 'घनश्याम नयनी आला सखे मी काजळ घालू कशाला?' (सुधीर फडके), 'ये हवा ये रात ये चाँदनी तेरी इक नजर पे निसार है, मुझे क्यूँ न हो तेरी आरजू तेरी जुस्तजू में बहार है' (तलत महमूद), 'है अपना दिल तो आवारा न जाने किस पे आयेगा' (हेमंत कुमार), 'न ये चांद होगा न तारे रहेंगे मगर हम हमेशा तुम्हारे रहेंगे' (हेमंत कुमार), 'मेरे सपनों की रानी कब आयेगी तू', 'कोरा कागज था ये मन मेरा, लिख दिया नाम जिस पे तेरा' (किशोर कुमार)... अशा नुसत्या मुखड्याच्या पंक्ती गुणगुणल्या तरी त्यांची चाल, त्या म्हणणाऱ्या नायक-नायिकांचे चेहरे, त्या वेळची त्यांची भावार्तता हे सर्व मनात आपोआप जागे होते. आपण ज्या वयात, ज्या मनोवस्थेत ते गीत प्रथम ऐकलेले असते त्या वयाचे, त्या मनोवस्थेचेही दृश्य समोर उभे राहते आणि आपल्याला त्या जमान्यात ते घेऊन जाते. संगीताची ही जादू विलक्षणच होय.

सदानंद गोखले यांनी चित्रपट संगीत, चित्रपट अभिनेते, चित्रपट नायिका यांच्यावर मन:पूर्वक प्रेम केले. त्याबद्दल मिळेल ती माहिती जमा केली. त्याबद्दल भरभरून लिहिले. आपल्या स्मरणरंजनामध्ये आपल्या समकालीन रसिकांनी समजावून घेतले. स्तंभलेखनाच्या निमित्ताने आपले पूर्वस्मृतींचे भांडार खुले केले. त्यातले काही लेखन पुस्तकरूपात प्रसिद्ध केले. वाचकांनीही

त्यांचे चांगले स्वागत केले.

‘स्वरगंगेच्या काठावरती’ या पुस्तकात आठ गायक आणि आठ गायिका यांच्या जुन्या गाजलेल्या गीतांचे स्मरण देत देत त्यांच्या कारकीर्दीवर धावती नजर टाकली आहे. जमेल तेथे त्यांच्या लौकिक यशाचा, अपयशाचा ताळेबंदही मांडला आहे. काय मिळाले, काय हरपले याचे हुरहूर लावणारे आलेखही ठळक रेषांत काढले आहेत. संगीतावरचे लेखन हे नेहमीच सुपरलेटिव्हमध्ये असते. विशेषणांची लयलूट करणारे असते. ‘त्याच्या स्वरातला अपरंपार गोडवा आणि व्यक्तिमत्त्वातील लाघव गेल्या दोन पिढ्यांच्या मनावर गारूड करून गेले.’ ‘एक विलक्षण नाट्य अन् सळसळत्या ऊर्जेने भारलेले जिवंतपण त्याच्या शब्दोच्चारामध्ये होते’, ‘मुकेश गीतामधल्या साऱ्याच भावभावना अपरंपार गोडव्यातून आणि निखळ शब्दोच्चारातून जिवंत करतो हे त्याचं मोठेपण...’, ‘शैलेंद्रची शायरी जेव्हा मुकेशच्या स्वरांनी सजून आली तेव्हा ती जनसामान्यांसाठी जीवनाचं तत्त्वज्ञान बनून गेली.’ ‘ही नज्म ऐकताना मिठ्ठास अन् दर्द यांचा मिलाजुला अंदाज केवढा श्रवणानंद देतो’, ‘रफीच्या स्वरांची जादू अशी असरदार की श्रोते धुंद-फुंद होऊन जात, कधी थिएटरमध्ये पायांनी ठेका धरत, कधी स्वरामधल्या अनिवार भावुकतेने अश्रू ढाळत, कधी स्वरांची मोहिनी झेलत नि:शब्द होत, कधी अर्थपूर्ण शायरीचा थेट आस्वाद घेत स्वरांच्या आवर्तनात गुंग होत.’... अशासारखी वाक्ये संगीताच्या जादूच्या अनुभूतीसाठी पानोपानी आली तरच संगीताचे मर्म आपल्याला उमजले, असे आत्मिक समाधान जणू रसिकाला लाभेल... एरव्ही नाही. संगीताची जादू जाणून घेण्यासाठी आणि विशद करण्यासाठी अशी शब्दांची उदात्तरम्य आतषबाजी करण्याची किमयाही साधायला हवीच!

काही गायकांच्या कलेवर प्रेम असूनही, त्या कलेचे चाहते असूनही, पैसा आणि कीर्ती मिळूनही त्यांच्या आयुष्याची परवड झाली. जे हक्काचे ते त्यांना मिळाले नाही. त्यांच्या जीवनातले काही फासे मनासारखे पडले नाहीत. अशा कलावंतांबद्दलची एक हळहळ, आर्त भावना रसिकांमध्ये ठुसठुसताना जाणवते. सदानंद गोखलेही अशा दुर्दैवी कलाकारांबद्दल हळवे, हळुवार होतात.

सैगलबद्दल ते लिहितात, ‘एवढी गुणवत्ता आणि लोकप्रियता लाभलेली असूनही कुंदनलाल सैगल अंतर्यामी अस्वस्थ का होता हे कोडं आजही उलगडलेलं नाही. मद्याच्या आहारी जाण्याइतकं कुठलं तीव्र दु:ख या असामान्य गायकाला होतं हे कळायला मार्ग नाही. एखादा पक्षी जन्मत:च घायाळ असावा तसा सैगल होता... कळत्या वयात वडिलांनी केलेली अवहेलना... व्यवहारी जगात भाबड्या सरळमार्गी जीवनाची झालेली कुचंबणा... कलकत्ता सोडून मुंबईला यावं लागण्याची अनिश्चितता... त्याला त्रासदायक ठरली असेल. मधुमेह आणि मद्यपान यात अडकलेला सैगल पत्नीसह जालंधरला विश्रांतीसाठी परतला. पण अवघ्या ४२

व्या वर्षी १८ जानेवारी १९४७ रोजी सैगलचे निधन झाले. त्याचे चाहते दु:खाने वेडे झाले.' (९)

दुय्यम नटांसाठी मन्ना डे गात राहिला. आघाडीच्या गायकांनी पार्श्वगायक म्हणून मन्ना डे ला स्वीकारलंच नाही. मुकेश- राजकपूर, महमद रफी-तलत महमूद - दिलीप कुमार, किशोर कुमार - रफी देव आनंद... अशी मन्ना डे ची स्वतंत्र ओळख पटली नाही हे दुर्दैव! लोकगीतं, शास्त्रीय ढगाची गाणी आणि विनोद नटासाठी गायिलेली गाणी यातून मन्ना डे आपलं गानकर्तृत्व सिद्ध करीत राहिली. त्याची खरी गुणवत्ता ओळखली फक्त शंकर-जयकिशन अन् एस.डी. बर्मन यांनी. (७५-७६)

शमशाद बेगम आणि नूरजहाँ या दोघी साधारण एकाच वेळी चित्रपटसृष्टीत दाखल झाल्या. दोघींना गुलाम हैदर यांनीच पहिली संधी देऊ केली. नूरजहाँ खानदानद्वारे तर शमशाद खजांची मधून पार्श्वगायिका म्हणून गाऊ लागली. नूरजहाँ गाणारी गायिका बनून लोकप्रिय झाली. शमशाद मात्र फक्त गात राहिली... नूरजहाँ पाकिस्तानात गेली. तिथे ती अव्वल दर्जा सिद्ध करीत आपला करिष्मा दाखवत राहिली. शमशाद इथेच राहिली. नव्या गायिकांच्या स्पर्धेत मागे पडत गेली. नंतर तिने राजीखुशीने अज्ञातवास पत्करला... नौशाद, नय्यर अशा उमद्या संगीतकारांनी तिला डावललं हेच खरं. (१७६) शमशाद बेगमवर अन्याय झालाय एवढं नक्की! (१११) तिला कुठलीही पारितोषिके मिळाली नाहीत. (११२)

गीता दत्त ही स्वयंभू गायिका. तिनं कुणाचं अनुकरण केलं नाही. १९४७ ते १९५८ अशी ११ वर्षे तिने आपल्या हस्की व्हॉइसने व धुंद नशिल्या स्वरांनी गानवेड्यांना अपार श्रवणानंद दिला. गुरुदत्त व गीता दत्त दोघांचेही ईगो टोकदार, प्रखर. दोघेही शीघ्रकोपी. त्यामुळे वादविवाद संघर्ष अटळ. गीता दत्तने दुसरीकडे गाता कामा नये हा दंडक तिची घुसमट करणारा ठरला. १९६४ मध्ये गुरुदत्तने आत्महत्या केली.

गीता दत्तवर आकाशच कोसळले. पदरात तीन वाढत्या वयाची मुले. आर्थिक पाठबळ कुठलेच नाही. गाणी गा म्हणून ऑफर्स येत नव्हत्या. स्टेज शोज् काही काळ केले. परंतु आयुष्यातले रिकामपण खात राहिले. पोखरत गेले. व्यसनांचीच सोबत राहिली. गीता दत्तच्या स्वरांचे वैभव मागे पडले. गुरुदत्तमुळे स्वीकारलेल्या बंधनांमुळे गीता दत्तचे करीयर थांबले. इतर गायिकांनी ती पोकळी भरून काढली. (१६०)

सुमन कल्याणपूरचा सीधा सच्चा रूप जनसामान्यांना आवडला. परंतु संगीतकारांनी पाठराखण न केल्याने तिला स्वेच्छेने निवृत्ती पत्करावी लागली. (१८०)

मुबारक बेगमने युगलगीतामध्ये महमद रफीबरोबर दिलकश रंग भरले. परंतु

तशी संधी नंतर तिला मिळाली नाही. बी ग्रेड देमार चित्रपटांतून ती गात राहिली. अफाट गुणवत्ता, मीठा सूर, होश उडवणारी अदा असूनही तिच्या वाट्याला चांगली गाणी फार कमी आली. (१८१)

प्रत्येक माणूसच आपले नशीब घेऊन येतो. कलावंतही त्याला अपवाद कसा असणार? नशिबात असते तसे यश, अपमान, मानसन्मान, आर्थिक वैभव, उपेक्षा व उभारीचे दान त्याच्या पदरी पडते... शापित यक्ष म्हणून कलावंताच्या भागात जे काही येते, ते रसिकांना कमीजास्त आनंद देऊन जाते एवढे मात्र खरे!

**किंमत : १५०रु. सभासदांना : १०५रु. पोस्टेज : २५रु.**

## ललित गद्य/पद्य

| | | |
|---|---|---|
| मालनगाथा : भाग २ | इंदिरा संत | २०० |
| मृद्‌गंध | इंदिरा संत | १६० |
| पासंग | दया पवार | १२० |
| जागल्या | दया पवार | ५० |
| लाइफ स्टाइल | सुधीर गाडगीळ | १२० |
| शेलका साज | शिवाजी सावंत | १४० |
| कांचनकण | शिवाजी सावंत | ८० |
| स्वप्नी जे देखिले | संकलन : अरुण शेवते | ९० |
| चित्तचित्रे | संकलन : अरुण शेवते | ९० |
| मैत्र जीवाचे | डॉ. भवान महाजन | १०० |
| बंजाऱ्याचे घर | यशोधरा भोसले | १५० |
| (स्वामीकार रणजित देसाई पुरस्कार २००३) | | |
| अमेरिकेतील पापनगरी एक वारी | डॉ. अनंत लाभसेटवार | १२० |
| या सुखांनो | सुरेश नाईक | १७० |
| (स्वामीकार रणजित देसाई पुरस्कार २००५) | | |
| स्वरगंगेच्या काठावरती | सदानंद गोखले | १५० |
| गीतकृष्णायन | प्रसाद औटी | १०० |

**पोस्टेज खर्च वेगळा**

**मेहता पब्लिशिंग हाऊस,**


## चिकन सूप फॉर द सोल
### भाग २

**जॅक कॅनफिल्ड**
**मार्क व्हिक्टर हॅन्सन**

---

**अनु. प्रज्ञा ओक**

**किंमत २००रु. पोस्टेज २५ रु.**




मनुष्याच्या लौकिक, तसंच शारीरिक आणि मानसिक आयुष्यात सतत स्थित्यंतर घडत असतात. त्या स्थित्यंतरांत माणसाची मानसिक मोडतोड होत असते आणि त्याच मोडीतोडीतून माणूस पुन्हा पुन्हा उठत असतो... आसपासच्या लोकांना प्रेरणा देत असतो... 'चिकन सूप'च्या या कथा म्हणजे माणसांतल्या विलक्षण ताकदीच्या कथा आहेत. मानवी स्वभावातल्या सूक्ष्मातिसूक्ष्म कंगोऱ्यांवर ऊहापोह करणाऱ्या या कथा, म्हणजे अनेकांच्या अंधाऱ्या मार्गावरच्या, रस्ता दाखवणाऱ्या ज्योती आहेत! ही प्रकाशाकडे नेणारी एक वाट.

**मेहता पब्लिशिंग हाऊस,**

# पुस्तक परिचय

### वृद्धाश्रमात राहाव्या लागलेल्या स्त्री-पुरुषांच्या आंतरिक भावभावना

## जळात सोडलेले दिवे

**अर्चना वर्टीकर**



**'ज**ळात सोडलेले दिवे' ही अर्चना वर्टीकर यांची पहिलीच छोटेखानी कादंबरी. राष्ट्रसेवा दलाच्या संस्कारात वाढलेल्या अर्चना वर्टीकर यांची रंजल्या-गांजल्यांबद्दलची कळवळ्याची वृत्ती त्यांना वृद्धाश्रमातील निराधारांच्या दु:खभोगाकडे लक्ष देण्यास प्रेरित करते. त्यासाठी वानप्रस्थ वृद्धाश्रम, सावली वृद्धाश्रम, रिमांड होम, मुलींचे सुधारक केंद्र, कोरेगाव पार्क अंधशाळा, अनाथाश्रम वगैरेंना वेगवेगळ्या निमित्ताने भेट देऊन वयस्क व्यक्ती आणि अनाथ मुले यांच्याशी संवाद साधला. त्याचा थोडाफार वापर करून आपल्या या कथावस्तूतले तपशील त्यांनी भरले आहेत.

जळात सोडलेले दिवे हे या वृद्ध-अनाथांचे प्रतीक म्हणून त्यांना भावले. हरिद्वारला भाविक सायंकाळी दिवे लावून ते नदीच्या प्रवाहात सोडतात. ते लाटांवर हिंदकळत काही वेळ वाऱ्याला तोंड देत पुढे जातात. कोणी वाऱ्याच्या झोताने तर काणी लाटेच्या वेगाने, कोणी तेल संपल्याने तर कोणी कडेला धडकल्याने विझतात व बुडतात. त्यांच्यामागे मग कोणी लक्ष देत नाही... ते बुडले काय की विझले काय, कोणालाच त्याचे सोयरसुतक नसते. त्यामुळे घरीदारी नकोसे झालेल्या आणि वृद्धाश्रमात आणून टाकलेल्या व्यक्तींचे प्रतीक म्हणून जळात सोडलेल दिवे अगदी समर्पक वाटतात.

अर्चना वर्टीकर यांच्या या कथावस्तूतील स्वाधार वृद्धाश्रम हा विमलाबाईंनी स्थापन केलेला असून, स्वत:च्या वार्धक्यामुळे आपली प्रकृती अस्वास्थ्यामुळे त्याचा कारभार त्यांनी आपली सून प्रीती जोशी हिच्यावर सोपवला आहे. आश्रमाची अवस्था सध्या बिकट आहे. स्वयंपाकीण ताराबाई, बागेची देखरेख करणारे माळीबाबा, अकाऊंटंट लेलेकाका, झाडलोट करणारी भीमक्का वगैरे कर्मचारी दीर्घकाळापासून आश्रमाच्या सेवेत आहेत. आश्रमात काही वृद्ध स्त्रीपुरुषांचे वास्तव्य आहे. अभय मुथांकडून मोठी देणगी मिळण्याची आशा निर्माण झाल्यामुळे आश्रमाचे नूतनीकरण करण्याच्या योजना आखल्या जात आहेत. पाळणाघर, बगाच्यात भाजीपाला, गोपालन... उत्पन्न वाढ... वृद्धांना काम आणि करमणूक. गुऱ्हाळ चालू करण्यासाठी चरक, खाद्यपदार्थ, वेफर्स, बटाट्याचे पापड... वेगवेगळे स्नॅक्स.

कमलताईंच्या श्रद्धांजली सभेपासून आश्रमातील वातावरणावर प्रकाश पडू लागतो. मुले-सुना-नातवंडे असूनही कमलताई कोणाला पूर्वसूचना न देता वृद्धाश्रमात येऊन राहतात. फक्त पुष्पा या आपल्या सुनेला त्या कळवतात. तब्येत बिघडल्यावर त्यांना सुरक्षा हॉस्पिटलमध्ये नेण्यात येते... तेथेच त्यांचे निधन होते. त्यांनी मृत्युपत्रान्वये दागिने आणि घर पुष्पाच्या नावे केलेले असते. इतर मुलांना काहीही देऊ नये असे स्पष्ट नमूद केलेले असते.

पुष्पाच्या नवऱ्याला पार्टनरने फसवल्याने धंद्यात कर्ज झाले. पुष्पाने नोकरी करून दोन मुलांचे शिक्षण केले. कमलताईंची दुसरी सून लारा काळे नवरा

राजेशसह आश्रमात येऊन प्रीतीला धमकावते, ''आम्ही कायदेशीर वारस आहोत आईचे. आम्हाला घराचे कागदपत्र हवेत. पुष्पाने त्यांचे हॉस्पिटलचे बिल भरले म्हणून तिला सगळी प्रॉपर्टी हडप करू देणार नाही आम्ही.''

...आश्रमातील वातावरणाची अशी वेगवेगळी अंगे स्पष्ट होऊ लागतात.

कमलताईंच्या श्रद्धांजलीच्या निमित्ताने आश्रमात राहणाऱ्या व्यक्तींची पूर्ववृत्तेही समोर येतात.

एकेकाळची बाल अभिनेत्री गुलाब आश्रमात सर्वांशी फटकून वागते. आपल्या सौंदर्याचा, आपल्या कीर्तीचा तिला कोण अभिमान! नवऱ्याशी न पटल्याने आश्रमात राहायला येते. तेथेही मद्य पिण्याचा हट्ट चालू ठेवते. ॲड एजन्सीची तिला ऑफर येते आणि तिची मरगळ दूर होते. सगळे आश्रमवासी तिच्या आनंदात भर घालतात.

लीलाबाई ही एल.आय.सी.मध्ये नोकरी करून निवृत्त झालेली. हातात चार पैसे असणारी भांडखोर. सारखी चिडचिड करणारी, तोंडाने तिखट, पण पोटात माया. मंगळाची पत्रिका. तीन तीन ज्योतिष्यांना दाखवून लग्न झालं. पण नवऱ्याचं वागणं विचित्र. ''तुझे समोरचे दात खोटे आहेत'' असे म्हणून त्याने तिला लग्नानंतर देवदर्शन न करताच टाकून दिले. तिने दुसऱ्या दूरच्या गावी बदली घेतली. पण तेथेही नवरा येऊन तिला त्रास देऊ लागला. तिच्याशी घटस्फोट घेऊनही तिच्याबरोबर करून संबंध ठेवतो. मुलगा होतो. औरस पुत्राच्या जन्माने मृत्यू संभवतो म्हणून त्याने पत्नीला रखेल करून संसार केला. वंशाचा दिवा जन्माला घातला. त्यानंतर त्याचा मृत्यू झाला... तिच्या सासूने तिच्यावर खटला भरला. एक भलतेच विचित्र प्रकरण...

बळवंतराव आणि सुमनताई हे जोडपे. नातवाच्या दरमहाच्या खर्चासाठी पैसे राहावेत म्हणून आत्महत्येचा प्रयत्न करते, कारण त्यांचा विवाहित मुलगा, आणि त्याची सून दोघेही अपघातात मरण पावतात. नातवंडांना गुरुकुलात ठेवायचे तर दरमहा तीनचार हजाराची तरतूद हवी म्हणून मरायचं ठरवतात, पण त्यांना वाचवण्यात येते. त्यांच्या नातवंडांसाठी आश्रमातच पाळणाघर-बालवाडी वगैरे सोय करायचे ठरते.

याच दरम्यान आश्रमात एक नवीन एन्ट्री होते. कऱ्हाडजवळची भागीरथीबाई. तिचा नवरा गावातला पुढारी. त्याच्याबाहेर बारा भानगडी. त्याला धडा शिकवण्यासाठी भागीरथी आश्रमात त्याला न सांगता येते. आपल्या उत्साहाने आणि जीवनाकांक्षेने सर्वांनाच भारावून टाकते. आश्रमात गुऱ्हाळ सुरू करू, भाजीपाला लावू, पाळणाघर चालवू - एकेक नव्या योजना ती मांडत जाते. नवरा पोलिसांना आश्रमात पाठवतो तर ती त्यालाच दम भरते... तिचे पूर्ववृत्तही तिचा धाडसीपणा प्रकट करणारे.

... याच आश्रमात छुपेपणाने आठ दिवस राहिलेला दीपक मकरंद थत्ते... खरं तर अनाथ मुलगा, पण नाना अडचणी सोसून शिकून अमेरिकेत दत्तक गेलेला. एम.बी.ए. झालेला. तो कमलताईंच्या आजारपणात त्यांची हॉस्पिटलमध्ये शुश्रूषा करतो. घर बांधणीसाठी जमवलेला सोळा लाखांची रक्कम पळवण्याचा कट लारा काळे आणि बिल्डर मित्र रचतो, तेव्हा तो ती रक्कम सुरक्षित ठेवून त्या दोघांना पोलिसांच्या हवाली करतो...

अशा वेगवेगळ्या हकिकती गुंफत वृद्धाश्रमातील नूतनीकरणाचा घाट घातला जातो.

जळात सोडलेले दिवे... बुडणार... विझणार... पण हे दिवे नव्या आशापूर्ण जीवनाचा संकल्प सोडतात. बुडण्या-विझण्याऐवजी नव्याने तेल घातले जाऊन अधिक झगमगीत होऊन तेजस्वी होतात. जीवनाची विस्कटलेली गणिते पुन्हा नीटनेटकी करतात.

आश्रमाच्या संस्थापिका विमलाबाई यांच्या वैवाहिक जीवनाचीही परवड झालेली. नवरा विलासराव फॅक्टरीचा मालक. पण संशयी, दारुड्या, मारहाण करणारा, छळणारा... मुलगा झाला तरी वागण्यात सुधारणा नाही. तेव्हा विमलाबाई घर सोडतात... आश्रम काढतात... लग्नाआधीची विमलाबाईंची काही प्रेमपत्रे विलासराव खूप पैसे देऊन मिळवतात आणि त्यांचा ब्लॅकमेलसाठी उपयोग करू पाहतात. विमलाबाई आणि आश्रमाचे अकाऊंटंट लेलेकाका यांच्यात अफेअर आहे असा त्यांचा संशय. ''मोठी समाजसेविका म्हणून मिरवते आहे तुमची सासू... तिचं खरं रूप दाखवतोय तुम्हाला. मजा मारायला गेलीय आपल्या याराबरोबर! हे बघ पुरावे... प्रेमपत्रं आहेत तिची... चाळीस वर्षांपूर्वीची.. जुनी....''

... या प्रेमपत्रातले एक पत्र विलासरावांच्या हातचे असते. श्रीधर लेले यांना लिहिलेले. त्यावर श्रीधर लेल्यांवर सूड उगवायचा म्हणून विमलशी लग्न केल्याची कबुली दिलेली असते. केवळ पैसा हवा आणि तोवर ते पत्र दाखवून विमलाताई त्याला सांगतात, ''आता आणखी उकिरडा उपसायला मला लावू नका. कन्सेंट डिव्होर्सचे पेपर पाठवीन त्यावर मुकाट्याने सही करा... इच्छापत्र मी मागेच केलंय. मुलगा प्रसाद याच्या नावे सर्व केलंय. मुलगी प्रीती हिच्या स्वाधीन स्वाधार वृद्धाश्रम केलाय. या क्षणापासून तुमचा माझा काडीमात्र संबंध उरलेला नाही... मुलांच्या मनावर विपरीत परिणाम होऊ नये म्हणून हे ठसठसणारं नातं आजवर जपत, जगत होते... फार फार सोसलं... आता नाही गप्प राहणार. आता मरताना तरी मी अनुपमा श्रीधर लेले म्हणून मरेन.''

वृद्धाश्रमातील बहुतेक सर्व बायकांच्या वैवाहिक जीवनात या ना त्या स्वरूपाची पडझड आढळते.

या कादंबरीला बांधेसूद कथानक नाही. वेगवेगळी पात्रे एकत्र आली आहेत. त्यांच्या पूर्व आयुष्यातील काही घटना अधेमधे येतात. त्या घटनांच्या सावटातच वृद्धाश्रमात त्या जगत असतात. लीलाबाईंच्या, विमलाबाईंच्या नवऱ्याचे वागणे, हे विवाह झाल्यापासूनच विचित्र वाटते. लेखिकेला या सर्व गुंत्यातून मानवी जीवनातले तर्कदुष्ट, सूत्रहीन अस्तित्वाचे निसटते खेळ दाखवायचे असावेत.

जळात सोडलेले दिवे दीपदानातल्यासारखे पवित्र, शुभसूचक असण्यापेक्षा क्लेशच जास्त देतात.

**किंमत : ९०रु. सभासदांना : ६३रु. पोस्टेज : २५रु.**

## अनुवादित कथासंग्रह

| | | |
|---|---|---|
| काबुलीवाला आणि इतर कथा : रवींद्रनाथ टागोर (बंगाली कथा) | अनु. मृणालिनी गडकरी | १०० |
| पोस्टमास्तर आणि इतर कथा : रवींद्रनाथ टागोर (बंगाली कथा) | अनु. मृणालिनी गडकरी | १४० |
| गहाण पडलेली टेकडी : मारिया श्रेस (गुजराथी) | अनु. अंजनी नरवणे | १२० |
| रावीपार : गुलज़ार | अनु. पाडळकर/वेल्हाळ | १५० |
| फुलांचे बोल : आन्ना साक्से (रशियन कथा) | अनु. सुनीती देशपांडे | १०० |
| आनंद भेट (रशियन कथा) | अनु. सुनीती देशपांडे | १२० |
| अंतर-पर्व (रशियन कथा) | अनु. सुनीती देशपांडे | १३० |
| संवेदना (हिंदी कथा) : डॉ. कमल चोपडा | अनु. उज्ज्वला केळकर | १३० |
| स्पॉट लाईट (हिंदी कथा) : तारिक अस्लम तसलीम | अनु. उज्ज्वला केळकर | १२० |
| त्रिधारा : (हिंदी कथा) : डॉ. कमल चोपडा, मोहनलाल गुप्ता, सरला अग्रवाल | अनु. उज्ज्वला केळकर | १५० |

**पोस्टेज खर्च वेगळा**

**मेहता पब्लिशिंग हाऊस,**


# चिकन सूप फॉर द सोल

**भाग ३**

**जॅक कॅनफिल्ड**
**मार्क व्हिक्टर हॅन्सन**

**अनु. उषा महाजन**

**किंमत २००रु. पोस्टेज २५ रु.**




'चिकन सूप फॉर द सोल' या पुस्तकाच्या पहिल्या भागाप्रमाणे या पुढच्या भागातही जॅक कॅनफिल्ड आणि मार्क हॅन्सन या अमेरिकन जनमानसाच्या लाडक्या लेखकांनी देशविदेशांतून अनेक कथा मागवून त्यांचं संकलन केलेलं आहे. आजच्या युगातल्या मानसिक ताणतणावावरचा रामबाण उपाय ठरलेल्या या कथा वाचताच मनाची मरमळ, नैराश्य झटकन दूर होतं व वाचक नवचैतन्याने आयुष्याला, त्यातील संकटांना, अडीअडचणींना हिमतीने सामोरा जातोच. या कथांचं टॉनिक मिळाल्यानंतर वाचकाला स्वत:च जो बदल जाणवतो, त्या अनुभवाचं कथन तो आपल्या जवळच्यांना, मित्रमैत्रिणींना ऐकवतो व मग देवाणघेवाणीची न तुटणारी साखळीप्रकिया पुढेपुढे जात राहते. खरंच कधीकधी अशा साध्या, सरळ सत्यकथांतून थोडंफार तरी समाजपरिवर्तन होऊ शकतं ना?

**मेहता पब्लिशिंग हाऊस,**



# मुलाखत

## हॅरी पॉटर : अडीच लाख प्रतींचे एका दिवसात वितरण

### टॉमस अब्राहम (पेंग्विन इंडिया)

*टॉमस अब्राहम हे आरंभी पार्ले सॉफ्ट ड्रिंक कंपनीत शीतपेयांच्या विक्री वितरणाचे काम पाहत. या कंपनीच्या वतीनेच प्रसिद्धीचा एक उपक्रम म्हणून 'लिम्का बुक ऑफ रेकॉर्डस'' तयार करण्याचे ठरले आणि दर वर्षी त्याची अद्ययावत आवृत्ती प्रसिद्ध होऊ लागली. भारतीय पातळीवरचे उच्चांक ठरवण्यासाठी एक यंत्रणा आणि कार्यपद्धती ठरवण्यात आली आणि ती निर्दोष होण्याच्या दृष्टीने तिच्यात योग्य ते बल करण्याचीही दक्षता घेण्यात आली. १९९४ मध्ये टॉमस अब्राहमनी ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेसमध्ये संपादक म्हणून प्रवेश केला; अल्पावधीतच वितरणाकडे त्यांची नेमणूक झाली. पुढे पेंग्विन इंडियामध्ये मार्केटिंग प्रमुख म्हणून त्यांची नेमणूक झाली. इ. स. २००३मध्ये पेंग्विन इंडियाचे प्रमुख कार्यकारी अधिकारी म्हणून त्यांना बढती मिळाली.*

**प्रश्न - हॅरी पॉटरचे सातवे पुस्तक २००७ मध्ये बाजारात आले. १९९७ मध्ये पहिले पुस्तक आले, म्हणजे एका दशकाचा हा प्रवास झाला. आपण या प्रवासाचे आरंभीपासूनचे साक्षीदार आहात. काय वाटते या दशकपूर्तीबद्दल?**

उत्तर - ११९७ मध्ये हॅरी पॉटरचे प्रथम पदार्पण झाले आणि बघता बघता दशकाची मजल त्याने गाठली. दशकव्यापी अशी ही घटना पेंग्विनच्या कारकिर्दीतही महत्त्वाची ठरली. ब्लूम्सबरी यू.के.ने हॅरी पॉटरच्या वितरणाची आंतरराष्ट्रीय जबाबदारी घेऊन प्रत्यक्ष कामाला सुरुवात केली. त्या अगोदर टेकसन्सने पहिल्या तीन पुस्तकांचे भारतात वितरण केले. हॅरी पॉटर हे तिसऱ्या पुस्तकापासून बेस्ट सेलर म्हणून वाचकांना आकृष्ट करू लागले. चौथे पुस्तक ब्लॉकबस्टर या वर्गात प्रवेश करणारे ठरले आणि त्या वेळी आमच्याकडे त्याच्या वितरणाचे हक्क आले. चौथ्या पुस्तकाच्या ३० हजार प्रती आम्ही आयात केल्या. पाचव्या पुस्तकाच्या साठ हजार प्रती, सहाव्याच्या एक लाख साठ हजार प्रती आणि सातव्याच्या दोन लाख साठ हजार प्रती अशी प्रतींची संख्या वाढत गेली. सातव्या पुस्तकाच्या १ लाख ७० हजार प्रती भारतातील वेगवेगळ्या शहरात मिळून एकाच दिवसात विकल्या गेल्या. पहिल्याच दिवशी इतक्या प्रती एखाद्या पुस्तकाच्या खपणे हा एक विक्रमच होय. दहा वर्षे सातत्याने चाललेल्या हॅरी पॉटरच्या 'कल्ट'च्या हवेमुळे हा विक्रम साधणे शक्य झाले. त्याच्या प्रसिद्धीच्या झंझावाताने जगभरच्या वाचकांना झपाटून टाकले.



**टॉमस अब्राहम**

**प्रश्न - या एवढ्या प्रचंड संख्येने आलेल्या प्रतींचे कस्टम क्लीअरन्स आणि भारतात वेगवेगळ्या शहरी त्या प्रती पोचवणे ही एक मोठीच कसरत होती. हे करण्यासाठी किती लोकांचे परिश्रम कामी आहे?**

उत्तर - कस्टम क्लीअरन्स आणि पुस्तक गावोगाव पोचवणे यासाठी ॲक्टिव्ह एअर या संस्थेला करारबद्ध करण्यात आले; या संस्थेने सेफ एक्सप्रेस कुरियरला पे-डे वितरणाचे काम दिले. प्रकाशनाच्या दिवशीच्या प्रतींची सुरक्षा यंत्रणा पेंग्विनने स्वत:च्या देखरेखीखाली ग्रुप ४ सिक्युरिटी एजन्सीमार्फत हाताळली. परदेशातून २०० टन वजनाची ४०० पार्सल्स आली; भारतात ती दीडशे शहरात ३०० ग्रंथदालनांमध्ये पोचवायची होती. प्रकाशनाच्या दिवशी सकाळी ६ ते ७ च्या दरम्यान या तीनशे ग्रंथदालनांपुढे हॅरी पॉटरची पार्सल्स घेऊन ट्रक्स उभे होते. प्रकाशनाच्या

दिवशी पहाटे इतक्य ठिकाणी पुस्तकांची पार्सल्स पोचवण्याची एवढी जय्यत तयारी याआधी कधीच करावी लागली नव्हती.

**प्रश्न - हॅरीचा हा अखेरचा भाग असल्याने त्यात हॅरीचे शेवटी काय होते याबद्दल वाचकवर्गात खूप कुतूहल होते. त्याबाबत कमालीची गुप्तता पाळण्यात आली होती. या इतक्या ठिकाणी पुस्तके वितरित करताना ही गुप्तता पाळणे अवघड होते. परंतु ती गुप्तता पाळण्याबाबत तुम्ही यशस्वी ठरला. हे सर्व कसे जमू शकले?**

उत्तर - पुस्तकांची पार्सल्स असणारे कन्टेनर्स ५ ते ७ जुलै २००७ च्या दरम्यान कस्टम क्लीअरन्ससाठी महाराष्ट्रात कमी गजबज असणाऱ्या वेगवेगळ्या ठिकाणी नेण्यात आले. २५ सुरक्षा सैनिक त्यांच्यावर नजर ठेवत होते. क्लोज्ड सर्किट टी.व्ही.ने या सर्व कन्टेनर्सवर चोवीस तास लक्ष ठेवण्यात येत होते. कोठेही ढिलाईला अजिबात वाव नव्हता. या गोडाऊनला एकच प्रवेशद्वार होते. बरेच अंतर पायी चालून गेल्यावरच प्रवेशद्वारातून आत जाता येई. या मार्गावर तीन ठिकाणी तपासणीची व्यवस्था होती. या जागेची कल्पना फक्त ज्येष्ठ अधिकाऱ्यांना होती. पेंग्विनपैकी फक्त दोघांना हे स्थळ ठाऊक होते. उषा झा (कस्टमर सर्व्हिस अँड डिस्ट्रिब्युशन) आणि मी.... दिल्लीतील गोडाऊनला २३ जुलैपर्यंत कोणालाही भेट देण्यास परवानगी नाही असे आम्ही जाहीर करून टाकले होते. पुस्तकाची पार्सल्स दिल्लीच्या आमच्या गोडाऊनमध्ये आहेत असा लोकांचा (गैर)समज करून देण्याचा आमचा उद्देश सफल झाला.

**प्रश्न - भारतात दूरदूरच्या शहरी पुस्तकाच्या प्रतींची वाहतूक करण्याची व्यवस्था आपण कशी केली?**

उत्तर - आयएसओ सर्टिफाइड कन्टेनराइज्ड ऑल वेदर प्रूफ ५० ट्रक्सद्वारे आम्ही ११ जुलै रोजी पुस्तकाची पार्सल्स गावोगाव रवाना गेली. या ट्रक्सवर प्रत्येकी दोन दोन ड्रायव्हर्स आणि एक मदतनीस सेवक होता. अतिरिक्त सुरक्षा म्हणून कुठल्याही ठिकाणचा माल फक्त एकाच ट्रकमध्ये असू नये असा कटाक्ष बाळगण्यात आला. दीडशे स्थळी हे ट्रक तीनचार दिवस आधीच पोहोचतील अशीही दक्षता घेण्यात आली. ॲक्टिव्हएअरकडेच त्यांच्या सुरक्षिततेची कामगिरी या सर्व वितरण स्थळीही होती. दिल्ली, कलकत्ता, मुंबई आणि चेन्नई अशा चार शहरी आयत्या वेळी मागणीसाठी जादा प्रतींची व्यवस्था केली.

**प्रश्न - वेगवेगळ्या शहरांतर्गत वितरणाच्या दृष्टीने काय काय पावले उचलली?**

उत्तर - अडीचशे ट्रक्सचा वापर करून शहरातील मुख्य गोदामापासून कोणत्याही ग्रंथदालनापर्यंत सुमारे ५० मिनिटाच्या आत पोचता यावे अशी योजना आखली.

डिलिव्हरी देणाऱ्या व्यक्तींकडे मोबाईल फोन देण्यात आले; त्यामुळे डिलिव्हरीशी संबंधित व्यक्तींशी विना-विलंब संपर्क साधणे सुलभ ठरले. त्या त्या शहरातील गोडाऊन आणि विक्री केंद्र वा ग्रंथदालन यांच्यातील वेगवेगळे पर्यायी मार्ग अडीअडचणीच्या वेळी वापरता यावे यासाठी ट्रक ड्रायव्हर आणि डिलिव्हर मॅन यांना त्या त्या मार्गावर चाचण्या घेण्यास सांगण्यात आले. २० जुलै रोजी रात्री १० नंतर ग्रंथदालनांकडे प्रती पोचवण्यास आरंभ केला गेला. ऑनलाइन विक्री करणाऱ्यांना प्रतींवर ग्रहाकांची नावे टाकणे वगैरे प्रक्रिया सोयीस्कर व्हावी म्हणून थोडा जास्त अवधी मिळावा असा जाणीवपूर्वक प्रयत्न केला गेला. २१ला पहाटे ६-७ च्या दरम्यान डिलिव्हरी देणे यांना त्यामुळे शक्य झाले. मात्र त्याआधी त्यांजकडून प्रतींचे वाटप होऊ नये म्हणून जी-४ चे तीन तीन सुरक्षा सैनिक ठेवण्यात आले. त्या सुरक्षा सैनिकांवर देखरेख ठेवण्यासाठीही गस्त पथक होतेच. प्रत्येक ठिकाणच्या प्रतींचा उठाव आणि जादा प्रतींची मागणी पुरवणे यासाठीही मॉनिटरिंग चालू होते. केंद्रीय नियंत्रण कक्षाशी सतत संपर्क ठेवण्यात आला होता.

**प्रश्न - पेंग्विनपैकी कोणाकोणाचा या वितरण यंत्रणेशी प्रत्यक्ष संबंध होता?**

उत्तर - मी, उषा झा, रोओल अँड्र्यूज, अनंत पद्मनाभन, सोमु सुंदर रेड्डी, हेमाली सोधी, रचना कालरा या सर्वांचा या मोहिमेत सक्रिय सहभाग होता. आमचे विक्री प्रतिनिधीही सर्व लोकेशन्सना पाळीपाळीने भेटी देत होते.

**प्रश्न - आरंभी किती प्रतींची मागणी नोंदवली होती? नंतर तिच्यात भर पडली का?**

उत्तर - आमची पहिली मागणी १ लाख १९ हजार प्रतींची होती. ती अडीच लाख प्रतीपर्यंत वाढवण्यात आली. या प्रती सागरी मार्गाने येणार होत्या, त्यामुळे पुरेसा अवधी आवश्यक होता. नंतर प्रती आणखी वाढल्या.

**प्रश्न - संपादनाच्या टप्प्यावर आणि पुढे प्रत्यक्ष मुद्रणाच्या वेळी हॅरी पॉटरच्या कथानकाबद्दलची गुप्तता कशी पाळण्यात आली?**

उत्तर - ही गुप्तता पाळण्याचे काम इंग्लंडमध्ये केले गेले. संपादनाची जबाबदारी एकाच व्यक्तीकडे होती. लेखिकेशी संपर्क ठेवण्याचे कामही त्याच संपादकाने पाहिले. त्यात अन्य कोणाला स्थान नव्हते. इंग्लंडमध्ये पुस्तकाचे मुद्रण क्लेज् प्रिंटिंग प्रेसमध्ये झाले. या छापखान्याभोवती तारेचे खास कुंपण घालण्यात आले होते. शिकारी कुत्र्यांची गस्त चालू असे.

**प्रश्न - एकूणच पेंग्विनच्या प्रतिष्ठेला आणि प्रतिमेला उजाळा देणारा हा सर्व प्रकार म्हणावा लागेल नाही?**

उत्तर - निश्चितच! परंतु अशा एखाद्या पुस्तकाचा अभूतपूर्व उठाव हा अपवादात्मक

प्रकार असे आम्ही मानतो. पुढच्या वर्षी या तोलामोलाचे पुस्तक नसेल तर उत्पन्नात बरीच घट दिसल्याशिवाय राहणार नाही.

**प्रश्न - हॅरी पॉटरच्या अनुवादाच्या हक्कांबाबत आपण काय प्रयत्न करीत आहात?**

उत्तर - हॅरी पॉटरच्या अनुवादाचे हक्क वेगवेगळ्या भारतीय भाषांतील प्रकाशकांना आधीच कराराद्वारे देण्यात आले आहेत. त्यामुळे आम्हाला त्याबाबत काही काम करण्याची गरज पडली नाही. परंतु आम्ही हिंदी, मराठी, मल्याळम वगैरे भाषांमध्ये पेंग्विनची भाषांतरे प्रकाशित करीत आहोत. प्रादेशिक भाषांमध्ये मोठी बाजारपेठ उपलब्ध आहे, परंतु वितरण आणि किरकोळ विक्रीयंत्रणा यात प्रगतीला खूप अवसर आहे. आम्ही सध्या वेगवेगळ्या भाषांमधील पुस्तके काढण्याचा कार्यक्रम हाती घेतला आहे. त्यात ७० टक्के स्वतंत्र पुस्तके आणि ३० टक्के अनुवाद असतील.

**प्रश्न - तुमच्या मते चांगले पुस्तक कोणते?**

उत्तर - चांगले पुस्तक कोणते? पायलेटने विनोदाने हाच प्रश्न पुन्हा उत्तरादाखल विचारून उत्तर देण्याचे टाळले. या प्रश्नाचे निश्चित उत्तर नाही. वाचकाला जे आवडते ते चांगले पुस्तक.

**प्रश्न - कोकाकोलाकडून पुस्तक प्रकाशन ही उडी का घेतली?**

उत्तर - मी पार्ले सॉफ्ट ड्रिंक ग्रुपमध्ये कार्यरत होतो हे खरेच आहे. पुढे तिचेच रूपांतर कोकाकोलात झाले. मी जाहिरात व प्रसिद्धीचे काम पाहत असे. मी एम. ए. इंग्लिश आहे. तेव्हा मला लिम्का बुक ऑफ रेकॉर्डसचे संपादन करण्यात सांगण्यात आले. मला पुस्तकांची आवड लहानपणापासून आहे. पण त्यात करीयर करावे असे कधी डोक्यात आले नाही. लिम्का बुकच्या संपादन कामात मला रस वाटू लागला. प्रकाशनक्षेत्रात शिरावे अशी इच्छा झाली. १९९४ मध्ये ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेसमध्ये माझी संपादक म्हणून निवड झाली. परंतु पुढे मला मार्केटिंगचे काम बघण्यास सांगण्यात आले. पुढे पेंग्विनने डीके विकत घेतल्यावर मार्केटिंग हेड झालो. डेव्हिड डेव्हिदार पेंग्विन कॅनडामध्ये गेल्यामुळे इ. स. २००३च्या शेवटी मला सीईओ नेमण्यात आले. ७ वर्षे मी पेंग्विनमध्ये काम केले. आता हॅचेट इंडियाचा कार्यकारी संचालक म्हणून नवे काम अंगावर घेतले आहे.

**(पब्लिशिंग टुडे, ऑगस्ट २००७)**

(सौजन्य : वन टू वन : एस.के.घई इन्स्टिट्युट ऑफ बुक पब्लिशिंग,नवी दिल्ली.)

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

मूल्याधारित यशाची साथ लाभण्यासाठी
अनुभवसिद्ध मार्गदर्शक

**आगामी**

# डबेवाला

**श्रीनिवास पंडित**

अनुवाद
**सुप्रिया वकील**




बिझनेस अनेक चढउतारांतून पार पडत असतात. त्यातील काही टिकून राहतात तर काही कालौघात नामशेष होतात. कंपनीप्रमुख या चढउतारांशी संघर्ष करत असतानाच आपापल्या संस्था चिरकाल टिकून राहण्यासाठी टिकाऊ 'मॉडेल' च्या शोधात असतात.

मुंबईतले डबेवाले त्यांचा उद्योग ११५ वर्षं टिकवून आहेत. अर्धशिक्षित लोकांचा हा दीर्घकाळ टिकलेला उद्योग एक अपूर्व उदाहरण बनला आहे. चार पात्रांच्या संवादातून उलगडणाऱ्या या विलक्षण उद्योगकथेत यशस्वी संस्थानिर्मितीसाठी आवश्यक असणाऱ्या महत्त्वपूर्ण मुद्यांवरील चिंतन आहे.

यशाची साथ लाभलेल्या बिझनेसच्या या कहाणीत नेते व व्यवस्थापक यांच्यासाठी अनुभवसिद्ध मार्गदर्शन आहे.

मेहता पब्लिशिंग हाऊस,




# साठा उत्तराची कहाणी

**प्रमोदिनी वडके-कवळे**

''ऐका ऐका महादेवा, तुमची कहाणी. आटपाट नगर होतं. तिथं एक दरिद्री ब्राह्मण राहत होता.□''

श्रावणातली ओली संध्याकाळ. बाहेर पाऊस भुरभुरतोय. घरात चोरपावलांनी शिरणाऱ्या काळोखावर पहारा देत तुळशीच्या कोनाड्यातला दिवा शांतपणे तेवतोय. त्याचा सोनेरी प्रकाश पुढच्या दारातून ओटीवर झिरपतोय. तुळशीकट्ट्याच्या पलीकडेच तिन्हीसांजेचा मुहूर्त साधून फुलणारा सोनटक्का घमघमतोय. कुणी पायघड्या घालाव्यात तसा त्याचा मंद सुवास अंगणातून देवघरापर्यंत दरवळत आलाय. देवापाशी लावलेल्या उदबत्तीच्या गंधाची वलयंही त्यात मिसळून गेलीयत.

आम्ही भावंडं पेंगत्या डोळ्यांनी सोमवारची कहाणी सांगणाऱ्या आजीभोवती वेटोळं घालून बसलोय. पुंगीवर डोलणाऱ्या नागासारखे तिच्या कहाणीच्या तालावर डुलतोय. कारण वरणभाताच्या वासाने पोटातली भूक खवळलेली असली, दिवसभराच्या उपासाने डोळ्यांत झोप दाटलेली असली तरीही आजीची कहाणी ऐकल्याशिवाय पर्याय नाही..

देव्हाऱ्यातल्या समईची थरथरती ज्योत, स्वयंपाकघरातून येणारा आंबेमोहोराचा घमघमाट आणि आजीचा खरखरीत, पण लयदार स्वर या सगळ्यांची सुरेख सरमिसळ झालीय.□

श्रावणी सोमवारचं व्रत करून हिरेमाणकं मिळवलेल्या दरिद्री ब्राह्मणाची कहाणी संपत आली असली तरी अजून खुलभर दुधाची

कहाणी व्हायचीच आहे. मात्र आम्हा मुलांनाही श्रावणी सोमवारचा 'कंपलसरी' उपास करायला लावणाऱ्या आणि जेवणात व्यत्यय बनून राहिलेल्या त्या कहाण्यांचा राग येत नाहीये... कारण त्यातल्या शब्दांच्या लयीचा गोडवा कानातून थेंबाथेंबाने मनात झिरपतोय.

निर्मळ मळे.. उदकाचे तळे. सुवर्णाची देउळेराउळे□टिर्रर्रर्र ऽऽ.

त्या मधुर स्वरलहरींवर एक कर्कश ओरखडा उठतो. रंगगंधस्वरांची निर्मिती लाभलेलं ते वातावरण एकाएकी धुक्यासारखं विरून जातं आणि वास्तवाचा विक्राळ राक्षस काठी आपटत माझ्यासमोर उभा रहातो.

□

सकाळचे साडेपाच वाजलेत. बाहेर धो धो पाऊस पडतोय. रात्रीच केव्हातरी दिवे गेलेले आहेत. काल पाणी न आल्यामुळे स्वयंपाकघरात पसारा पडलेला आहे. मेंदूतला संगणक आज बसेसचा संप असल्याची तत्पर आठवण करून देतोय□आणि ही अडथळ्यांची शर्यत पार करून साडेआठ वाजता मला ऑफीस गाठायचंय ही जाणीव अर्धवट झोपेतही माझ्या मनात रेंगाळतेय.□

तरीही मन अजून पहाटेच्या त्या प्रसन्न स्वप्नापाशीच घुटमळतंय. त्यापुढे कोणत्याच अडचणीचा बाऊ वाटत नाहीये. मनातली सुवर्णाची देवळेरावळे लखलख चमकतायत.

हे प्रसन्न स्वप्न मला आज पहिल्यांदाच पडलेलं नाही. खूप वेळा मी ते पाहिलंय. तरीही त्याची गोडी कमी होत नाही. अजूनही ते स्वप्न पडल्यानंतर जाग आली की तसंच प्रसन्न वाटतं. आजीच्या तोंडून लहानपणी ऐकलेल्या कहाणीसारखं.

श्रावण महिन्यातल्या वारांची कहाणी ऐकणं हा काही माझा एकटीचाच खास अनुभव नाही. पन्नास वर्षांपूर्वीच्या मराठी कुटुंबातल्या सगळ्याच मुलांना ही कहाणी ऐकण्याचा अनुभव मिळालेला असणार. कुणाला तो कंटाळवाणाही वाटला असेल, कुणाला आवर्जून लक्षात ठेवावा एवढा महत्त्वाचा वाटला नसेल. कुणाला तो भाबड्या व्रतवैकल्याचा अडाणी भाग वाटला असेल, पण तरीही आज एखाद्या वाराची कहाणी म्हटल्यावर ती आठवून त्यातली शब्दचमत्कृती कानात क्षणभर तरी रेंगाळून जात असेलच.

खरं म्हणजे कॉलेजमध्ये वाङ्मयाचा इतिहास शिकताना कहाणी हे कथाप्रकाराचं मूळ असल्याचं माझ्याही कानावरून गेलंय, पण अभ्यासातले नियम आणि प्रत्यक्षातला अनुभव यात फार अंतर असतं. कवितेतलं काही कळत नसताना मोठ्या भावाच्या पुस्तकातली कविता वाचली तर ती इतकी

छान वाटते, की आपल्यालाही नकळत सहज तोंडपाठ होऊन जात, पण तीच आपल्या पुस्तकात आली आणि तिला व्याकरण, संदर्भासहित स्पष्टीकरण, रसग्रहण असल्या शब्दांचे काटेरी सुरवंट चिकटले की, खाजकुइलीसारखी त्रासदायक वाटायला लागते.□

लहानपणी आजीच्या खरबरीत आवाजात ऐकलेली कहाणी हे कथेचं मूळ आहेच, पण कुठच्याही मुळासारखं ते मातीभरलं. खडबडीत नाही. कहाणीतले शब्द म्हणजे काचेच्या ताशीव गुळगुळीत मण्यांची माळ. नितळ.. पारदर्शक.. रंगीबेरंगी आणि हवीहवीशी! त्यात कानामनाला मोहून टाकण्याची एक अजब शक्ती असते आणि मनाला प्रसन्नता देणारे मांगल्याचे सुगंधी अंकुरही असतात.

इतर भाषांमध्येही ही कथावृक्षाची मुळं असतील. नक्कीच असतील. कारण वाचन कमी झालेल्या काळातही कोणत्याही सुजाण मेंदूला आणि अशिक्षित मनालाही बांधून ठेवणारा प्रकार म्हणजे कथा. ती लिखित स्वरूपातली असो नाहीतर मौखिक. वाहत्या धारेसारखी दगडधोंड्यांतून काटयाकुट्यांतून वाट काढत पुढे जाणारी कथा आबालवृद्धांपर्यंत प्रत्येकाला भुरळ घालत आलेली आहे.

आज 'मराठी कथा अशक्त झालीय','कथा या वाङ्मयप्रकाराला चांगले दिवस नाहीत.' प्रादेशिक भाषांमधल्या कथेकडे वाचकांचं दुर्लक्ष होत चाललंय.□''चित्रपटांतूनही कथेपेक्षा इतर घटकांचंच प्राबल्य वाढतंय'' अशा अनेक मुद्यांवरची ओरड ऐकू येते.

ती ऐकली तर एखाद्याला वाटेल कथेचं आयुष्य संपलंच की!

पण ते तितकंसं खरं नाही.

आफ्रिकेतल्या इसापापासून ते दक्षिण भारतातल्या तेनालिरामापर्यंत आणि पंचतंत्रापासून ते विक्रमदित्याच्या वेताळापर्यंत वेगवेगळया प्रांतापिढ्यांनी राबवलेला या अनादि प्रकल्पाचा अंत होईलच कसा? भाषाबिषांचं सोडा, पण कथा-कहाणी हा केवळ मनोरंजनासाठीच नाही तर मनाच्या आरोग्यासाठीही कार्यरत असणारा आणि जगाच्या अंतापर्यंत जिवंत राहणारा प्रकार आहे. मनात खदखदणारं काही जसंच्यातसं सांगता येत नाही तेव्हा माणूस कथानकाचा आधार घेत ते मांडू पाहतो. आपल्या मनातले भाव दुसऱ्यापर्यंत पोहचवू पाहतो. शब्दांच्या दोऱ्यांनी संवादाचे साकव बांधू पाहतो. म्हणूनच साहित्यातल्या कोणत्याही आकृतिबंधाची माहिती नसतानाही लिहिलेली लक्ष्मीबाईंची स्मृतिचित्रं विद्वानांच्याही मनाचा ठाव घेऊ शकतात.

या प्रकारात भाषेला महत्त्व नसतंच मुळी. शब्दांच्या पाचोळ्याखाली

झाकून ठेवलेला तो रानमेवा जास्त महत्त्वाचा असतो.

आठवणींच्या स्वरूपातल्या गप्पा भुताखेतांसारख्या काल्पनिक आकृतींबद्दल बोलणाऱ्या गूढकथा, धर्मकांडांबद्दल माहिती सांगणाऱ्या पुराणकथा, स्वप्नांच्या रंगीबेरंगी दुनियेत नेता नेता बालमनावर हळूचकन संस्कार करणाऱ्या परीकथा, विझलेल्या मनात वीररस जागवणाऱ्या ऐतिहासिक स्फूर्तिकथा, प्रेमाच्या गुलाबी विश्वात शिरताना लाजरीचं हळुवारसं रोपटं होणारी प्रीतिकथा.. हे कथाप्रकार जगातल्या ज्या भाषेत नसतील तिला भाषा तरी कसं आणि का म्हणायचं?

कहाणी सांगणाऱ्याचं मन मोकळं करते आणि ऐकणाऱ्याला त्यातल्या पात्रांशी अलगद बांधून घेते. बाळबुद्धीला वाट्टेल ते साहस करायला लावणारा रॉबिनहूड, सावत्र आईचा छळ सोसणारी सोनसाखळी, समुद्रावरची वादळं झेलणारा सावळ्या तांडेल, 'आता बास' असं म्हणूनही पुन्हापुन्हा प्रवासाला निघणारा सिंदबाद... उत्तर ध्रुवापासून दक्षिण ध्रुवापर्यंत जगातल्या प्रत्येकाच्या लहानपणाशी या व्यक्ती जोडल्या गेलेल्या आहेत.

याच कथाविश्वाची एक बहरलेली डहाळी म्हणजे आपल्या श्रावणकहाण्या. अक्षरवाङ्मयाचा अम्लान आणि अथक झरा.

आपल्या अल्पमतीनुसार अर्थ लावायचा झाला तर सात वारांच्या कहाण्या आपलं रोजचं जगणं कालचक्राशी जोडून घेतात. नागपंचमीची आणि दिव्याच्या अवसेची कहाणी, शेतीच्या कामात मदत करणाऱ्या नागाबद्दलची आणि अंधार उजळणाऱ्या दिव्याबद्दलची कृतज्ञता व्यक्त करायला शिकवते. पिठोरी अमावस्येची कहाणी मातृदिनाची महती सांगते. ऋषिपंचमीची कहाणी प्राण्यांचं आणि मानवाचं नातं विशद करते आणि हे सगळं रंजक आणि कुणालाही रुचणाऱ्या भाषेत. तिथं तत्त्वज्ञानाचं अवडंबर नाही की धर्मग्रंथांचा बोजडपणा नाही.

वेगवेगळ्या रंगारूपाच्या या कहाण्यांचा हेतू मात्र एकच आहे.. जगण्यातली शुचिता जपणे! मानवाचं माणूसपण टिकवणे!

ज्या कुणी पहिली कहाणी लिहिली असेल त्याला मनापासून सलाम करावासा वाटतो मला. मानसशास्त्र हा शब्दही नसण्याच्या त्या काळात मानवी स्वभावाचा इतका बारकाईने अभ्यास करणारा आणि त्याबद्दलचे नेमके भाष्य करणारा तो द्रष्टा कोण असेल? कुठल्या गुरुकुलातून त्याने ही विद्या संपादन केली असेल? त्याच्या डोक्यात ही कल्पना कशी आणि का आली असेल? ह्या कहाण्यांचा हतू काय असेल? केवळ रोजच्या रोज देवपूजेचे यथायोग्य नेमधर्म पाळावेत एवढाच? की त्यापलीकडचं काही

या कहाण्यांतून त्याला सांगायचं असेल?

गोष्टीरूपातून काहीही सांगितलं तर ते ऐकणाऱ्याच्या मनात जास्त खोलवर पोहोचतं. हा अनुभव मानवाला आदिकाळातच आला असेल. म्हणूनच त्याने या कहाण्यांची युक्ती वापरली असेल का?

कहाणीत जसं जीवनविषयक तत्त्वज्ञान भरलेलं असतं तसंच नीतिमत्तेचे डोसही पाजलेले असतात. व्यवहाराचं विश्लेषण आणि भावनांची मृदुता दोन्ही या कहाण्यांत सापडतं. आजी सांगायची त्या कहाण्या तिला तोंडपाठ असायच्या. सांगताना कधी त्यात म्हणी-सुभाषितांची, नामाविशेषणांची भर पडायची पण त्यातला गोडवा कुठे कमी व्हायचा नाही. कारण त्यातली लयदार भाषा□उतशील मातशील घेतला वसा टाकून देशील.. उतणार नाही मातणार नाही घेतला वसा टाकणार नाही.. माझे भाऊराया लांडोबा पुंडोबा.. हाकारे पिटारे डांगोरा.. घरात धान्याच्या कणग्या भरलेल्या होत्या गोठ्यात गव्हाळी मुगाळी वासरे होती..

विद्यापीठाची पदवी मिळवण्याइतका भाषेचा अभ्यास झाला तरी आजीच्या कहाणीतले बरेच शब्द मला अजूनही उमगलेले नाहीत. गव्हाळी मुगाळी वासरे, केणीकुर्डुची भाजी, साठा उत्तराची कहाणी पाचा उत्तरी सुफळ संपूर्ण□मात्र या कहाण्यांमधली पात्रं अजूनही मला आपली वाटतात.

आज आजी नाही. श्रावणाचं पावित्र्य कॅलेंडरपुरतंच उरलंय. वरणभात आणि उदबत्तीच्या घरगुती गंधांची जादू केव्हाच पुसून गेलीय. व्रतवैकल्यं राहिली नाहीत आणि त्यांच्यावर विश्वास ठेवणारं भाबडं मनही उरलेलं नाही.

तरीपण मला कहाणीचं स्वप्नं पडतं. दिव्याचा मंद प्रकाश मनभर पसरतो आणि त्याच्या नुसत्या आठवणीनं दिवसभर प्रसन्न वाटत राहतं.

कारण भ्रष्टाचाराने मळलेल्या आणि स्पर्धा लावून जीवतोड धावणाऱ्या आजच्या युगातही ''आपण चांगलं वागलं तर त्याचं फळ चांगलंच मिळतं.'' असा शुभ्र विश्वास देणारे आशादायी अंकुर त्या कहाणीत असतात.


**प्रमोदिनी वडके-कवळे**
प्राजक्त, अपूर्वा हौ. सोसायटी, सर्व्हे नं. ६०,
सुखसागरनगर क्र. २, गल्ली क्र. १०,
कोंढवा बुद्रुक, पुणे ४११ ०४८.

## आगामी

# अवशेष

लेखक

**राजा कदम**




अतिरेकी मानवीबाँब म्हणून ठरलेल्या परिसरात जातो, त्या वेळी मृत्यू केव्हा हवाय हे त्याचं त्यानं ठरवायचं नसतं.

या जीवनयात्रेत कोण कोणाच्या अंतिम यात्रेसाठी प्रथम हजर असेल, याची शाश्वती नाही. तरीही जीवनप्रवाह सुरक्षित, आनंददायी चाललेला आहे. परंतु मृत्यूचे सतत भान असल्यावर त्या स्थितीत मनुष्यप्राणी किती शारीरिक, मानसिक संक्रमणातून जाऊ शकतो आणि अस्तित्वहीन जगू शकतो, हा विचार मनात ठेवून हे संपूर्ण काल्पनिक कथानक लिहिलेले आहे. ऐतिहासिक संदर्भ केवळ कथानकाला जिवंतपणा आणण्यासाठी घेतले आहेत.

**मेहता पब्लिशिंग हाऊस,**

# पुरस्कार

### * अहलुवालिया यांना टिळक पुरस्कार

लोकमान्य टिळक स्मारक ट्रस्टतर्फे देण्यात येणारा 'लोकमान्य टिळक पुरस्कार' या वर्षी केंद्रीय नियोजन मंडळाचे उपाध्यक्ष मॉन्टेकसिंग अहलुवालिया यांना देण्यात आला.

देशाच्या आर्थिक क्षेत्रातील महत्त्वपूर्ण योगदानाबद्दल अहलुवालिया यांना हा पुरस्कार देण्यात आला आहे. पुरस्काराचे हे सव्विसावे वर्ष असून, सुवर्णपदक, स्मृतिचिन्ह, सन्मानपत्र आणि एक लाख रुपये असे त्याचे स्वरूप आहे.

केंद्रीय ऊर्जामंत्री सुशीलकुमार शिंदे, मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांच्या उपस्थितीत हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

या प्रसंगी टिळक महाराष्ट्र विद्यापीठाने तयार केलेल्या त्रिस्कंध कोशातील 'औषधी कोशा'चे प्रकाशन मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झाले. लोकमान्यांनी 'केसरी'तून कृषी, व्यापार, उद्योग तसेच आर्थिक बाबींसंबंधी वेळोवेळी लिहिलेल्या निवडक अग्रलेखांच्या इंग्रजी भाषांतराचा 'द इसेन्स ऑफ इकॉनॉमिक थॉट' हा संग्रहदेखील शिंदे यांच्या हस्ते प्रकाशित झाला.

### * भीमराव चव्हाण यांना वडारभूषण पुरस्कार

''देव घडविणारी आपण वडार माणसे; पण देवाने आपल्याला काही दिले नाही. त्याची खंत करण्यापेक्षा माणूस म्हणून जगण्यासाठी प्रत्येकाने फुले-शाहू-आंबेडकरी विचारांची कास धरावी.'' असे मत प्रा. मोतीराम राठोड यांनी व्यक्त केले.

'वडार फोरम'तर्फे त्यांच्या हस्ते 'वडार समाज : इतिहास आणि संस्कृती' या पुस्तकाचे लेखक भीमराव चव्हाण यांना 'वडारभूषण' पुरस्कार प्रदान करण्यात आला. फोरमचे अध्यक्ष सतीश शिंदे अध्यक्षस्थानी होते.

राठोड म्हणाले, ''ज्यांना इतिहास आहे तेच इतिहास

घडवू शकतात. वडार समाजाचा कोणी उद्धार करणार नाही. आपल्यातूनच नेते, विचारवंत, सुधारक निर्माण करा. आपले मोठेपण आपणच उभे करा. माणसाला जागे करण्यासाठी, आत्मविश्वास आणि सन्मान देण्यासाठी चळवण असावी. वडार, बंजारा, रामोशी, बेरड, कंजारभाट या सर्वांनी एकत्र येऊन चळवळ उभी करणे ही काळाची गरज आहे. वेशभूषेने नव्हे, तर आचार-विचारांनी समाज बदलतो. स्थापत्यकलेचे आनुवंशिक ज्ञान असलेल्या वडार समाजात विविध क्षेत्रांत प्रतिभावंत आहेत.''

## * उत्तम कांबळे यांना आचार्य अत्रे पुरस्कार

'सकाळ न्यूज नेटवर्क'चे (नाशिक) संपादक उत्तम कांबळे यांना बेळगाव सार्वजनिक वाचनालयातर्फे देण्यात येणारा यंदाचा आचार्य अत्रे पुरस्कार आचार्य अत्रे जयंतीला १३ ऑगस्टला प्रसिद्ध साहित्यिक व विचारवंत डॉ. रावसाहेब कसबे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

'पानिपत'कार विश्वास पाटील, साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष अरुण साधू, ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांना यापूर्वी हा पुरस्कार देण्यात आला आहे.

उत्तम कांबळे यांची श्राद्ध, देवदासी आणि नग्नपूजा, भटक्यांचे लग्न, कुंभमेळा साधूंचा की संधिसाधूंचा? अनिष्ट प्रथा, प्रथा अशी न्यारी, रंग माणसांचे, कावळे आणि माणसं, नव्या शतकात संतसाहित्य टिकेल का?, गजाआडच्या कविता, अस्वस्थ नायक, थोडंसं वेगळं, जागतिकीकरण आणि दलितांचे प्रश्न, वाट तुडवताना, कथा माणसांच्या, राजर्षी शाहू आणि महिला मुक्ती, कुंभमेळ्यात भैरू, शाहू महाराज आणि वेदोक्त प्रकरण, निवडणुकीत भैरू, वामनदादांच्या कवितेतील भीमदर्शन, महात्मा फुल्यांची जलनीती, झोत : सामाजिक न्यायावर (संपादन), जागतिकीकरणात माझी कविता आणि आई समजून घेताना ही पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत.

## * डॉ. फडकुले स्मृती पुरस्कार

'डॉ. निर्मलकुमार फडकुले यांच्यासारखा सत्यवचनी, आग्रही आणि निग्रही माणूस पुन्हा घडणार नाही. त्यांनी कधीही मुखवटा धारण केला नाही. स्वत:ची मते स्पष्टपणे मांडली,' अशा शब्दांत डॉ. फडकुले यांचा प्राचार्य शिवाजीराव भोसले यांनी गौरव केला.

प्राचार्य शिवाजीराव भोसले यांना डॉ. निर्मलकुमार फडकुले स्मृती पुरस्कार, डॉ. रामचंद्र देखणे यांना 'लोकहितवादी पुरस्कार', प्रा. रंजना फडके यांना 'साहित्य स्नेहबंध पुरस्कार' प्रा. द. मा. मिरासदार यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले.

डॉ. फडकुले यांच्या पत्नी मंदाकिनी फडकुले या प्रसंगी उपस्थित होत्या. पंढरपूरच्या विठ्ठल-रुक्मिणी मंदिर न्यासाचे ॲड. शशिकांत पागे, प्रा. मिलिंद जोशी या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. डॉ. देखणे म्हणाले, ''हा पुरस्कार

म्हणजे पुरोगामी विचार आणि संतपरंपरेचा गौरव आहे. संतांनी सामाजिक विवेक शिकवला, पर्यावरणाची दृष्टी दिली, विवेकी वृत्ती दिली. आधुनिक विचारांचा वारसा लोकहितवादींनी जपला. त्यांच्या नावाचा पुरस्कार आनंददायक आहे.'' उद्धव कानडे यांनी प्रास्ताविक केले.

*** विखे साहित्य पुरस्कार**

पद्मश्री विखे साहित्य पुरस्कार प्रा. द. ता. भोसले यांनी लिहिलेल्या 'लोकोत्तर' (गाडगेबाबा जीवन व कार्य) या चरित्रग्रंथास, नगर जिल्हा उत्कृष्ट साहित्य पुरस्कार, डॉ. अरुण मांडे यांच्या 'आपट्याचं पान' या चरित्रात्मक कादंबरीस, विखे कलागौरव पुरस्कार प्रसिद्ध चित्रकार श्रीधर अंभोरे यांना, तर विशेष साहित्य पुरस्कार प्रा. शंकर चव्हाण यांच्या 'कोंडमारा' काव्यसंग्रहास देण्यात आला.

प्रा. भोसले यांना २५ हजार रुपये व स्मृतिचिन्ह, डॉ. मांडे व श्री. अंभोरे यांना प्रत्येकी १० हजार रुपये व स्मृतिचिन्ह आणि प्रा. चव्हाण यांना ५ हजार रुपये व स्मृतिचिन्ह असे पुरस्कारांचे स्वरूप होते.

१६ ऑगस्टला प्रवरानगर येथे पद्मश्री विखे जयंती सोहळ्यात अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. म. द. हातकणंगलेकर यांच्या हस्ते पुरस्कार वितरण झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सर्जेराव निमसे हे होते. खासदार बाळासाहेब विखे, आमदार राधाकृष्ण विखे, जि. प. अध्यक्षा शालिनीताई विखे, माही आमदार अण्णासाहेब म्हस्के या वेळी उपस्थित होते.

*** भवरलाल जैन यांना 'समाजरत्न' पुरस्कार**

हैद्राबाद येथील फिलखाना जैन संघ येथे भवरलाल जैन यांना 'समाजरत्न' उपाधी देऊन गौरविण्यात आले. या सोहळ्याला आशीर्वचन देण्यासाठी राजयशसुरीश्वरजी उपस्थित होते.

भवरलाल जैन यांनी केलेल्या कृषी-औद्योगिक कार्याबद्दल त्यांना तामिळनाडू कृषी विश्वविद्यालयाची 'डॉक्टर ऑफ सायन्स' ही पदवी राज्यपालांच्या हस्ते बहाल करण्यात आली. त्यांनी कृषी औद्योगिक विकासासोबतच चालविलेल्या सामाजिक कार्याबद्दल दक्षिण भारतातील जैन समाजबांधवांनी त्यांना 'समाजरत्न' उपाधी बहाल केली. त्यांना आतापर्यंत चार डॉक्टरेट, पद्मश्री, भारताचा जलरक्षक असे २५ हून अधिक पुरस्कार मिळालेले आहेत.

यावेळी सत्काराला उत्तर देताना श्री. भवरलाल जैन म्हणाले, ''देशाचा विकास करायचा असेल, तर प्रत्येकाने स्वत:च्या कुटुंबाकडे नीट लक्ष दिले पाहिजे. कुटुंब संस्कृती टिकली तर उद्योग संस्कृती वर्धिष्णू होईल. लक्ष्मी आणि सरस्वती एकत्र नांदताना दिसतील.''

*** अरुण पारगावकर यांना देशमुख स्मृती पुरस्कार**

मराठवाडा साहित्य परिषदेतर्फे प्रतिमा प्रकाशनचे अरुण पारगावकर यांना यंदाचा 'रा. ज. देशमुख स्मृती पुरस्कार' २० जुलै रोजी प्रदान करण्यात आला.

प्रकाशन व्यवसायाचा रौप्यमहोत्सव साजरा करणाऱ्या प्रतिमा प्रकाशनने तीनशेहून अधिक पुस्तकांचे प्रकाशन केले आहे. या क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल दर वर्षी हा पुरस्कार प्रदान केला जातो.

*** सुधीर देव –'मॅन ऑफ द इअर'**

'माग्रस' या ग्रंथ चळवळीचे प्रणेते सुधीर देव यांची अमेरिकेच्या नॉर्थ कोरोलिना भागातील अमेरिकन बायोग्राफिकल इन्स्टिट्यूटतर्फे (एबीआय) 'मॅन ऑफ द इअर' या सन्मानासाठी निवड झाली आहे.

सुधीर देव यांनी वाचनाची आवड रुजवण्यासाठी २४ ऑगस्ट १९६८ ला माग्रस (माझा ग्रंथ संग्रह) या ग्रंथ चळवळीचा नागपुरात श्रीगणेशा केला. सध्या ३०० कुटुंबे या संस्थेशी संबंधित सदस्य आहेत. वाचकांना दर्जेदार पुस्तके उपलब्ध व्हावीत यासाठी माग्रस स्नेहभेट किंवा माग्रस उत्सवाच्या माध्यमातून महिन्यातून एकदा एका सदस्याच्या निवासस्थानी पुस्तकांवर चर्चा होते. माग्रसचे सदस्य पुस्तकांवर मतप्रदर्शन करतात. ❐


## इयान फ्लेमिंग यांची (जेम्स बाँड) मालिका


| | | |
|---|---|---|
| फ्रॉम रशिया विथ लव्ह | अनु. विजय देवधर | २५० |
| ऑक्टोपसी | अनु. जयमती दळवी | ८० |
| मूनरेकर | अनु. उदय नारकर | १५० |
| फॉर युवर आईज ओन्ली | अनु. अनिल काळे | १२० |
| कसिनो रॉयल | अनु. सुभाष जोशी | १२० |
| थंडरबॉल | अनु. जयंत कर्णिक | १६० |
| द स्पाय हू लव्हड् मी | अनु. अजित ठाकूर | ११० |
| लिव्ह ॲण्ड लेट डाय | अनु. अनिल काळे | १६० |
| द मॅन विथ द गोल्डन गन | अनु. देवदत्त केतकर | ८० |
| गोल्डफिंगर | अनु. माधव कर्वे | १८० |
| यू ओन्ली लिव्ह ट्वाइस | अनु. जयवंत चुनेकर | १६० |
| डायमंड्स आर फॉरएव्हर | अनु. अशोक पाथरकर | १५० |
| डॉ. नो | अनु. विजय देवधर | २६० |
| ऑन हर मॅजेस्टीज् सीक्रेट सर्व्हिस | अनु. अजित ठाकूर | २०० |

**पोस्टेज खर्च वेगळा** **मेहता पब्लिशिंग हाऊस,**

## नवे कोरे

# काळाकभिन्न

**स्वाती चांदोरकर**





**किंमत १३०रु.**
**पोस्टेज २५ रु.**

'काळाकभिन्न' काळोख आणि त्यातूनच होणारा मनुष्याचा जन्म! मग 'टाहो' फोडत या 'आटपाट नगरी'त होणारा जीवनाचा प्रवास! या प्रवासात मिळतात आई-वडिल, नातेवाईक, सखे-सोबती. जीवन फुलत जातं. वळणावर भेटते 'सहेलियोंकी बाडी'. मन गुंग होतं. स्तिमित होतं. 'अल्याड-पल्याड'ची जाणीव राहत नाही. मग कधीतरी मनुष्याचा उबग येतो आणि यंत्रं मित्र होतात. 'मी आणि चॅमी' मैत्री जुळते.

'हरवले आहेत' या मथळ्याखाली जेव्हा नावांची यादी फोटोंसकट वर्तमानपत्रांतून वाचनात येते तेव्हा 'वस्तुस्थिती'ची जाणीव होते. मनुष्य आणि मनुष्य जातींची आपापसातली नाती म्हणजे केवळ 'हिशोब' होऊन राहतात. शरीर आणि मन म्हातारं होतं. रिकामंही होतं, कारण आता काय शोधायचं हा प्रश्न आऽ वासून उभा राहतो. रिकाम्या वेळेचा चाळा म्हणून अनेक वर्षं धूळ खात पडलेला 'अल्बम' बाहेर काढला जातो आणि त्या पिवळ्या पडत जाणाऱ्या फोटोंमधून आठवणींचं इंद्रधनुष्य स्वत:च्या बालपणाच्या याऽऽ टोकापासून ते स्वत:च्या मुलांच्या तारुण्याच्या त्याऽऽ टोकापर्यंत अर्धगोल उमटतं. अंधुकसं, धूसरसं, चष्म्याच्या काचा थेंबाथेंबाने ओलावत!

## नवे कोरे




# धीरुभाईझम

**धीरुभाई अम्बानींचे कार्यविषयक असामान्य तत्त्वज्ञान**

मूळ इंग्रजी लेखक

**ए. जी. कृष्णमूर्ती**

अनुवाद

**सुप्रिया वकील**


| ८० रु. | पोस्टेज २५ रु. |
|---|---|


गुजरातमधील छोट्या खेड्यापासून ते 'रिलायन्स'च्या साम्राज्यापर्यंतचा अतिभव्य विस्तार हा विलक्षण टप्पा सर करणाऱ्या धीरुभाई अम्बानींच्या कार्यकर्तृत्वाची निराळी ओळख करून द्यायची गरज नाही. फारसं औपचारिक शिक्षण नसलेले धीरुभाई स्वत:च एक चालतंबोलतं विद्यापीठ होते. त्यांनी स्वत:चं असं कार्यविषयक तत्त्वज्ञान व संस्कृती जोपासली होती. भव्य स्वप्न, खडतर परिश्रमांची तयारी, निश्चयाचं बळ यांच्या जोडीला त्यांनी काही साधी-सोपी तत्त्वं अनुसरली होती. अशक्य कोटीतल्या स्वप्नपूर्तीसाठी त्यांनी याच तत्त्वांच्या मार्गक्रमण केलं आणि नेत्रदीपक यशही मिळवलं. त्यांची ही तत्त्वं सर्वसामान्यांच्या जीवनालाही वेगळी झळाळी देतील.

# २००८ साली प्रकाशित झालेल्या पुस्तकांची यादी

| पुस्तकाचे नाव | लेखक | किंमत |
|---|---|---|
| **कादंबरी** | | |
| **पपेट ऑन ए चेन** : ॲलिस्टर मॅक्लीन | अनु. माधव कर्वे | १८०/- |
| **अक्षयपात्र** : बिन्दु भट्ट | अनु. अंजनी नरवणे | २००/- |
| **सांधा बदलताना** | शुभदा गोगटे | २५०/- |
| **नो गॉड इन साइट** : अल्ताफ टायरवाला | अनु. अशोक पाध्ये | १५०/- |
| **मानसी** | डॉ. छाया महाजन | १२०/- |
| **द टेस्टामेंट :** जॉन ग्रिशम | अनु. विश्वनाथ केळकर | ३५०/- |
| **व्हायरस** | रवींद्र ठाकूर | १४०/- |
| **कर्वालो :** के.पी. पूर्णचंद्र तेजस्वी | अनु. उमा कुलकर्णी | १००/- |
| **परशुधारी परशुराम** | सुधाकर शुक्ल | २००/- |
| **ऑपरेशन मोलॅसिस** | अरुण हेबळेकर | १२०/- |
| **बॉर्न कन्फ्यूज्ड :** तनुजा देसाई हैदर | अनु. सुधा नरवणे | ३५०/- |
| **जळात सोडलेले दिवे** | अर्चना वर्टीकर | ९०/- |
| **डॉ. नो** : इयान फ्लेमिंग | अनु. विजय देवधर | २६०/- |
| **ऑन हर मॅजेस्टिज सीक्रेट सर्व्हिस** : इयान फ्लेमिंग | अनु. अजित ठाकूर | २००/- |
| **डायमंड्स आर फॉरएव्हर** : इयान फ्लेमिंग | अनु. अशोक पाथरकर | १५०/- |
| **द पेज थ्री मर्डर्स** : कल्पना स्वानीनाथन् | अनु. निर्मला मोने | २००/- |
| **सम्राज्ञी** | तेजस्विनी जाधव | २००/- |
| **कथासंग्रह** | | |
| **आभाळ** | शंकर पाटील | १००/- |
| **वळीव** | शंकर पाटील | १२०/- |
| **फक्कड गोष्टी** | शंकर पाटील | १२०/- |
| **फाशी बखळ** | रत्नाकर मतकरी | १००/- |
| **रंगांधळा** | रत्नाकर मतकरी | १५०/- |
| **संभ्रमाच्या लाटा** | रत्नाकर मतकरी | ११०/- |






| | | |
|---|---|---|
| **मृत्युंजयी** | रत्नाकर मतकरी | १५०/- |
| **काळाकभिन्न** | स्वाती चांदोरकर | १३०/- |
| **चतुर्भुज** | व. पु. काळे | १००/- |
| **नवरा म्हणावा आपला** | व. पु. काळे | ८०/- |
| **त्रिधारा :** डॉ. कमल चोपडा, मोहनलाल गुप्ता, सरला अग्रवाल | अनु. उज्ज्वला केळकर | १५०/- |

## विज्ञानकथासंग्रह

| | | |
|---|---|---|
| **कल्पित-अकल्पित** | सुधा रिसबूड | १४०/- |

## लेखसंग्रह


| | | |
|---|---|---|
| **मोहतरम्मा ते अम्मा** | सुधा गोखले | १२०/- |


## चरित्रे


| | | |
|---|---|---|
| **अमरगीत :** निशा मीरचंदानी बाबा आमटे यांचं जीवनचरित्र | अनु. लीना सोहोनी | २००/- |
| **कीनोट** : जे.आर.डी. टाटा | अनु. सुप्रिया वकील | २२०/- |
| **धीरुभाईझम** : ए.जी. कृष्णमूर्ती | अनु. सुप्रिया वकील | ८०/- |
| **संतसूर्य तुकाराम** | आनंद यादव | २२०/- |

## आत्मकथन

| | | |
|---|---|---|
| **बारबाला** | वैशाली हळदणकर | २००/- |
| **भोगले जे दुःख त्याला...** | आशा आपराद | २२०/- |
| **आलो-अंधारि** : बेबी हालदार | अनु. मृणालिनी गडकरी | १२०/- |
| **मी भरून पावले आहे** | मेहरुन्निसा दलवाई | १६०/- |








## मुलाखत संग्रह

| | | |
|---|---|---|
| **ऋतू न्याहाळणारं पान** : वि.स. खांडेकर | संपा. डॉ. सुनीलकुमार लवटे | १३०/- |

## चिकन सूप मालिका

| | | |
|---|---|---|
| **चिकन सूप फॉर द सोल : भाग २** : जॅक कॅनफिल्ड, मार्क व्हिक्टर हॅन्सन | अनु. प्रज्ञा ओक | २००/- |
| **चिकन सूप फॉर द सोल :भाग ३** : जॅक कॅनफिल्ड, मार्क व्हिक्टर हॅन्सन | अनु. उषा महाजन | २००/- |

## राजकीय

| | | |
|---|---|---|
| **पहिली फेरी?** | राम प्रधान | १५०/- |

## ललित गद्य-पद्य

| | | |
|---|---|---|
| **गीतकृष्णायन** | प्रसाद औटी | १००/- |
| **स्वरगंगेच्या काठावरती** | सदानंद गोखले | १५०/- |

## मार्गदर्शनपर

| | | |
|---|---|---|
| **पालकांचा प्रेमळ स्पर्श** | डी.एन.बी. सिंग | ७०/- |
| **द माइंड जिम** | अनु. श्याम भुर्के | २००/- |

## नाटक

| | | |
|---|---|---|
| **लवंगी मिरची कोल्हापूरची** | शंकर पाटील | ६०/- |

## English Publishing

| | | |
|---|---|---|
| Glimpses of Changing Banking Scenario (April 08) | P. N. Joshi | 300/- |
| Poems English and American | Shirish Chindhade | 40/- |
| Indian English Poems | Shirish Chindhade | 50/- |

## चातुर्यकथा

| | | |
|---|---|---|
| **बुद्धिमान तेनालीराम** | मंजूषा आमडेकर | ३०/- |
| **लाडका तेनालीराम** | मंजूषा आमडेकर | ३०/- |
| **हजरजबाबी तेनालीराम** | मंजूषा आमडेकर | ३०/- |
| **निर्भय तेनालीराम** | मंजूषा आमडेकर | ३०/- |
| **चतुर तेनालीराम** | मंजूषा आमडेकर | ३०/- |
| **न्यायप्रिय तेनालीराम** | मंजूषा आमडेकर | ३०/- |
| **समयसूचक तेनालीराम** | मंजूषा आमडेकर | ३०/- |
| **जगावेगळा तेनालीराम** | मंजूषा आमडेकर | ३०/- |
| **प्रसंगावधानी तेनालीराम** | मंजूषा आमडेकर | ३०/- |
| **राज्याचे भूषण तेनालीराम** | मंजूषा आमडेकर | ३०/- |
| **जांभळे आंबे आणि जंमत गोष्टी** | वैशाली कार्लेकर | ३०/- |
| **फट्फजिती आणि जंमत गोष्टी** | वैशाली कार्लेकर | ३०/- |
| **झॅकपॅक शोध आणि इतर कथा** | राजीव तांबे | ३०/- |
| **छत्रीची जादू आणि इतर कथा** | राजीव तांबे | ३०/- |

## युद्ध चित्रकथा

| | | |
|---|---|---|
| **दहशतीचे बेट (इवो जिमाची लढाई)** | अनु. प्रा. प्रसाद बर्वे | ६०/- |
| **साम्राज्याचा पाडाव (मिडवेची लढाई)** | अनु. निर्मला मोने | ६०/- |

## विज्ञान प्रश्नमंजूषा

| | | |
|---|---|---|
| **विज्ञान नवलाई : भूगोल** | डॉ. बाळ फोंडके | ३०/- |
| **विज्ञान नवलाई : खगोल** | डॉ. बाळ फोंडके | ३०/- |
| **विज्ञान नवलाई : पशू - पक्षी** | डॉ. बाळ फोंडके | ३०/- |
| **विज्ञान नवलाई : अंतराळ** | डॉ. बाळ फोंडके | ३०/- |
| **विज्ञान नवलाई : आपले पूर्वज** | डॉ. बाळ फोंडके | ३०/- |
| **विज्ञान नवलाई : प्राणिजगत** | डॉ. बाळ फोंडके | ३०/- |

# वाचकांचा प्रतिसाद

प्रिय रवींद्र ठकूर...

'व्हायरस' वाचलं... खूप काही जाणवलं. मी अशाच बिकट परिस्थितीत सापडलेय, की मला समोर येणं अशक्य होऊन बसलयं. बिकट यासाठी... मी एकटी... अन माझ्या समोर सहस्त्रमुखी नागफणा असलेला मला सहज अजगरी वेढा घालून माझं चूर्ण चूर्ण करू शकणारा प्रतिपक्ष. लहान बहीण. असं असूनही हे पत्र लिहिण्याचं धारिष्ट्य केलं. तुमचं 'व्हायरस' मला खूप खूप भावलं. अश्रू पुसत, खूप काही भोगलेलं आठवलं. 'व्हायरस' वाचून पूर्ण केलं. तुमच्या पुस्तकातलं जिवंतपण अनुभवलं आणि त्या मन:स्थितीतच हे सारं लिहिलं. मीही होते एक शिक्षिका. हाडाची शिक्षिका. मला खूप काही करायचं होतं. स्वातंत्र्यसैनिकाची नात मी. कॉम्रेड रॉय यांच्या विचाराने जगणाऱ्या पित्याची कन्या मी. गोरगरिबांची कणव, प्रेम, सेवाभाव याला मान देणाऱ्या सुसंस्कारी कुळातील मी. शिक्षिका म्हणून अशाच एका संस्थेत काम. जात, वशिला, भ्रष्टाचार, स्वार्थ यांनी बजबजपुरी मांडलेल्या संस्थेत... मी काही भोगले.

त्यांना थोर माणसं म्हणून ओळखतात, ती किती थिटी असतात हे अनुभवलं. संस्थेच्या घटना स्वार्थासाठी कशा बदलतात, वापरतात हे पाहिले. गोरगरिबांची मुले शाळेत येतात. त्यांना शिकवणं बाजूला. गप्पांचे फड अन राजकारण पाहिलं, खुर्ची का मिर्चीचा खेळ भोगला. एस. एस. वान्धेकर हा परवलीचा शब्द अनुभवला. अन्याय करताना नीतिमत्ता गुंडाळणारे अन मुखाने नीतिमत्तेचा जयघोष करणारे पाहिले. रॅगिंग भोगलं. मी मीरा झाले. खूप विष प्याले. शेवटी 'दुर्जनं प्रथम वन्दे' म्हणून बाजूला सारले. तुमचं व्हायरस

मी स्वत: भोगलेलं, त्यामुळे खूप जिवंतपण जाणवलं, अनुभवलं. १९६७ मध्ये बी. ए. झालेली मी. पॉलिटिक्स विषय. तो अभ्यास करताना प्लेटो जवळ आला.. हृदयात बसला. माझ्याही नकळत माझ्या वाणीतही डोकावू लागला. माझा स्पष्टवक्तेपणा, फटकळपणा त्यांना झोंबू लागला. दोष माझाच. शिक्षणाने माझ्या बुद्धीला पंख फुटले. मी वाचण्याच्या छंदाने समाजदर्शनाची भलीबुरी रूपं, माणसं ओळखू लागले.. मी नोकरीसाठी शिक्षणक्षेत्र निवडलेले. त्या क्षेत्रात काम करताना स्वत:ला अप टु डेट ठेवण्याकरता शिक्षणक्षेत्रातील नवे शिक्षण घेत राहिले. नवनवे प्रयोग करत राहिले. आईवडिलांचे प्रामाणिक संस्कार, गोरगरिबांची कणव, देशप्रेम, चांगलं काम करण्याची इच्छा, पण मला हे नाही समजले. काळचक्र आहे बदललेले. माझे गुण, सद्गुणावरची निष्ठा हेच दोष ठरले. भ्रष्टाचार, वशिलेबाजी, जात, कटकारस्थाने हे शिक्षणक्षेत्रात खोलवर भिनलेले 'त्या काळरात्रीचे' अनुभव खोलवर भिनलेले, 'त्या काळरात्रीचे' अनुभव पंख कापत गेले. एका बदलीच्या आदेशाने काळ्या पाण्यावर गेले. जाणं अशक्य. राजीनामा देऊन घरी बसले. खूप काही चांगलं करण्याचे स्वप्न विरले. भळभळणारी खोल जखम... अश्वत्थामा झाले. थंडावा देणारे तेल कुठेच मिळाले नाही. आज अचानक पुन्हा प्लेटो भेटला, म्हणाला, लोकशाहीत कारस्थानी, ढोंगी, रिकामटेकडे लोक सत्तेची, महत्त्वाची पदे बळकावतील. सुमार बद्धीच्या लोकांच्या अनुनयाला प्रतिष्ठा प्राप्त होईल. लोकसेवेच्या नाविकांची फौज सत्तासूत्र हाती घेईल. लोकहिताची कळकळ असलेल्या तत्त्वनिष्ठ व बुध्दिमान लोकांना डावललं जाईल. त्यामुळे विकासाचे प्रश्न दुर्लक्षिले जातील. भळभळणाऱ्या जखमेला पूर्ण शांत करणारे हे अमर तेल मिळाले.

आता शांत... पूर्ण शांत.

जोपर्यंत भ्रष्टाचार, जात, वशिलेबाजी, कटकारस्थाने अन अयोग्य लोकांच्या हातात शिक्षण संस्था असतील तोपर्यंत भारतातील लोकशाहीचे प्रयोग फसत जातील. शिक्षणक्षेत्र सद्गुणी सदाचारी लोकांच्या हाती जात नाही तोपर्यंत लोकशाहीचे काही खरे नाही. हे महान सत्य समजले

'व्हायरस'... 'व्हायरस'... उत्तर मिळाले.

सौ. मीना अशोक कुलकर्णी, मुंबई.


शिक्षणव्यवस्थेच्या आतमध्येच तयार
झालेला राजकारण, भ्रष्टाचार, जातीय
राजकारण यांचा व्हायरस
समूळ नष्ट करण्याची ताकद
एखाद्या सिस्टिममधे आहे का?...

**व्हायरस**

**रवींद्र ठाकूर**

**किंमत १४०रु. पोस्टेज २५रु.**

आशाताईंना
सप्रेम नमस्कार!

तुमचं पुस्तक वाचलं, काळजाला भिडलं. कारण एक, जे झालं ते प्रामाणिकपणाने लिहिलंत.

'आत्मविश्वास'ही फार महत्त्वाची गोष्ट आहे! पण त्याचा पूर्ण अभाव निर्माण झालेला असूनही, किंबहुना त्याला पूर्णपणे खच्ची केलं गेलेलं असूनही, तुम्ही जिद्दीने आयुष्य निर्माण केलंत.

साऱ्या संकटांना मागे सारून तुम्ही वाट चालत राहिलात आणि स्वत:बरोबर तुमच्या कुटुंबीयांनाही प्रकाशाकडे नेलंत. (शेवटी तुम्ही ज्या अधीरपणे प्रत्येक मुलीच्या, त्यांच्या मुलांच्या आणि इतरांच्या वाटचालीबद्दल आणि प्रगतीबद्दल लिहिलंयत ना, त्यात तुमचं त्यांच्याबद्दलचं प्रेम आणि अभिमान ओथंबून वाहतोय.)

तुम्ही सतत कृतज्ञतेने तुमच्या बलस्थानांबद्दल सांगत राहिलायत. त्यात शिखरावर आहेत प्रा. लीलाताई पाटील. परमेश्वराने तुम्हाला नमुनेदार जन्मदात्री बहाल केली आणि जणू काही आपल्या चुकीची भरपाई करण्यासाठी तुम्हाला लीलाताईंच्या मानसकन्येच्या जागी सन्मानाने बसवलं. तुम्हाला धर्मातीत असं खूप प्रेम मिळालं. यू डिझर्व्हड् इट.

एखादी मूळची हिंदू स्त्रीही करणार नाही अशा बारकाव्याने तुम्ही हिंदू सणवार, रीतिरिवाज यांचे वर्णन केले आहे.

सौ. भूषणा भिसे
सूरजबन सोसायटी, औंध, पुणे ७

सौ. आशाताईंना,

सा. न.

आपले 'भोगले जे दु:ख त्याला' हे आत्मचरित्र नुकतेच वाचले. पुस्तक हातात घेतल्यानंतर खाली ठेवावेसे वाटत नव्हते. २-३ दिवसात पुस्तक वाचून पूर्ण केले. माझं बालपण, शिक्षण सर्व पुण्यात झालं. चारचौघांप्रमाणे आयुष्य, लग्न असं सर्व झालं, पण एखाद्याच्या जीवनात इतक्या अडचणी येतात हे वाचून खूप वाईट वाटलं. तुम्ही लहानपणी शाळेत जाताना घरची केवढी कामं करून जायचात हे वाचल्यावर स्वत:ची लाज वाटली. कारण शाळेत असताना आईनं एवढंसं काम सांगितलं तरी आमचं अभ्यासाचं कारण पुढे असायचं.

एवढ्या कष्टाने तुम्ही एम.फिलपर्यंत शिकलात, प्रोफेसरची नोकरी करतानाच महिला दक्षता समितीचे कामही करता हे वाचून खूप कौतुक वाटले. तुमच्या सर्व मुलीही उत्तम शिकल्या. त्यांचे नवरेही शिकलेले आहेत. हे वाचून आनंद झाला. तुम्ही आता तुमच्या मनाप्रमाणे बांधलेल्या 'आशा' बंगल्यात राहता हे

वाचून समाधान वाटले

'आई' अशीही असू शकते हे बघून धक्का बसला. सख्खी आई मुलीला इतकी छळू शकते हे वाचल्यावर खूप दु:ख झाले.

आपल्याला आपल्या पुढील जीवनासाठी शुभेच्छा!

सौ. शुभांगी बिवलकर
सीबीडी बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.

माननीय आशाजी,

नुकतेच आपले 'भोगले जे दु:ख त्याला' हे पुस्तक वचनात आले. सुरुवातीला वाचताना जी त्यात मी गुंतत गेले ती शेवटपर्यंत.

आपल्या बालपणाचा काळ उलगडताना आपले कोल्हापूर, जुने वातावरण, लाडके भाई, जाच करणारी मा, अवतीभवतीचे लोक, असंख्य अडचणी, ढळत जाणारा आत्मविश्वास, परत शिकायची ओढ, तब्येतीची हेळसांड होत असतानाही मोठ्या जिद्दीने पार पाडलेला शैक्षणिक प्रवास. आयुष्याचा पूर्वार्ध संकटे-अडचणींनी भरलेला, तर उत्तरार्ध केलेल्या कष्टाचं फळ चाखताना. एक मुलगी, पत्नी, आई म्हणून ज्या भूमिका तुम्ही पार पाडल्या, त्याला खरोखरचं तोड नाही. आपलं शिक्षणावरचं प्रेम, जिद्दीने, नैतिकतेने जगण्याची धडपड, भल्याबुऱ्या अनुभवांतून तावून सुलाखून निघालेलं व्यक्तिमत्त्वं! खरंच फारच अफाट कर्तृत्व केलंत तुम्ही. तुमच्या या आत्मचरित्रामुळे खरोखरीच काहीतरी चांगलं वाचल्याचं समाधान मिळाले. ही कहाणी घराघरात कसं जगावं याची शिकवण देईल.

सी. पी. आर. मधील बाळंतपण असो वा आंबेवाडीतून बी. एड. कॉलेजपर्यंतची वाटचाल असो, घरासाठीची तगमग असो वा भाईबद्दलचा जिव्हाळा असो. प्रत्येक प्रसंग चित्ररूपाने डोळ्यांसमोर येतो. कुणाजवळच्या व्यक्तीचे आयुष्य निरखून पाहिल्यासारखे वाटले.

पुस्तकाची भाषा अगदी साधी, सरळ दुसऱ्याच्या मनाला हात घालणारी, अगदी आपल्या सरळ स्वभावाची साक्ष देणारी अपरिचित असणारे मुस्लिम वातावरण, बोलीभाषा या साऱ्यात गुंतून पडले.

शोभा कुलकर्णी
सम्राट नगर, कोल्हापूर

प्रिय आशाताई

प्रथम १४ एप्रिल या आपल्या वाढदिवसासाठी अनेक अनेक शुभेच्छा

कराड येथील ‘दिलखुष’ बुक स्टॉलमध्ये ‘भोगले जे दुःख त्याला’ दिसले. मृखपृष्ठावरील चित्र : एक भांडे, त्यात विस्तव, त्यापासूनचा धूर, धूरावरील चंद्र अथवा सूर्याच्या दिशेने जाणारा पक्षी. पुस्तकाची अर्पणपत्रिका वाचली. मनोगताचे पहिले पान वाचले आणि सरळ पुस्तक विकत घेतले.

सिडने शेल्डनच्या कादंबऱ्या हातात घेतल्यावर संपवल्याशिवाय खाली ठेववत नाहीत. तसा अनुभव मिळाला. वाचनाचा सर्व आनंद उत्कंठा, राग, प्रेम, करुणा, आनंद व समाधान असे भाव जागवणारा साठ वर्षांचा कालखंड आपण समोर उभा केला.

एस. एस. सी. ची परीक्षा देण्याचा प्रसंग (पा. नं. १३५-१३६) इंग्रजीचा क्लास, बीएच्या परीक्षेस वेळेवर पोहोचू न शकणे, दूध उतू गेल्यानंतर घडलेला प्रसंग वगैरे प्रसंग वाचत गेले की मुखपृष्ठावरील भांडे म्हणजे नववीनंतर मिळालेला कप, आईने त्याची केलेली धूपदाणी आणि तिच्यातून आशा नावाच्या फिनिक्सने घेतलेली झेप हे ध्यानात येते. मुखपृष्ठाचे कौतुक वाटते.

शाम पवार, कराड

श्री. प्रसाद औटी यांनी लिहिलेल्या गद्यकाव्य स्वरूपातील भगवान श्रीकृष्णांच्या चरित्राविषयी अरुण दाते यांनी आपला अभिप्राय पाठवला आहे.

स.न.

अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाच्या भगवान श्रीकृष्णांच्या लीलांनी भारतीयांना गेली काही दशके भारावून टाकले आहे. श्रीकृष्णाचे आयुष्य, कार्य आणि संदेश यांचे सार ‘गीतकृष्णायनात’ अत्यंत सुंदर रीतीने चित्रित केले आहे.

एकूण एक्कावन्न गीतांद्वारे श्रीकृष्णाचे संपूर्ण जीवन उमलत्या कमळाप्रमाणे विकसित होत जाते.

‘गीतकृष्णायन’ ही एक उत्कृष्ट कलाकृती आहे.


दुष्ट विचार आणि हिंसा यांचे थैमान आपले आयुष्य उद्ध्वस्त करू पाहत आहे, अशा वेळी ‘गीतकृष्णायन’ खरोखरच अत्यंत प्रसंगोचित आणि समर्पक आहे.

श्री. औटी यांना मी शुभेच्छा देतो.

अरुण दाते

# सम्राज्ञी

तेजस्विनी जाधव




**२००रु. पोस्टेज २५रु.**

''ऐश्वर्या. लोक ज्याला महत्त्वाकांक्षा म्हणतात, त्या अर्थानं मी महत्त्वाकांक्षी नाही आणि मला स्वत:ला असं महत्त्वाकांक्षी व्हायला आवडतही नाही. दुसऱ्या कुणाचं मी काय सांगू? पण जे दिसेल ते मिळवायला बघायचं, हाताला लागलं म्हणून खिशात घालायला बघायचं, हे मला बरोबर वाटत नाही. माझं कोणतं काम आहे, हे मला नक्की कळलेलं आहे. नुसतं मोठं होणं अशासारखी तर मला मुळीच महत्त्वाकांक्षा नाही. उलट सतत असं मोठं होण्यासाठी धडपड करणाऱ्या लोकांच्या वागण्याचा मला अर्थच कळत नाही. हे लोक कशासाठी सारखे धावत सुटतात, ते समजत नाही, त्यामुळे हाती असलेल्या कामाला पूर्ण न्याय द्यायच्या अगोदरच ते दुसरं काहीतरी मिळवायला बघतात. कुठंच शांती नाही. ऐश्वर्या, अगं कोणतंच काम लहान किंवा मोठं नसतं. फक्त ते नीट समजून घेऊन केलं पाहिजे. मग ते छोटं कामही सगळ्यांत प्रभावी वाटतं आणि ते करणाऱ्यालाही, काहीतरी केल्याचं समाधान वाटतं आणि शेवटी, आयुष्याला मर्यादा असतेच ना? नुसतंच पळत सुटण्यात सार्थक कशाचं वाटणार? मला तर कधी कधी एखादा प्राथमिक शाळेचा शिक्षकही, शिक्षणमंत्र्यांपेक्षा थोर वाटतो. एखादा सरपंच मुख्यमंत्र्यांपेक्षा कर्तबगार वाटतो, कारण त्याला आपल्या कामाचा अर्थ कळलेला असतो.''

# श्रद्धांजली

*** नारायण धारप**

प्रसिद्ध भयकथा लेखक नारायण गोपाळ धारप (वय ८२) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या मागे पत्नी तसेच राजीव व डॉ. शिरीष धारप हे दोन मुलगे असा परिवार आहे. धारप हे भयकथांसाठी प्रसिद्ध होते. आजवर त्यांनी शंभराहून अधिक पुस्तकांचे लेखन केले आहे.

*** डॉ. प्रकाश गिरी**

पुणे भटक्या विमुक्त समाजातील कार्यकर्ते व इंग्रजीचे नामवंत प्राध्यापक डॉ. प्रकाश गिरी (गोसावी) (४८) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या इच्छेनुसार कोणताही धार्मिक विधी न करता मरणोत्तर देहदान आणि नेत्रदान करण्यात आले. त्यांच्या मागे वडील, पत्नी, मुलगी, दोन भाऊ असा परिवार आहे.



प्रा. गिरी हे अंधश्रद्धा निर्मूलन समिती, राष्ट्रसेवा दल, सत्यशोधक मार्क्सवादी आंदोलन, स्त्री अत्याचार विरोधी समिती, आदिवासी संघर्ष समिती, आंतरजातीय विवाह समिती इ. चळवळीत क्रियाशील होते. धुळे जिल्ह्यातील विसरवाडी ते औरंगाबाद असा आदिवासींचा

लाँग मार्च त्यांनी मराठवाडा विद्यापीठ नामांतर आंदोलनात काढला होता. मॉडर्न महाविद्यालय, रयत शिक्षण संस्था, सोमेश्वर शिक्षण प्रसारक मंडळ, साने गुरुजी शिक्षण प्रसारक मंडळ, महात्मा गांधी विद्या मंदिर, हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ, अगस्ती एज्युकेशन सोसायटी अशा नामवंत शिक्षण संस्थांमध्ये त्यांनी इंग्रजीचे अध्यापन केले. कुटुंब नियोजन कार्याबद्दल नेहरू पुरस्कार त्यांना लाभला होता. औंध येथील रयत शिक्षण संस्थेच्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालयाचे माजी प्राचार्य सीताराम गोसावी यांचे ते लहान बंधू होते.

*** ज्येष्ठ कॅमेरामन आय. बारगीर यांचे निधन**

मराठी चित्रपटसृष्टीत पहिले रंगीत छायालेखन करणारे ज्येष्ठ कॅमेरामन आय.बारगीर यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. अखिल भारतीय चित्रपट महामंडळाचे ते काही काळ उपाध्यक्ष होते. 'चित्रकर्मी' पुरस्काराने त्यांना सन्मानित करण्यात आले होते. बारगीर यांनी शंभरहून अधिक चित्रपटांचे छायालेखन, पटकथालेखन केले तसेच त्यांनी काही नाटकेही लिहिली होती.

*** अशोक मांकड यांचे निधन**

इंग्लंड व वेस्ट इंडिज या दोन बलाढ्य संघांना सन १९७१ मध्ये त्यांच्याच मातीत धूळ चारणाऱ्या टीम मधील बिनीचे फलंदाज आणि माजी कसोटीपटू अशोक मांकड यांचे वरळी येथे निधन झाले. अशोक यांनी १९६९ ते १९७८ या कालावधीत २२ कसोटींत भारताचे प्रतिनिधित्व केले. बारा वेळा रणजी करंडक जिंकलेल्या मुंबई संघाचे सदस्य म्हणून त्यांचा आदराने उल्लेख होतो.

❒

# बालनगरी

## अनुक्रमणिका


खादाड माकडं १०१




# खादाड माकडं

एक राजा होता. त्याचा भलामोठा राजवाडा होता. आणि त्याहीपेक्षा मोठ्ठी बाग होती.

राजाला छंद होता जनावरं, पक्षी पाळण्याचा. माणसांपेक्षाही त्याचं खरं प्रेम होतं ते पक्ष्यांवर.

राजवाड्यात राजपुत्र आणि राजकन्याही होत्या. राजाची लाडकी मुले इतर मुलांच्यात न खेळता ह्या प्राण्यांशीच खेळायचा. हे खरे प्राणी म्हणजेच त्यांची खेळणी.

राजवाड्यातील अश्वशाळेत भरपूर घोडे होते. त्यावर राजपुत्र आणि राजकन्या बसायचे.

कुत्री, मांजरं, गाई, म्हशी, हरणं, ससे होते.

एक हत्तीही होता. तो राजाला सोंडेने सलाम करायचा.

बाहेरच्या बागेत मोर, पोपट, होते. भारद्वाज होते, असंख्य फुलपाखरे, गोजिरवाण्या खारी बागेत बागडत असत.




तळ्यात बदके, हंस होते. बगळे होते. राजा त्या सर्वांमध्ये रमत

असे. पक्षांना मारण्यास सक्त मनाई होती. त्यांच्यासाठी धान्य, पाणी दिले जात असे.

राजपुत्र आणि राजकन्यांना मात्र आवडायची ती माकडं! त्यांची माकडांशी दोस्ती होती. ते माकडांना हुप हुप करायचे, शेंगा, केळी खायला द्यायचे. माकडे उड्या मारायची, केळी, शेंगा सोलून ऐटीत खायची.

राजपुत्र त्यांना राजवाड्यातून मिठाई आणून देत. राजवाड्यात रोज दिवाळी असायची. लाडू, जिलबी, पुरणपोळया, पुऱ्या, गुलाबजाम, साखरभात.



माकडांना सगळं रोज आयत खायलां मिळायला लागलं.

कुठलेही कष्ट नकोत. फळे शोधा, सोला, खा, यांचा व्याप नाही.

राजपुत्रांना माकडलीला प्रचंड आवडायच्या. वाकुल्या दाखविणे, दात विचकणे ह्यात ती रमून जायची.

शेवटी माकडांना कळले, की इथे एक स्वयंपाकघर आहे. त्यात ती सर्व मिठाई बनते. मग आतल्या आचाऱ्यांचा डोळा चुकवून माकडं स्वयंपाकघरात घुसायला लागली. गरमागरम स्वादिष्ट भजी, पापड, वडे पळवू लागली.

आचारी संतप्त होऊन त्यांना डाव, उलथणं, लाटणं काहीही फेकून मारायचे. पण ते माकडांना लागायचे नाही.

एकंदरीत माकडं फारचं सुखात होता. भरपूर खाऊन गलेलठ्ठ आळशी झाली. झोपा काढू लागली.


राजाने त्यांच्यासाठी पिंजरे तयार केले. त्यात ती झोपत. आचारी आणि माकडं यांच्यातलं भांडण मात्र रोज चालायचं.

माकडांच्यात एक शहाणं माकड होतं. माकडांच्या टोळीचा प्रमुख म्हणून प्रथम त्याला मान होता, पण आयती मिठाई मिळायला लागल्यावर मात्र त्याचे कोणी ऐकेनासे झाले. हे रोजचे भांडण बघून तो माकडांचा नेता अस्वस्थ झाला. त्याला ही लक्षणे ठीक वाटेनात.

मग त्याने सर्वांची सभा बोलविली. सर्व माकडं जमली

नेता म्हणाला, ''बाबांनो, तुम्हाला आज मजा वाटते आहे. पण यात खूप धोका आहे. आपण सगळे जंगलात जाऊ. तिथे आपण स्वतंत्र असतो. आपला आहार कंदमुळं, फळं हा आहे, तोच आपण खाऊ. ही रोजची भांडणे, मारामाऱ्या नकोत, ह्यातून अनर्थ ओढवेल.''

हे भाषण ऐकायला माकडं थांबलीच नाहीत. पटापट



उड्या मारत निघून गेली. जाताना मोठ्यानं हसून नेत्याची टिंगल करत म्हणाली, "अरे, आम्हाला कशाला शहाणपण शिकवतोस? आमचं आम्ही बघून घेऊ. म्हणे अनर्थ ओढवणार! कुठल्या ज्योतिष्यानं सांगितलंय ? इथली मिठाई किती मधुर, स्वादिष्ट असते पुन्हा ती आयती मिळते. तुझ्या त्या जंगलात काय मिळणार ? ती कच्ची, कडू, तुरट, आंबट फळं, ती खाऊन जाम कंटाळा आलाय. कधीकधी तर तीही मिळत नाहीत, नुसती उपासमार. आम्हाला मरायची घाई नाही, तुला जायचे तर जा !"

नेत्याच्या डोळयांत पाणी आले.

त्याने पुन्हा प्रयत्न केला, पण सगळं व्यर्थच ! शेवटी तो बायकामुलांना घेऊन जंगलात निघून गेला. बायका - मुलंही नाराजीनचं गेली.

इकडे एक दिवस एक माकड स्वयंपाकघरात घुसले.

त्याने ताटातल्या पुऱ्या पळविल्या.

संतापलेल्या आचाऱ्याने चुलीतलं जळकं लाकूड त्याला फेकून मारलं.

माकडाचे केस जळू लागले, बेभान होऊन ते शेजारच्या गोठ्यात शिरले. तेथे मेंढ्या होत्या.

माकडाच्या स्पर्शानं एका मेंढीची लोकर पेटली. ती सैरावैरा धावत शेजारच्या अश्वशाळेत घुसली. खाली पडलेल्या गवतावर लोळू लागली, गवतानं पेट घेतला. घोडे

बांधलेले होते, अश्वशाळेला आग लागली. घोडे खिंकाळू लागले. जळू लागले, काही बिचारे मेलेही.

इकडे माकडे भयभीत होऊन पिंजऱ्यात जाऊन बसली.

आग विझवली.

पशुवैद्य आले. राजाच्या अत्यंत प्रिय घोड्यांची अवस्था वाईट होती. त्यांनी सल्ला दिला, ''ह्यावर एकच रामबाण उपाय. माकडांची चरबी या जखमांना लावा. तरच घोडे वाचतील.''

पिंजऱ्यातल्या माकडांना आपलं भविष्य समजलं.

खादाडखाऊ माकडांना आता आपला अंत कळून चुकला

आयतं, फुकटचं खाल्ल्यानं नाहक मरण ओढवलं.

अनघा ठोंबरे

*सुविचार*

**जीवन म्हणजे संघर्ष आणि भ्रमनिरास यांची मालिकाच आहे.**

# सप्टेंबर दिनविशेष



| | |
|---|---|
| ०१ सप्टेंबर - | जागतिक शांतता दिन |
| ०३ सप्टेंबर - | दुसरे महायुद्ध सुरू (१९३९) |
| ०४ सप्टेंबर - | दादाभाई नौरोजी जयंती |
| ०५ सप्टेंबर - | डॉ. राधाकृष्णन जन्म (१८८८), शिक्षक दिन |
| ०६ सप्टेंबर - | भारत पाक युद्ध |
| ०७ सप्टेंबर - | भगतसिंग जन्म (१९०७) |
| ०८ सप्टेंबर - | आंतरराष्ट्रीय साक्षरता दिन |
| ११ सप्टेंबर - | आचार्य विनोबा भावे जयंती |
| १४ सप्टेंबर - | हिंदी दिन |
| २२ सप्टेंबर - | कर्मवीर भाऊराव पाटील जयंती |
| २४ सप्टेंबर - | सत्यशोधक समाजाची स्थापना(१८७३) |
| २७ सप्टेंबर - | राजा राममोहन राय पुण्यतिथी |
| २८ सप्टेंबर - | लुई पाश्चर पुण्यतिथी |



# बोधकथा

## ज्ञान अमर आहे

लोकमान्य टिळक मंडालेच्या तुरुंगात होते. तेव्हा त्यांनी 'गीतारहस्य' नावाचा ग्रंथ लिहिला.

नंतर काही दिवसांनी इंग्रजांनी त्यांची सुटका केली. पण त्यांनी लिहिलेले ग्रंथाचे हस्तलिखित काही परत केले नाही. तेव्हा सर्व मंडळी चिंतेत पडली.

सर्व जण त्यांना म्हणू लागले की ''हस्तलिखित परत न दिले तर आजवरचे एवढे सर्व परिश्रम वाया जाणार.''

तेव्हा लोकमान्य टिळक म्हणाले, ''इंग्रजांनी त्या ग्रंथाचे हस्तलिखित दिले नाही तरी बिघडणार नाही. मी ते पुन्हा लिहून काढीन. कारण हा ग्रंथ पूर्णपणे माझ्या डोक्यात आहे. इंग्रजांकडे पॉझिटिव्ह आहे, पण माझ्याकडे त्याची निगेटिव्ह आहे. त्याच्या आधाराने आपण दुसरी प्रत काढू.''

तात्पर्य :- ज्ञान हे कोणीसुद्धा नष्ट करू शकत नाही. ज्ञान हे अमर आहे. ज्ञान ही अशी संपत्ती आहे जी कोणी चोरू शकत नाही; म्हणून प्रत्येकाने ही संपत्ती साठविली पाहिजे.

# चित्र रंगवा






# पाऊस आला





पाऊस आला, पाऊस आला,




पावशाची ओरड

रानात उडाली सर्वांची गडबड



मुंग्यांनी हलवले आपले तळ

गांडूळमामांची नुसतीच वळवळ



खेकडे निघाले तुरुतुरु पुढे




दिव्यांपाशी आले रंगीत रंगीत किडे



बेडकांनी मारली झकास तान

बगळोबांनी शेतात लावलं ध्यान

पक्ष्यांचे थवे झाले एका जागी जमा



गोगलगाय म्हणते, ‘अहो, मी पण येते, जरा दमा.’

सुरवंटातून निघालं फुलपाखरू

म्हणालं, ‘मी इकडे फिरू की तिकडे फिरू?’

अळ्यांनी केला कोवळ्या पानांचा फराळ

डासोपंतांचं चालू झालं गुं गुं गुऱ्हाळ

चतुरांनी उठवले पाण्यावर तरंग

अपूर्व झाला हे सर्व पहाण्यात दंग

वाळवीच्या किड्यांचे आले थवेच्या थवे

अपूर्व त्यांच्यामागे झाडू घेऊन धावे

पेरते व्हा, पेरते व्हा पावशाचा घोष


अपूर्वच्या बागेत फळफुलांचा जल्लोष.


**लतिका भावे**



## ससोबा-हसोबा मालिका

| | | |
|---|---|---|
| शेपटीवालं झाड आणि इतर कथा | राजीव तांबे | ३० |
| ससुल्या आणि इतर कथा | राजीव तांबे | ३० |
| शूर ससोबा आणि इतर कथा | राजीव तांबे | ३० |
| चला चहा पिऊया आणि इतर कथा | राजीव तांबे | ३० |
| छत्रीची जादू आणि इतर कथा २००८ | राजीव तांबे | ३० |
| झॅकपॅक शोध आणि इतर कथा २००८ | राजीव तांबे | ३० |




## बालचमूंसाठी खुसखुशीत मेवा!

### धूमधडक योजना




लहान मुलांची १० पुस्तकं खरेदी करा अधिक फक्त ६०/- रुपये भरून ‘‘मेहता मराठी ग्रंथ जगत’’ चे एक वर्षाचे वर्गणीदार व्हा !

# विज्ञान नवलाई


**डॉ. बाळ फोंडके**




**खगोल**




**अंतराळ**





**प्राणिजगत**

रॉकेट, यान यांचं अंतराळातलं भ्रमण होतं कसं? पृथ्वीच्या आतबाहेर नक्की काय आहे? जमीन, समुद्र, आकाश कुठपर्यंत पसरलं आहे? पशू-पक्षी आले कुठून? कसे? आणि जगतात कसे? प्राण्यांचं विश्व आपल्याला कधीतरी दिसेल का? सुरुवातीला आपण माणसं कुठून आलो? कसे होतो? त्यावेळी आपली भाषा, संस्कृती, रीतिरिवाज कसे होते?


हो! हो! हो!

या सगळ्या प्रश्नांची उत्तरं आपल्याला मिळतील एकाच खजिन्यात!


**६ विषयांचं वैविध्य असणारा आगळा वेगळा संच!**




**पशू-पक्षी**




**भूगोल**




**आपले पूर्वज**

**किंमत प्रत्येकी ३० रु.**

# ओळखा पाहू

प्रसिद्ध आंतरराष्ट्रीय टेनिसपटू व भारताच्या डेव्हिस करंडक संघाचे प्रशिक्षक



विजेत्यास रु. १०१ चे रोख पारितोषिक दिले जाईल.

ऑगस्ट अंकातील 'ओळखा पाहू'चे उत्तर

**प्रख्यात गायक पंडित भीमसेन जोशी**

**स्पर्धेचे विजेते - ग.ना. कापडी - गोवा.**

**अचूक उत्तर पाठवणारे वाचक**

सौ. हेमलता अष्टेकर, सौ.छाया मुधोळकर, हरिभाऊ शिंदे - पुणे, अशोक सोनवणे - जळगाव, सुरेश कालेश्वरकर - नांदेड, अरुणा पेंडुरकर - सिंधुदुर्ग, धनंजय पाटील - इचलकरंजी, उषाताई कंठे, गिरिजा कंठे - अमरावती, वैशाकी कुऱ्हेकर - अमरावती, मेघना काळे - बुलढाणा, स्मिता तळेकर - डोंबिवली, प्रसाद व्यवहारे - औरंगाबाद, चैतन्य दिनेश सरोदे - बारामती.

**प्रायोजक**

श्री.राजू जगदीशचंद्र मेहता, मे. हिराचंद नानचंद अँड कंपनी, टिळक चौक, मालेगाव, **जि.नाशिक.**

**(साडी आडतीचे व लुंगीचे होलसेल व्यापारी.)**

**सूचना -** प्रायोजकांच्या पत्त्यावर उत्तरे पाठवू नका.

# मेहता मराठी ग्रंथजगत

## वर्गणीचे नूतनीकरण करा.

एक वर्षाची वर्गणी
१५० रु.

तीन वर्षांची वर्गणी
३५० रु.

पाच वर्षांची वर्गणी
५०० रु.

**तीन किंवा पाच वर्षांसाठी वर्गणीदार झाल्यास पुस्तक भेट**




३ वर्षांची वर्गणी
पाठविल्यास
'वपु ८५'
वपु काळे
हे ६०रु.चे
पुस्तक भेट!
पोस्टेज २०रु.

५ वर्षांची वर्गणी
पाठविल्यास
'सुवर्णमुद्रा'
शान्ता ज. शेळके
हे ८०रु.चे
पुस्तक भेट!
पोस्टेज २०रु.



भेट पुस्तके - प्रती शिल्लक असेपर्यंतच

**मेहता मराठी ग्रंथजगत,** द्वारा मेहता पब्लिशिंग हाऊस,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,
टेलिफोन भवन समोर, पुणे ४११ ०३०. फोन - (०२०) २४४७६९२४

वर्गणी मनीऑर्डर अथवा डिमांड ड्राफ्टने वरील पत्त्यावर पाठवावी.

RNI NO-MAHMAR/2000/2739 Licence to post WITHOUT PREPAYMENT/
Regd.No.:L-2/RNP/PNW/M/38/2006-2008 / L.NO.LWP-50/
Posted at Marketyard Pso, Pune
Posting Date 11 September 2008.

वैविध्यपूर्ण विषयांनी सजलेला **'मेहता मराठी ग्रंथजगत'** चा आगामी

# दीपावली विशेषांक

लवकरच वाचकांच्या भेटीस येत आहे.

**काय असणार या विशेषांकात...!**

'माझा सहचर', 'माझी सहचरी/सखी' व 'टॉप टेन इन माय लाइफ' या विषयांवरील लेख.

'माझा सहचर' या विषयांतर्गत मृणालिनी गडकरी, माधुरी शानभाग, उज्ज्वला केळकर, स्वाती चांदोरकर, शकुन्तला फडणीस, सुधा गोखले यांचे लेख

'टॉप टेन इन माय लाइफ' या विषयांतर्गत
डॉ. आनंद पाटील, डॉ. सुनीलकुमार लवटे, उत्तम कांबळे, राम प्रधान, रा. रं. बोराडे, निरंजन घाटे यांचे लेख

**बाळगोपाळांसाठी विविध कोडी, विनोद, गमतीजमती**

घरातील सर्वांसाठी बौद्धिक फराळाची लज्जत वाढवणारा, ज्ञानसमृद्ध करणारा **'ग्रंथजगत'**चा दीपावली विशेषांक आपल्या संग्रही ठेवा आणि **'अक्षरदीपावली'** साजरी करा.

## मेहता पब्लिशिंग हाऊस

**१९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड, टेलिफोनभवन समोर, पुणे - ३०. फोन - (०२०) २४४७६९२४.**

प्रति,

______________________________

______________________________

______________________________

______________________________

संपादक, मुद्रक, प्रकाशक : सुनील अनिल मेहता यांनी हे मासिक १९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, पुणे ३० येथून प्रसिद्ध केले. मुद्रण स्थळ : जय गणेश ऑफसेट, ३४६ गणेश पेठ, पुणे २.